वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " ।०८
किरकोळ अंकास ............................ ०४

annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 „1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy.......................................1as

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .......०।

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per lin3a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXVI AKOLA MONDAY 4 JANUARY 1892 NO I

वर्ष २६ अकोला सोमवार तारीख ४ माहे जानेवारी सन १८९२ इ० अंक १

वऱ्हाडसमाचार

मिती पौष शुद्ध ५ सके १८१३

मुंबई नजीकच माटुंगा ह्मणून एक स्टेशन आहे तेथील आनटाप नामक टेकडावर सरकारच्या दारुगोळ्याचा मोठा खजिना असे. गेल्या सोमवारीं पहाटेस त्या ज्वाळा ह्या खजिन्यानें पेट घेतला त्या सरशीं जो भयंकर आवाज झाला व भूकंपा प्रमाणें जो मोठा धक्का बसला त्यानें आसपासचे कांहीं कोस वरील गांव दणाणून गेले आणि सर्व आकाश धूममय होऊन गेलें. प्राणहानि कांहीं झाली नाहीं ही आनंदाची गोष्ट होय. जवळ जवळचे लोक मैदानांत उभे राहिले तोंच त्यांच्यावर धडाड भडाड करणाऱ्या बारामुळें बारीक बारीक दगडांचा वर्षाव झाला. भोंवतीं नजिक अशा इमारती नव्हत्या व ह्मणण्या सारखी लोकवस्ती नव्हती ह्मणुन निराळें नुकसान कांहीं झालें नाहीं या भडीमाराच्या आगीची बातमी पसरतांच ती विझविण्यासाठीं फायर इंजिन्स वगैरे तत्काळ दाखल झालीं परंतु त्या अवकाशांत विझविण्या सारखें कांहीं शिल्लक राहिलें नव्हतें. या खजिन्यास पेट कशानें लागला होता हें अद्याप कळलें नाहीं.

गेल्या जून महिन्या अखेरच्या सहा माहींत ग्रेट इंडियन पेनिन शुला रेलवेचा निव्वळ फायदा १७१५६०७८ रुपये झाला आहे संयुक्त भांडवलाच्या धंद्यांत परिणामीं फायदा फार होत असतो याचें हें एक उदाहरण होय.

## राष्ट्रीय सभा

### ( सातवा समारंभ )

राष्ट्रीय सभेचा सातवा समारंभ नागपूर मुक्कामीं निर्विघ्नपणें शेवटास गेला. त्यांत विशेष आल्हादाची गोष्ट अशी कीं नागपूर व वऱ्हाड येथील प्रमुख गृहस्थांनीं हा समारंभ नागपुरास भरविण्याचा विडा उचलला होता आणि त्या कृतसंकल्प प्रमाणें सर्व कामें सुयंत्रपणें सर्वोत्कृष्ट होऊन राष्ट्रीय सभेच्या बैठकी आनंदानें आटपल्या. उभय प्रांतांतील व्यवस्थापक मंडळी कडे यंदाच्या सभेचें श्रेय सर्वोपरीनें होतें [illegible]णि तें तिनें उत्तम प्रकारें संपादलें हें [illegible] व तिच्या हाता खालील लोकांस [illegible] होय. गेल्या समारंभांत तिन्ही [illegible] न्यून पडलें नाहीं. पाठशाळां तील विद्यार्थी आपखुषीनें जमलेल्या पाहुण्यांचे चाकर बनले होते. राष्ट्रप्रीत्यर्थ एवढा विलक्षण एकोपा झाला होता तेव्हां सभेचे स्थळ 'लालबाग ' हें फार रमणीय व मनोहर बनविलें होतें, पाहुण्यांसाठीं नव्या बराखी बांधल्या होत्या, पाहुणचार राजेशाई थाटावर झाला, बातेवत सोका आणे ठेविला होता, पताका, निशाणें, घुड्या, शुभसूचक कमानी उभारल्या होत्या इत्यादि वर्णनें पृथक् पृथक् दरसाव करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं.

राष्ट्रकार्याचा मंगल मुहूर्त सोमवार दोन प्रहरीं समीप येत चालला तसतसें सभागृह प्रतिनिधी व प्रेक्षक याच्या समुदायानें भरूं लागलें. कांहीं सभ्य स्त्रियांनीं आपल्या आगमनानें मंडप शोभिवंत केला होता. नऊशे जवळ जवळ प्रतिनिधी असून प्रेक्षक दोन हजारावर असावेत. सर्वजण प्रफुल्लित अंतःकरणानें व उल्हास वृत्तीनें सभेच्या मंडपांत जमूं लागले. आपली धुरंधर मंडळी पाहुण्यास मिळाली ह्मणून एकच गर्दी उडाली. देशसेवेचे अंगांत वारें शिरलें ह्मणजे मनुष्य किती आनंदानें आपलें कर्तव्य बजावितो याचा प्रकाश तत्काळ अंतःकरणांत पडला. ह्या समयाचा हुबेहुब चित्र मनावर ठसलें तर यावन्मरण मनुष्यमात्र स्वदेशासाठीं आपला देह खर्ची घालील यांत कांहीं संदेह नाहीं. इंग्रजी, हिंदुस्थानी, गुजराथी, मराठी, कानडी, उर्दू, तेलंगी वगैरे सर्व रूढ भाषा एक समयावच्छेदें करून कानांत गुणगुणू लागून मोठा आल्हाद होई व सर्व धर्म व सर्व जाती राजकीय उन्नती व्हावी ह्मणून एक दिलानें तनुमनधनें करून झटत आहेत असा विचार येऊन राष्ट्रीय सभेची यथार्थता कळून आली. जमलेल्या पाहुण्यामध्यें ह्यूम साहेब डब्ल्यू. सी. बानरजी, मेथा, सुरेंद्रनाथ, बानरजी, केनडी, राघवाचार्य आयर, आनंदा चार्लू, अयोध्यानाथ, वॅरो, रामस्वामी, घोसाळ, माधवराव रानडे, राजे अझीमशाहा, नवलोजी राव, वाचा, मालवियां, टिळक, नामजोशी इत्यादि मुकुटमणि चमकत होते.

राष्ट्रीय सभे निमित्त येणाऱ्या पाहुण्यांचें आदरातिथ्य करण्यासाठीं नागपूर व वऱ्हाड या दोन प्रांतांतील प्रमुख गृहस्थांची व्यवस्थापक मंडळी नेमली होती तिचे अध्यक्ष मि. सी. नारायण स्वामी नायडू यांचें प्रारंभीं स्वागतपर संभाषण झालें. ते ह्मणाले:—सहा निकराचे संग्राम होऊन गेले आणि नंतर आपण सगळ्या राष्ट्राच्या मध्यस्थानीं गोळा झालों आहों; येथील बैठकींत निरनिराळे विचार होतील त्यांचा प्रकाश आपल्याच ज्ञानभांडारांत पडेल असे नाहीं तर तो प्रकाश इंडियांतील कानाकोपऱ्यातील ही लोकांच्या हृदयांत फांकेल आणि [illegible]करून सुदीन उगवून आपल्या आशावृक्षाला कसकशीं फुलें फळें येत चालली आहेत हें इंडियन प्रजेला चांगलें कळून येईल. राष्ट्राच्या गरजा कायकाय आहेत तें विदित करण्या साठीं चिकाटीनें मोहिम करावयाची आहे तिचा पहिला कुच नागपुराहूनच होईल अशी मोठी उमेद आहे. हिंदुस्थान सरकाराचा मनोरथ चांगला आहे आणि तो आह्मी बहुमोल मानतो परंतु आमच्या हातून सरकारास मदत मिळणें शक्य आहे तो एवढीच कीं सांप्रतची राज्यपद्धति सोयीची नाहीं एवढेंच आह्मी ह्मणत बसावें ही राज्यव्यवस्था सुधरावी ह्मणून राष्ट्रीय सभेची बळकट इच्छा असून तिचा त्या बद्दल पक्का निश्चय झाला आहे ही गोष्ट राजनिष्ठ व राजमान्य मार्गांनीं घडविण्याचें तिनें योजिलें आहे. मला भरंवसा आहे कीं सरकाराचा मनोरथ हा काळ पावेतों सफळ झाला आहे त्यापेक्षां उत्तम रितीनें तो पुढें सफळ होईल. ब्रिटिश राज्य व्यवस्थेंत सुधारणा होण्या सारख्या पुष्कळ आहेत आणि एका मागून दुसरें अशीं वर्षें लोटत आहेत तसतसा शिक्षणाचा विस्तार फैलावत चालला आहे आणि त्या त्या सुधारणेची आवश्यकता अधिकाधिक लोकांस कळून येत आहे. नागपुरची बैठक यथासांग व्हावी म्हणून मध्यप्रांताचे चीफ कमिशनर मि. ए. पी. म्याकडोनाल्ड यांनीं साध्य दिसली तितकी मदत दिली म्हणून त्यांच्या उदार चित्तवृत्ती बद्दल आपण मोठ्या आनंदानें त्यांचे आभार मानले पाहिजेत. सर्वच अधिकारी हिंदुस्थानांत त्यांच्या तोडीचे असते तर राष्ट्रीय सभेची कालत्रयीं जरूर लागली नसती.

त्या नंतर प्रयागचे पण्डित अयोध्यानाथ यांनीं सूचना आणली कीं राय बहदूर आनंदा चार्लू मद्रास हाय कोडताचे वकील यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें. त्यांचे गुणानुवाद कथितांना पण्डित ह्मणाले कीं मुंबई मुक्कामीं प्रथम ज्या मोजक्या लोकोत्तर थोर पुरुषांनीं राष्ट्रीय सभा उभारली त्यापैकीं हे मद्रासीं सर्वश्रेष्ट गृहस्थ होत. वरील सुचनेस अनुमोदन प्रदर्शित करतेवेळी शेट फिरोजशा मेथा यांनीं सांगितलें कीं मद्रास इलाख्यानें राष्ट्रसभेची मोठी सेवा केली आहे त्या अर्थी त्या इलाख्याचे तर्फेच प्रतिनिधी अध्यक्षस्थान स्वीकारणार आहेत ही गोष्ट उचित होय.

अध्यक्षस्थानीं राय बहादूर आनंदाचार्लू विराजमान होतांच आनंदाच्या गर्जनांस व टाळ्यांच्या गजरांस प्रारंभ झाला. सभेच्या कामास सुरुवात करण्यापूर्वी अध्यक्षांनीं समयोचित विचारांनीं ओतप्रोत असें मार्मिक भाषण केलें त्याचा सारांश रूपानें गोषवारा आम्हीं खालीं सादर करीत आहों:—

ब्राडला साहेब, राजे सरटी. माधवराव व राजेंद्रलाल मित्र या गृहस्थांच्या मरणानें या सभेचें मनस्वी नुकसान झालें आहे तें कोणत्या ही अन्य उपायानीं भरून येण्या सारखें नाहीं ए. ओ. ह्यूम साहेबांच्या अत्युत्तम उपकारा बद्दल त्यांचे कृतज्ञता पूर्वक आभार मानल्या नंतर त्यांनीं सांगितलें कीं राष्ट्रीय सभेची चालू सातवी बैठक नव्या विषया संबंधानें विचार करण्या करितां भरली नसून मागील बैठकींत केलेले ठराव व्यवस्थशीरपणें ठाम व कायम करण्यास भरली आहे. राष्ट्रीय सभेनें राजकीय उन्नतीच्या मार्गांतली पहिली एक मजल संपादिली आहे. राष्ट्रीय सभेची स्थापना आणि अभ्युदय निवेदन करितांना ते बोलले कीं आम्ही आरंभी या सभेच्या सुरुवातीच्या वर्षी मुंबईस जमलों त्या वेळीं वजनदार व बुद्धिमान लोकांची मंडळी अशा संज्ञे खालीं आम्हा विषयीं इंडिया सरकार बोलत असे. गुदस्त साली या द्वीपकल्पाच्या राजधानींत आम्ही जमलों तेव्हां सध्यां राज्यसूत्रें हालविणारे व्हाइसराय यांनीं आपणावर अशी शिक्का मोर्तब मारली कीं ही मंडळी ह्मणजे राज्य संस्थेच्या नियमान्वयें उभारली आहे, तिचा उद्योग राजमान्य असून तिचीं साधनें ही कायदेशीर आहेत, आणि कारभाराची पद्धत ही समंजसपणाची आहे. हिंदुस्थानच्या व्हाइसरायाच्या तोंडचे हे उद्गार ह्मणजे खरोखर ते तसेच निघतील असें आह्मास वाटलें नव्हतें तथापि आमच्या योग्यतेप्रमाणें आमची किंमत झाली नाहीं अशी शंका घेण्यास आह्मास सवड आहे. आणि वास्तविक पाहिलें असतां आपली बरोबरी ह्मणजे इंग्लंडातील मोठ्या बहुमताभिमानी, विशेष वजनदार आणि सामर्थ्यवान लोकानुवर्ती दुफळीशी समतोल नात्यानें व्हावयाला नको होती काय? आपल्या संबंधाच्या अभिप्रायांत फरक पडला इतकेंच नव्हे तर आपण सुधारणेच्या ठोकळ दिशा दाखविल्या आहेत त्यांच्याच धोरणानें हिंदुस्थान सरकारनें निराळी योजना आरंभली आहे. लार्डक्रास साहेबांचें 'इंडिया बिल' आपल्या विचारांचेंच द्योतक नव्हे काय? आपल्या एकत्र मागण्यांना तें बिल एके प्रकारें उत्तर होय. फक्त हें उत्तर पार्लमेंटानें दिल्या सारखें दिसत नाहीं. पब्लिक सर्व्हिस कमिशन बसविलें, इंडियन कव्हेनेनटेड सरव्हिसला लागू असणाऱ्या वयाची मुदत वाढविली, अनकाव्हेनेनटेड सर्व्हिसमध्यें नेटिवांचा भरणा करण्याची पद्धत वाढविली, बायव्य प्रांतांत कायदे कौंसिल निराळें स्थापविलें, आणि त्यावेळे पासून कायदे कौंसिलांतील सभासद गुणानुरूप अधिकाधिक निवडण्यांत येऊं लागले इत्यादि गोष्टी घडून आणण्यास फार प्रयास पडले आहेत तेव्हां त्याच्या सार्थकते विषयीं आपणास अभिमान वाटणें यथायोग्य नव्हे काय? व तुष्टयां आपण जे पराक्रम केले आहेत त्यां-

ची साक्ष वरील गोष्टी निःसंशय सप्रमाण देत आहेत; आणि हे असे पराक्रम आहेत कीं त्याबद्दल आपण धन्यता मानणें रास्त आहे. पण या अभिनंदन करण्यासारख्या गोष्टी आहेत तरी देखील शोचनीय प्रकार हा कीं आपल्या श्रेष्ठ श्रेष्ठ हक्कासंबंधानें, या देशांत मनापासून कोणी चकार काढीत नाहींत व वरवर गोड गोड मात्र बोलतात आणि बादशाहिणीच्या खुद्द द्वीपान्तरीं आपल्या वांट्याला काय ती एक सूचना आली आहे. तिच्या बद्दल कळकळ बाळगणारें कोणी नसून तोंडाला पानें पुसण्याची युक्ति लढविली आहे आणि ही सूचना देखील पार्लमेंटाच्या टेबलावर धुराळाच खात पडली आहे. या देशांत आपण निरंतर सदैव आपला उद्योग चालूं ठेवला तरी देखील आपले मनोरथ सफळ होण्याचा कांहीं रंग दिसत नाहीं. याचें वास्तविक कारण मुख्यत्वेंकरून असें असावें कीं हिंदुस्थान सरकारच्या हातीं कांहीं सत्ता नाहीं, लंडनचें कौंसिलच्या हातीं ही कांहीं सत्ता नाहीं, हाऊस आफ कामन्सच्या हातीं मात्र खरी सत्ता आहे परंतु ही सत्ता चालविण्यास कामन्स सभा नाकारते किंवा बुद्धि पुरस्सर चालवीत नाहीं. हें उत्तर यूल साहेबांनीं प्रयागच्या समारंभाच्या समयीं अध्यक्ष असतांना काढले होते. निःसंशय यूल साहेबांनीं शेवटीं पक्षान्तर बोधक अव्ययानें प्रयोग केला आहे त्या पासून त्यांना सांगावयास होतें त्याहून अधिक अर्थबोध होतो. यूल साहेब आणखी बोलले कीं हाऊस आफ कामन्स सभेसमोर जे प्रश्न निघतात त्यांचा न्यायाच्या रितीनें निकाल करण्या जोगता तिच्या सभासदांस अवकाश ही नसतो व पुरे इतकी माहिती ही नसते. तर या गोष्टीस उपाय कोणता? हा उपाय शोधून काढणें आणि योजणें हीं कामें कोणाच्या शिरावर आहेत? उपाय एवढाच कीं विलायतच्या जनसमूहास आपली ओळख करून दिली पाहिजे आणि हिंदुस्थाना संबंधानें त्यांची माहिती इतकी वाढविली पाहिजे कीं त्यांना तिचा कांहीं उपयोग करण्यास सांपडावें. दुसऱ्या प्रश्नाचा जबाब असा सांगतात कीं वरील उपाय शोधण्याचें आणि योजण्याचें काम अगोदर आपलें स्वतांचेंच कर्तव्य होय, त्या मागून या कामाची जबाबदारी विलायतच्या मताधिकारी आणि लोकविचारांचें नियमन करणाऱ्या साहेब लोकांकडे आहे आणि अखेरीस ह्या लोकांचे हाऊस आफ कामन्स मधील प्रतिनिधी यांजवर ही ही जबाबदारी जात आहे. वरील कर्तव्याची थोडीबहुत बजावणी राष्ट्रीय सभेची ब्रिटिश कमिटी स्थापल्यानें झाली आहे. या कमिटींतील गृहस्थ मोठे आस्थेवाईक आणि उदार बुद्धीचे आहेत. ते आपलें काम फुकटांत करीत आहेत. कमिटीचे सेक्रेटरी चाणाक्ष व विद्वान डिग्बी साहेब होत. त्यांचा आपल्या हिता साठीं उद्योग वाकबगारीचा, समयस्फूर्तीचा व कळकळीचा आहे हें पाहून आपण आनंद व आश्चर्य पावत आहों आणि आपल्या शत्रूच्या दृष्टी मध्यें तो कांट्या प्रमाणें सलत आहे कां कीं त्यांना गैर माहित जनसमूहाला खोट्या व निराधार गोष्टी सांगून फसवणुकीनें आपला मतलब साधून घ्यावयाचा असतो तो वरील उद्योगानें चांगला सा-वत नाहींसा झाला आहे. दुसरी एक मंडळी निघाली आहे ती विलायतच्या लोकांच्या चांगुलपणाचें दर्शक होय. ही मंडळी म्हणजे हाऊस आफ कामन्स मध्यें इंडिया साठीं निघालेली निराळी मंडळी होय. ब्रिटिश कमिटीनें कळकळीनें व दूरवर विचारानें उपदेश केला आहे आणि त्याच प्रमाणें पार्लमेंटांतील इंडिया-मंडळीचा हा अनुभवशीर अभिप्राय पडतो कीं आम्ही आपल्या बैठकीचें स्थळ बदलावें आणि आमचा उद्योग आणि आमचे राजकीय व्यापार थेट लंडन शहरीं चालवावेत. विलायेंतेत जनसमूहा पुढें प्रतिनिधी या नात्यानें या संस्थेच्या सभासदां पैकीं ज्या गृहस्थांनीं दांडगी मदत केली आहे त्यांचा ही सल्ला सदरहू प्रमाणेंच आहे. अद्यापीहि जर एखादी शंका एखाद्याच्या मनांत घोळत असेल तर ती दूर करण्याला एवढी गोष्ट पुरे आहे कीं हिंदुस्थान सरकारचे मुख्य नायक लॉर्ड डफरिन साहेब यांनीं या देशांतील कायदे कौन्सिलाच्या संस्थेमध्यें लोक प्रतिनिधि निवडण्याच्या तत्वाला धरून कोणत्याही स्वरूपाचा अधिकार आम्हाला देणें शहाणपणाचें आणि अवश्यक काम आहे अशी सूचना केली होती आणि ही सुचना त्यांनीं आपल्या स्वतःच्या ठिकठिकाणच्या अनुभवाच्या आधारें केली होती तरी देखील तिला कोठें मान न मिळतां ती फेकून देण्यांत आली आणि या सूचनेच्या ऐवजीं दुसरी सूचना लॉर्ड क्रास साहेबांचें 'इंडिया बिल' म्हणून आली आहे ती केवळ पोरखेळ असून कांहीं तरी मोबदल्यांत दिली आहे आणि ती देखील धुराळा खात पडली आहे आणि अशीच किती वेळ ती पडेल आणि कोणत्या कारणानें ती ठेवली असेल हें कांहीं सांगवत नाहीं. हिंदुस्थाना मध्यें जितके म्हणून राणी सरकारचे प्रतिनिधी आले त्यांस त्यां मध्यें मोठे दूरदर्शी, बाणीदार, कारस्थानी आणि व्यवहारदक्ष अशा लॉर्ड साहेबांच्या सूचनेची येणें प्रमाणें फटफजीती उडाली ही गोष्ट लक्षांत ठेवली म्हणजे प्रस्तुतचे व्हाइसरॉय जरी आपल्या सभेला राजमान्य सभा मानून आपली पसंती दर्शवितात तरी देखील ते किंवा त्यांच्या मागून येणारे कोणते ही व्हाइसरॉय साहेब नव्या सूचना करून त्यांचा अविचारानें आणि बेधडक अशी वाताहत होऊं देऊन आपली मानखंडणा करून घेण्याला पुढें सरसावतील अशी आपणांस शंका घेण्यास कांहीं तरी जागा आहे कांय? वरील सर्व गोष्टींचा गोळा बेरजेनें विचार केला ह्मणजे खात्रीनें कळून येईल कीं आपणाला इंग्लंडवर मोहीम केलीच पाहिजे आणि राष्ट्रीय सभेचा बावटा फडकवीत त्यावरील झळकणारी बादशाहिणीची राजचिन्हें सर्व जगास दाखविली पाहिजेत. लंडनमध्यें राष्ट्रीय सभेची बैठक भरविण्याची अमोल संधि आपण टाळतां कामा नये किंवा लांबणीवर ढकलूं नये. सर्वांस विज्ञप्तीनें कळवितों कीं सर्वांनीं लक्ष लावून या गोष्टीचें मनन करावें आणि आपलें वास्तवीक कर्तव्य कर्म मर्दुमकीनें बजावण्याचा पक्का संकल्प करावा. या गोष्टी संबंधानें मोठें अडथळे नाहींत असें माझें ह्मणणें नाहीं. मुख्य संकट ह्मटलें ह्मणजे समाजाचा प्रतिबंध होय आणि त्याला प्रायश्चितही बहिष्काराचें आहे.

तर हा प्रतिबंध केवळ व्याख्यानें झाडून झुगारून देण्यासारखा नव्हे. या मुद्याचा विचार मोठा खोल दृष्टीनें केला पाहिजे. ज्या ज्या द्वीपान्तरीं आपणाला पर्यटण करितां येते त्या त्या संबधानें सध्यां अडचणी आहेत त्या पुर्वी पेक्षां सध्यां कमी कमी होत चालल्या आहेत ही गोष्ट आपण शांतपणें आणि निरभिमानानें कबूल केली पाहिजे. जर ती आपणाला मान्य असेल तर तें खरोखरच श्रेयस्कर होय वरील अडचणी या प्रमाणें आपण दूर केल्या तर आपले आप्त मित्र आणि बंधुजन आपणांस सोडून देतील तर आपल्या देशासाठीं आणि आपल्या छळ करणाऱ्या आप्तमित्रांच्या व बंधुजनांच्या कल्याणासाठीं आपण आपला देह अर्पण करीत आहो याहून अधिक श्रेयस्कर दुनियेंत काय असणार आहे? तशांत हा सामाजिक छळ आणि बहिष्कार इत्यादि लटपटी फार वेळ टिकणाऱ्या नाहींत. आपला पक्ष इतका न्याय्य आणि नेकीचा आहे आणि आपलीं तत्वें आणि मार्ग हीं पामाणिक पणाचीं आणि राजनिष्ट अशीं आहेत. लंडन मध्यें राष्ट्रीय सभा भरविण्यांच आपणांस यश आलें आणि तेणें करून आपल्या कायदे कौंन्सिलांत लोकनियुक्त कौंन्सिलदार झाले तर देशांतील इतर सुधारणा झपाट्यानें करण्यास आपणास ही एक निराळीच मदत होईल. सद्यस्थिति अशी आहे कीं एखाद्या गोष्टी संबंधानें लोकांचें मत कळण्याचे कांहीं मार्ग नाहींत. इंग्लंडच्या मोहिमेवर तलवार बहादर व देशाभिमानी टोळी धाडण्या संबंधानें आपला संकल्प कांहीं ही ठरो तरी आपणांस अगोदर ही गोष्ट मोठ्या दक्षतेनें संभाळली पाहिजे कीं हल्लीपेक्षां जनसमूहाचा राजकीय गोष्टी विषयीं अधिकाधिक परिचय व्हावा. आणि देशाभिमानाचें द्योतक जी राष्ट्रीय सभा तिच्या तत्वांचें बाळकडू लोकांस पाजावें. या दिशेनें आपली चळवळ फार थोडी आहे आणि इंग्रजीचें वळण न लागलेल्या लोकांच्या आडदांड समजुती दूर करून त्यांना समंजस करण्याकडे आपले प्रयत्न फार थोडे झाले आहेत. राष्ट्रीय सभेंतल्या मंडपांतल्या प्रमाणेंच वीरश्रीनें व उत्सुकतेनें आपण इतर लोकांशीं निकट दळण वळण ठेविलें पाहिजे आणि हिंदुस्थानांतल्या बैठकी विषयीं तरी निदान या पुढें एवढी वीरश्री व उत्सुकता नको आहे; मग राष्ट्रीय सभा हिंदुस्थाना पुरती कांहीं काल पावेतों बंद ठेवावी किंवा नको या प्रश्ना संबंधानें आपला निर्णय कांहीं ही होवो. आपल्याच बाहुबलावर आपण लढा किंवा लढूं नका तरी हें आपलें पहिलें कर्तव्य समजलें पाहिजे कीं समान्य सामान्य जनसमूहामध्यें चळवळ करून आपण सर्वजण एक राष्ट्र वाले आहों अशी कल्पना व अशा हिम्मतीच्या गोष्टी इत्यादिकांची त्या लोकांच्या मनांत पेरणा अगोदर केली पाहिजे. हें कार्य आपण हातीं घेण्यास एक बळकट कारण आहे. ही कामगिरी बजावली म्हणजे आपली जिम्मा आपण उतरली कां कीं इंडिया मधील लोकांत आपण उच्च उच्च पायरीचे आहों ह्मणून जसें उदयकालीं सूर्याचे बालकिरण प्रथम पर्वतांच्या शिखरावर पडतात तद्वत पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रकाश प्रथम आपल्याच हृदयमंदि[illegible] आहे. परंतु हा प्रकाश सूर्य किर[illegible] खालच्या लोकांवर पडणार नाहीं त्या अर्थीं आपण होऊनच तो प्रकाश त्यांच्या अंतःकरणांत पाडला पाहिजे आणि तसें करणें आपलें कर्तव्य असून बहुमानाचें आहे. आपल्या कर्तव्याला आपण स्मरून लोकांचे विचार ठाम करून सोडले पाहिजेत कीं इंग्रज सरकारचें राज्य ह्मणजे परकीयांचें राज्य नव्हे. आपल्या राष्ट्रीय रचनेंत खऱ्या राजकर्त्यांची जागा मोकळी पडली होती ती इंग्रज बहादरांनीं भरून टाकली आणि जसें आपल्या आर्यभूमीचे प्रतिपालक प्राचीन काळीं क्षात्रिय होते तसेच हे राज्यकर्ते होत.

नंतर वरील संभाषणाच्या अखेरीस विलायतची बैठक भरेपर्यंत हिंदुस्थानांत राष्ट्रीय सभेच्या बैठकी भरवाव्या किंवा भरवूं नयत या प्रश्नाचा विचार करून निर्णय तिमावे तारखेस कळवावा ह्मणून कांहीं गृहस्थांची एक कमिटी सूचविण्यांत आली. ती सूचना करिते वेळीं वक्तृत्वशाली बाबू सुरेंद्रनाथ बानरजी हे बोलले:— आपलें शत्रु आनंदानें बागडतात कीं राष्ट्रीय सभेच्या अंतकाळच्या ऱ्हासास प्रारंभ झाला आहे. परंतु खरोखर राष्ट्रीय सभे संबंधानें विलायतची बैठक आटोपल्यावर आपल्या नव्या शतकास प्रारंभ होईल. राष्ट्रीय सभेचे आपण कट्टे भक्त आहों तेव्हां 'बेहत्तर आहे, प्राण सोडा पण राष्ट्रीय सभा सोडूं नका.' राष्ट्रीय सभेच्या बाहुट्या खालीं आपण संग्राम ठोकून विजयी होऊं. बादशाहिणीची स्वतंत्र प्रजा या नात्यानें आपले जे जे ह्मणून हक्क व अधिकार आहेत ते ते आपणांस प्राप्त होई पर्यंत आपण दरसाल राष्ट्रीय सभा भरवीत जाऊं.

वरील आवेशाचे, जोरदार, व वीरश्रीनें ओतप्रोत असें भाषण संपल्यावर सूचविलेली कमिटी ठरविण्यांत आली. आणि पहिले दिवशीची बैठक बरखास्त झाली.

### दिवस दुसरा—मंगळवार

आम्ही गेल्या अंकी जो ठरावांचा मसूदा प्रसिद्ध केला तो या दिवशीं सुरेन्द्रनाथ, बोस, प्रिंगल केनेडी, वाचा, मालविया, अयोध्यानाथ, टीळक, गोखले, मोहित्रा, मुधोळकर, जोशी इत्यादि प्रमुख प्रमुख वक्त्यांचीं भाषणें होऊन सर्वानुमतें पसार करण्यांत आला. या दिवशीची हकीकत सध्यां देतां येत नाहीं.

### तिसरा दिवस—बुधवार

प्रारंभीं मुक्ती फौजेचे सेनापती बुथ साहेब यांनीं राष्ट्रीय सभेस मुद्दाम तारेनें कळविलेली सूचना मि. ह्यूम साहेबांनीं वाचून दाखविली ती अशी कीं, हिंदुस्थानचे लक्षावधि लोक उपासमारानें मरणाच्या दारीं बसले आहेत त्यांच्या स्वास्थ्याकडे लक्ष पुरवावें, देशांतील ओसाड प्रदेशांत अशा निराश्रित मनुष्यांच्या वसाहती बसविण्याची योजना काढावी, आणि त्या योजनेंत पद्धतवार सवलती व चांगल्या सोयी ठेऊन लोकांच्या पोटापाण्याची नीट व्यवस्था लावावी. या सूचनेवर राष्ट्रीय सभेनें असा जबाब दिला कीं, देशांतील पांच सहा कोट प्रजा अन्नान्न करीत आहे ह्मणून त्यांच्या साठीं राष्ट्रीय सभेचा उद्योग चालला आहे. तरी नवीन वसहातींची लोकांचे घोर दारिद्र्य बरेंच

करण्यासारखी दिसत नाहीं. लोक सध्यां भारी पेंचांत सांपडल्यामुळें असें नादान झाले आहेत तर ते पेंच खुलें केले पाहिजेत आणि त्यांची नैतिक उन्नती होईल अशा मार्गांचें अवलंबन केलें पाहिजे ह्मणजे सांप्रतच्या दुःसह स्थितींत कांहीं फरक पडला तर पडेल.

लंडनमध्यें राष्ट्रीय सभेची बैठक भरेपर्यंत हिंदुस्थानांत बैठकी भरवाव्या किंवा भरवूं नयेत या प्रश्नाचा निकाल कमिटीच्या विशेष सूचनेच्या अनुरोधानें सर्वांनीं असा केला कीं, आज तागाईतच्या वहिवाटी प्रमाणेंच दरसाल राष्ट्रीय सभेची बैठक हिंदुस्थानांत भरवावी.

फारेस्ट खात्याचा जुलूम रयतेस फार पींडाकारक झाला आहे. सरकारनें फारेस्ट खातें प्रथम स्थापिलें त्यावेळच्या वचनावर तिळांजळी सोडली आहे आणि प्रजेच्या पैशाचा अपव्यय चालविला आहे अशा दोन गोष्टी लोकांच्या मनांत चांगल्या बिंबल्या तेव्हां फारेस्ट संबंधानें निराळा मागाहून ठराव करण्यांत आला कीं, सरकारपाशीं पदर पसरून गरीब रयतेसाठीं फारेस्ट कडील सक्तीचे व मनाईचे कडक कायदे बंद करवावे. आणि त्यांस सुखावह व न्यायाला धरून असे अधीक अधीक सवडीचे नवे नियम अंमलांत आणावे.

सर वुलियम वेडरबर्न व ब्रिटिश कमिटी यांच्या परिश्रमाबद्दल त्यांचे आभार मानून राष्ट्रीय सभेशिवाय आणखी इतर द्वारांनीं सुधविलेल्या प्रश्नांचा आगत्यानें विचार करण्यासाठीं त्यांस विनंती करावी.

ब्राडला साहेबांच्या मरणानें त्यांच्या अमोल कार्यबाहुल्यांचा व थोर परिश्रमांचा वाटा बुडाला आणि त्यामुळें आपल्या देशाचें भारी अकल्याण झालें आहे. त्यांच्या कन्येस सभेसार्फत शांतवना दाखल पत्र धाडण्याचें ठरलें.

मंडळीचा फार फार आग्रह पडला ह्मणून ह्यूम साहेबांनीं पुन्हां जनरल सेक्रेटरीचें काम पतकरलें तेव्हां त्यांच्यावर लोकांनीं मोठ्या आल्हादानें पुष्पवृष्टि केली.

विलायतेस पार्लमेंटची नवी निवडानिवड झाल्या नंतर राष्ट्रीय सभेची बैठक लंडनांत भरविण्याची तरतूद करण्याचा ठराव झाला आणि त्या अन्वयें अल्हाबादेस १८९२ सालीं आठवा समारंभ भरावा असें सर्वानुमतें ठरलें आहे.

The Berar Samachar

MONDAY, JANUARY 4, 1892

The Indian National Social Conference which is the fifth of its kind was held at Nagpur on the 31st December, 1891, in the Congress Pandal. In the fifth year from its birth the Conference had had as usal to fight out its way against some ignominious attacks that were made against it with a view to create misgivings in the mind of the public. The Social Conference which may be justly styled as the hand-maid to that august political assembly—the National Congress we cannot dispense with. For while moving along the path of political reforms it is expected and that too reasonably that we should also make some move slowly but surely in the direction of the true social reform. An objection has been raised by some of our kind-hearted and well-meaning European friends that the Indians are not fit for political reforms since they are not able to advance in social matters. With a view to awaken the public mind in social subjects various associations have been founded in differeent parts of India. The prevailing idea in holding such annual conferences is to get together all the members of the branch associations once a year to render an account of what they have done during the year, what their wants are and what problems for solutionn are before them. We subjoin below a short summary of this year's Social Conference:—

Mr G. S. Khaparde was unanimously voted to the Chair. He referred to the stormy discussions which had set in agitation almost the whole of India at the beginning of the last year when the Age of Consent Act was introduced in the Supreme Legislative Council. He further observed that the effect of those discussions was not to retard the progress of the social reforms but reviewing what had been done during the last year he had sufficient grounds to be satisfied with the progress of the year. He again alluded to the wide prevailing but at the same time a mistaken notion that the Conference was going to force upon the community a new religion making a complete divorce with the old one. He said that the Conference was not for legislation and that in his view it was the last resource they would be driven to when all other methods had signally failed. He concluded with the remark that the so-called social reforms are more properly to be looked up as returns to the old customs than reforms of them and in order to support it he he adduced illustrations from old times about the स्वयंवर system then in vogue.

In the resolution No. I the Conference denounces the practice of exacting money by the father or guardian of the girl to which validity was given by a recent decision of the Madras High Court militating as it does with the express text of Hindoo Law and against the decisions of the Bombay and Calcutta High Courts and it recommends that the monies so received should be held in trust for the girl. In the course of the debate over the proposition it was also suggested that monies received by the father of the bridegroom should also be held as a trust in the interest of the girl; but this amendment was required to be set aside.

In the resolution II, the conference cries down the custom of polygamy except in cases to which Hindoo Law lends its authoritative sanction and except where adequate provision is made for the discarded wife and her children, if any, and requires all the social reform associations to discourage such marriages. By way of amendment, it was proposed that the practice of polygamy should be put down without any exception, but the amendment failed.

The third resolution with respect to the religious sanction for a distant sea-voyage was discussed with great warmth. Pandit Madan Mohan Malvia laid great stress on the advisability of strictly maintaining the national customs and habits and requested an open confession if there be any flaw in their observances so to undeceive their friends and relatives of their breach of them. A well-known Madrasee Millionaire Sabhapatei Mudiliar afforded for the London Congress his own ships free of cost and with plentiful of helps for sticking to strict nationality in all dealings—not excepting the full supply of the water of the Ganges. The proposition last passed unanimously was to the effect that it is not desirable to excommunicate a person on the mere ground of his undertaking a distant sea-voyage.

Resolutidn No. 4 This conference recommends the Social Reform Associations to give active support to those engaged in the celebration of widow remarriages and thus encourage the movements.

To this an amendment was proposed by Mr. B. G. Tilak of Poona to the effect that the active support must be honestly given and that the members of those associations should pledge them selves to interdine with remarried couples.

In the resolution No. 5 in regard to the restitution of conjugal rights the alternative punishment of imprisonment to a wife should be discontinued altogether.

Resolution No. 6 recommends the institution of punchayats with Governmental sanction consisting of leading representatives of the Mahamedan and Hindu communities to settle their religious disputes which have led to serious riots and loss of life—disputes frought with great danger to the intimate social relations which should bind the two communities together.

Mrs. Kashibai Kanitkar and Mrs. Rakhamabai Modak spoke eloquently in Marathi to invoke the aid of law in prohibiting the disfigurement of child-widows before the age of 18 and without their consent afterwards.

The last resolution was directed to open up new channels of social relations to promote intermarriages between the members of those sects who freely dine together.

---

A Bengali Babu has contributed a long article to the columns of the National Guardian in regard to the Shastrie Doctrines on the sea-voyage of Hindus. Towards the close after a scholarly treatment of the subject he gathers up his conclusions in the now stating remarks:—

"As the Congress movement, which is looked upon, as an upheavel of the national mind distinctly shows that our countrymen are trying hard for their political rights and privileges, and that they love liberty, it behoves them with a view to preserve consistency, to give certain amount of liberty to the nation in the matter of such social reforms as will prove conductive to the best interests of the country, consistent with our *shastras* and customs. Mazzini on the duties of man says:—"Liberty is sacred, as the individual, of whose life it is the reflex, is sacred. Where liberty is not, life is reduced to a mere organic function, and where man allows the violation of his liberty, he is false to his own nature, and rebels against the decree of God."

In conclusion, I fervently hope, that our countrymen without proving false to the national religion will unite in a body as a man; to do everything in their power, to promote the best interests of the country, and that on the other hand, our England returned brethren, will use their best endeavours, not in any way, to offend the feelings of the orthodox portion, by the manners, costume and general mode of living under such a state of things, I fully trust, that is the Benign Dispensations of God's Providence, and under the fostering care of England, India, distinguished as she is, for the vastness of her rivers, the gorgeousness of her mountains, the exuberance of her vegetation, will at no distant date, be alike distinguished for political advancement, intellectual greatness and moral worth."

Woman is a man's equal. Nature has not denied her his qualities and we do not see any good ground raised against the lady doctors whom the Lady Dufferin Fund has undertaken to supply to the women in India. Here is a nice remark on that point:—

"As to the assertion that it will unwomanise women to open to them political careers or the profession, Mrs. Fawcett appeals to the evidence of ascertained facts in the case of women doctors.

Make her a doctor, put her through the mental discipline and the physical toil of the profession; charge her as doctors so often are charged, with the health of mind and body of scores of patients, she remains womanly to her finger tips, and a good doctor in proportion as the truly womanly qualities in her are strongly developed. Poor women are very quick to find this out as patients. Not only from the immediate neighbourhood of the New Hospital for women, where all the staff are women doctors, but also from the far east of London do they come, because "the ladies," as they call them are ladies, and show their poor patients womanly sympathy, gentleness and patience, womanly insight and thoughtfulness in little things, and consideration and their home troubles and necessities. It is not too much to say that a woman can never hope to be a good doctor unless she is truly and really a womanly woman. And much the same thing may be said with regard to fields of activity not yet open to women."

---

The National Congress is over but it is yet to be seen who will volunteer themselves the plead the cause of India at the bar of English opinion which will shortly vindicate its policy at the next general elections. We hope that due attention will be given to the para quoted below:—

"But while recommending the Congress to be held not earlier than 1893, the British Committee would strongly urge the Standing Congress Committees to take advantage of the coming General Election to send to England a number of delegates, as in 1885, able effectively to advocate the cause of India before the electors. A general election is a favourable time for such a campaign, for then is found the opportunity of addressing large and influential meetings of electors in a high state of political activity."

## वऱ्हाड.

कर्नल के. जी. एल. मेकंझी आफि० कमिशनर, वऱ्हाड यांची स्वारी सध्यां अकोलें मुक्कामीं आहे. आफिसांच्या तपासण्या चालूं आहेत. आज जिल्हा बोर्डाची सभा भरणार आहे. तारीख ७ पासून साहेब वाशीम कडे जाणार आहेत.

रा. रा. शंकर नारायण डांगे बी. ए. असि. मास्तर, उमरावती हायस्कूल यांनीं चालूं महिन्या पासून अकरा महिन्यांची रजा घेतली आहे. त्यांच्या रजेच्या वर्गावर्गीत रा. रा. गणपत राजराम जोशी (नवीन प्युपिल टिचरच्या वर्गांत पसार झालेले) यांस उमरावती हायस्कुलांत नेमलें.

कमिशनर साहेबांची अकोल्यास सरबराई व बरदास्त चांगली ठेविली गेली नाहीं ह्मणून, कांहीं पाटील व शिपाई यांस सास्पेंड केले होते परंतु साहेबांनीं माफी दिली.

गेल्या शनिवारीं मुनसिपल सभासदांची बैठक भरवून कर्नल मेकंझी साहेबांनीं लेडी डफरीन फंडाकरितां खासगी व मुनसिपल वर्गणी, वार्षिक बजेट, निराळी सिव्हील स्टेशन मुनसिपालीटी इत्यादि प्रश्ना संबंधानें वादविवाद केल्याचें कळतें.

SUBSCRIPTION



## चिनी लोक

( मागील अंकावरून पुढें चालूं )

चिनी लोक जितके मेहनती आहेत तितके च भोळसर ही पण आहेत. ह्यामुळें औषधी द्रव्यें विकण्याचा ज्याप परवाना आहे ते यांना फसवितात व लुबाडून स्वतः चंगळ करतात. हे लोक शांत स्वभावाचे आहेत व ह्या मुळें अतिशय दाट वस्तीचे प्रांतात देखील व्यवस्था राखण्याचें काम फारच सोपें आहे. यांचें भांडण झटलें ह्मणजे शद्बांच्या पलीकडे कांहीं नाहीं. एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून छिद्रें पाडण्यांत—हलकट अश्लील भाषण बोलण्यांत किंवा आवेशांत रागाचें भाषण करण्यांतच त्यांचें भांडण संपतें. एकमेकांस हलकट शिव्या देणें हें तर त्यांच्या आंगवळणींच पडलें आहे. भांडणारे पुरुष असोत किंवा स्त्रिया असोत—अथवा कुलीन असोत वा हलकट असोत—असल्या नीच प्रकारच्या शिव्या सर्वांच्या प्रचारांत सारख्याच असतात. लहान मूल शिकत असतांनाच आपल्या आईबापांच्या तोंडून त्या शिव्या ऐकून घेतें व त्याच शिव्या आपल्या आईबापास देतें—आणि त्यां पासून त्या आईबापास ही मोठें कौतुक वाटतें. असली अश्लील भाषा बोलणें हा तर आतां चिनी लोकांचा दुसरा एक स्वभावच बनला आहे मोठे सुशिक्षित व बहु कामगार लोक रागावले असता हलकट ओझेकऱ्या प्रमाणें गालीप्रदान करितात. करमणुकी खातर मध्यमपतीचे लोक तर त्या शिव्याचे गीत भररस्त्यानें गात जातात. आतां इतक्या वरून त्यांचे ठायीं ह्मणजे सभ्यपण कांहींच नाहीं असें कदापि ही ह्मणू नये. त्यांच्यांत सभ्यपणाच्या चाली इतक्या सुरेख व पूर्ण दशेस पावलेल्या आहेत कीं त्याची नुसती कल्पना देखील आपणांस करतां येणें कठीण मग त्यांचा विचार तर दुरापास्तच.

यांना वेळेची योग्य किंमत माहीत नाहीं. वेळ हा एक पैका आहे हें त्यांच्या ध्यानींमनीं सुद्धां येत नाहीं.

अर्थातच मग त्यांचे जवळ घड्याळें वगैरे कालमापक यंत्रें फार कचित् आढळतात. त्यांतून ज्यांजवळ ह्मणून तीं असतात ते त्याचा उपयोग ही करीत नाहींत - आपल्या शेतकरी लोका प्रमाणेच ते दिनमान सूर्याचे स्थानावरून ठोकळ अजमासानें सांगतात व त्या विषयीं सूक्ष्मभेद करण्याची ही त्यांस जरूरी दिसत नाहीं व हौसही नाहीं. आपले शेतकरी एक कासराभर किंवा दोन कासराभर दिवस आला असें ज्याप्रमाणें ह्मणतात त्या प्रमाणेंच दिवस एक निशाण काठी अथवा दोन निशाण काठ्या वर आला असें ह्मणतात. जर कदाचित् आकाश अभ्राच्छादित असलें तर दिनमान मांजरांच्या डोळ्यांतील कनीनिकांचे आकुंचन किंवा विकसन पाहून सांगण्याची वहिवाट आहे. एखाद्या अनोळखी परदेशस्थ गृहस्थाचे भेटीस गेले असता चिनी लोकांस वेळेचें महत्व फार कमी वाटतें. भेटीस आल्यावर आपणांकडे टकमक पहात गुपचुप पाहिजे तितका वेळ बसतात व लवकर उठून परत जाण्याची ही पण त्यास इच्छा नसते. एखादा थंडीनें कुडकुडत व थकलेला असा पाहुणा जर घरीं आला तर त्याला निजायास जागा व आंथरूण वगैरेची सोय लावून दईपर्यंत एकसारखें यनमानाशीं बोलत बसणें भाग पडतें. या चिनी गृहस्थाचे मनांत त्या बिचाऱ्या पाहुण्याच्या स्थितीची कल्पनाच येत नाहीं. चिनी लोक आले तर बहुत करून त्यांस फार बोलण्याचा कंटाळा असतो. नुसते कोणत्या कामासाठीं आपण आलों हें सांगणें देखील त्यांच्या बरेच जीवावर येतें. एकंदरीनें यांस फार बोलणें नको. हे व असले अनेक विशेष प्रकारचे गुण चिनी लोकांत आहे ते येथें सविस्तर सांगण्यापेक्षां ज्यांस विशेष माहिती मिळून घेण्याची उत्कंठा असेल त्यांनीं त्या विषया वर लिहिलेले ग्रंथ वाचावे अशी आमची त्यांस शिफारस आहे.

---

हिंदुस्थाना बद्दल इंग्रज लोकांचा समज कसा झाला आहे, ह्याचें उदाहरण दाखविलें असतां अप्रासंगिक होणार नाहीं. आपले कैवारी मि. केनसाहेब ज्या प्रमाणें आमच्या हिता करितां झटतात त्याच प्रमाणें त्यांची कन्या रूथबाई ह्यांचा ही आमच्या हिता बद्दल खटपट सुरूं आहे त्यांनीं परवां केंब्रिज यथील पोलिटिकल सोसायटी पुढें हिंदुस्थानची फौज कां कमी करूं नये असा प्रश्न आणिला होता. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, हिंदुस्थानांतील गोऱ्या फौजे पैकीं दहा हजार लोक कमी करावे त्या योगानें दोन सव्वा दोन कोटी रुपयांची बचत राहील. ह्या रकमेचा उपयोग कराचा बोजा हलका करण्या कडे करावा व मीठा वरील-करा पासून गांजलेल्या रयतेची सोडवणूक करावी. त्या बाईनीं असें ही सांगितलें कीं बाकी राहिलेली फौज सरहद्दीवर ठेवावी व संस्थानिकांच्या फौजेच्या मदतीनें देशांतील व्यवस्था ठेवावी. पुन्हां बंड होण्याची भीति आतां राहिली नाहीं हें कॉंग्रेस सभे वरून उघड होत आहे. ह्या भाषणाच्या पुष्टी करणार्थ दुसरीं भाषणें होऊन त्यांनीं ही हिंदुस्थान व इंग्लड ह्या देशांतील माणशी उत्पन्नाची तफावत दाखवून दिली व असें ही सिद्ध करून दाखविलें कीं, ब्रिटिश अमलांतील हिंदुस्थाना खेरीज दुसऱ्या कोणत्याही देशास राज फौजे बद्दल खर्च सोसावा लागत नाहीं ह्याच्या उलट जीं भाषणें झालीं तीं विषेश विचार करण्या जोगीं आहेत. वरील प्रश्न ज्यांस नापसंत होता त्यांनीं सांगितलें कीं, हिंदुस्थानचा राज्यकारभार निवडक लोकांकडून चालला असतो तेव्हां आपल्या सारख्या अजाण लोकांस त्यांत ढवळा ढवळ करण्याचें कारण नाहीं. हिंदुपना स्वभावतःच लढाईची भुकेली आहे. गोरी फौज जर त्या देशांत थोडी राहील तर संधि मिळतांच ते लोक बंडावा करण्यास कमी करणार नाहींत. शिवाय रशियाची धाड केव्हां येईल ह्याचा नेम नसल्या कारणानें सरहद्दी वरील बंदोबस्त भक्कम असला पाहिजे. हें भाषण खोडून टांकण्या करितां उलट पक्षानें सांगितलें कीं, हिंदुस्थानांतील लोकांनीं बंड करण्याचें मनांत आणिलें तर किती ही गोरी फौज निरुपयोगी ठरेल परंतु इंग्रजी अम्मलाच्या जुलमाची शिकस्त झाल्या खेरीज बंडाव्याची भीति स्वप्नींही नको आहे. शिवाय रूथबाईनीं असें ही सांगितलें कीं, सरहद्दीवर मजबूती असणें जरी जरूर आहे तरी सर्व देशभर इतकी फौज ठेवण्याचें प्रयोजन नाहीं. हिंदुस्थानचा राज्य कारभार इंग्रजांच्या स्वधीन ज्या अर्थी झाला आहे त्या अर्थी त्या देशांतील पैशाच्या खर्चाची जबाबदारी इंग्लंडावर विशेष आहे. ह्या प्रश्नावर दोनतीन दिवस वाद होऊन बहुमतानें रूथबाई यांचें म्हणणें नापसंत ठरलें. ह्या सर्व हकीगती वरून आपणास हें स्पष्ट दिसून येतें कीं इंग्रज लोकांना आमची खरी स्थिति कळविणें फार जरूर आहे. दुनिया अबाद आहे ह्या म्हणी प्रमाणें इंग्रज लोकांची स्थीति झाली आहे. ज्यांच्या कडे आपल्या बांधवांची व्यवस्था आपण सोंपविली आहे त्यांच्या कडून सर्व व्यवस्थित आहे अशा समजावर ते लोक स्वस्थ आहेत परंतु खऱ्या प्रकाराकडे त्यांचें लक्ष लागेल अशी व्यवस्था करणें आम्हास इष्ट आहे व सुदैवानें मिस्. केन सारख्या दयाळू बायांची ही आपणास मदत आहे; तेव्हां त्यांचा उपयोग करून घेण्यास आम्हीं तयार असलें पाहिजे.

---

रक्तपिती या रोगाची चिकित्सा करण्या साठीं एक कमिशन आज दोन वर्षें बसलें होतें त्याचा रिपोर्ट विलायतेस तयार झाला आहे त्यांतील कांहीं मुख्याच्या गोष्टी तारेनें कळल्या आहेत या अशा:—

रक्तपितीची व्याधि हा एक स्वतंत्र रोग असून तिचा इतर शरीरव्याधीशीं कांहीं संबंध नाहीं. संसर्गानें उत्पन्न होणारा किंवा वाढणारा असा नाहीं. कदाचित् हा रोग संसर्गापासून वाढत असेल तर तो फारच अल्प आहे. हा रोग वंशपरंपरा आहे असें ह्मणतात तेंही शोधांतीं सप्रमाण सिद्ध होत नाहीं. सान्निध्यानें रक्तपिती जडल्याचीं उदाहरणें आढळतात तेथें तेथें तो रोग होण्याचीं पूर्व चिन्हें दिसून येत होतीं आणि कधीं कधीं त्या मनुष्यांचे नजिकचे आप्त रक्तपितीनें ग्रस्त असल्याविषयीं ही मोष्ट कळून येत असे. या रोगाची वाढ मीठ लोकांस कमी मिळूं लागल्यानें दुणावली आहे असा कांहीं लोक अनुभव सांगतात परंतु त्याचा ताळा पटण्यासारखें दाखले ही पुरेसे आढळले नाहींत. समुद्र किनारा किंवा नदीकांठ या भागाच्या स्थळीं या रोगाचा फैलाव अधीक होतो असें ही कळून येत नाहीं. देवी काढण्याच्या पद्धतीनें सदरहू व्याधीचा विस्तार होत चालला आहे असा ही एक अपवाद निघाला त्याच्या यथार्थते विषयीं शास्त्रीयरीत्या प्रचिती पाहिली होती तेव्हां तो अपवाद निराधार व खोटा आहे असें कमिशनचें मत आहे. अस्वच्छता, कुग्रामवस्ती, वाण पाणी इत्यादि आरोग्यहारक गोष्टींनीं इतर रोगाप्रमाणें या ही रोगाची अभिवृद्धि होणें साहजिक आहे तेव्हां या व्याधीनें त्रस्त लोक हवाशीर धर्मार्थ दवाखान्यांत गोळा करावे, आणि होतां होईल तितकें करून असल्या पंगू मनुष्यांस यथाशक्ति प्रत्यक्षानें साह्य करावें. सरकार रक्तपितीवाल्या लोकांच्या संबंधानें वरील कमिशनच्या रिपोर्टा वरून बहुतेक सक्तीचे कायदे करणार नाहीं असें दिसतें तरी आमच्या मतें अशा व्याधिग्रस्त मनुष्यांचें दळणवळण इतर लोकांशीं कमी होईल तितकी आपली बाजू बिनधोक राहील. शास्त्रीय शोध कोणत्याच गोष्टीला सबळ पुरावा देत नाहींत त्या अर्थी चालत आले त्या लोकांच्या समजुतीस मान देणें फाय दशीर होय.

---

## वर्तमानसार.

निजाम सरकार व मि. जेकब ह्यांच्या दरम्यान हिऱ्याच्या संबंधाच्या चाललेल्या खटल्याचा निकाल तारीख २२ डिसेंबर रोजीं झाला. मि. जेकब ह्यांस सर्व आरोपांतून ज्युरीनें एक मतानें निर्दोषी ठरविलें. मि. जेकब ह्यांच्या तर्फेचे बारिस्टर मि. इनव्हेरॅरिटी ह्यांनीं आपल्या कुळास पोलीस कोर्टांत असलेला हिरा व पैसा मिळावा असा अर्ज केला. त्यावर निजामसरकारचे बारिस्टर मि. वुडरॉफ ह्यांनीं अशी हरकत घेतली कीं, तो पैसा, व तो हिरा मि. जेकब ह्यांच्या ताब्यांत देतां कामा नये. कारण त्या संबंधानें दिवाणी कोर्टाचा मनाई हुकूम झालेला आहे परंतु मि० जस्टिस वुइल्सन ह्यांनीं आपणांस दिवाणी कोर्टाच्या मनाईच्या हुकुमाप्रमाणें वागतां येत नाहीं व आरोपीस पैसा व हिरा मिळण्यास हरकत नाहीं, असा ठराव केला, आतां मि० जेकब ह्यांजवर दिवाणी मध्यें दावा करण्यांत आला आहे. न्या० सि०

अहमदनगर जिल्ह्यामध्यें कित्येक ठिकाणीं थंडीचें कडक पडत आहे. दुष्काळाचें स्वरूप श्रीगोंदे, कर्जत व शामखेड या तालुक्यांत विशेष प्रखर भासूं लागलें आहे.

गोकाक येथें, दुष्काळपीडित लोकांनीं तेथला बाजार लुटला, असें समजतें.

कलकत्ता येथें व त्या शहराच्या आसपास नुकतीच बरीच मनुष्यें भुकेनें व्याकुळ होऊन मरून पडलेलीं आढळलीं. दुष्काळ सिकंदरी आहेच! सु० प०

यूरोपांतील लढाची तयारी.

आफिसरांनीं आपल्या तरवारी पाजळून तयार करण्याकरितां पाठवाव्या असा रशियन सरकारानें आपल्या कामदारांस हुकूम केला आहे. येत्या वर्षाच्या आरंभीं हल्ला करण्याचा इरादा दिसतो.

आस्त्रियन सरकारच्या लढाऊ खात्याच्या बजेटांत ज्या रकमा घातल्या आहेत त्यांचा तपशील पुढील प्रमाणें आहेः— रिपीटींग रायफल बंदुका तयार करण्याकरतां २०,००,००० आस्त्रियन नाणे; तोफांकारतां २,९०,०००; बिन धुराच्या दारूकरतां २६,००,०००; बिस्किटें वगैरे खाण्याचे पदार्थ विकत घेण्याकरतां ८,९८,०००; गालेसियांतील दोन किल्ल्यांच्या दुरुस्तीकरतां १०,००,०००; मध्ययुरोपाचा राजकीय नकाशा तयार करण्याकरतां ६५,०००; घोड्याच्या खरेदीकरतां ३४,२०,६६८ व बोस्निया आणि हरजगोविना यांत फौजेस राहाण्याच्या सोई करण्याकरतां ४४,३५,०००.

स्टेग येथील हत्यारें करण्याच्या कारखान्यांत बलगेरियाकरतां बंदुका तयार होत आहेत. येत्या आगष्टांत ४०००० तयार होतील व १८९४ त १,५०,००० तयार होतील. रिसाल्याचीं हत्यारें तयार करण्याचें काम लवकरच सुरू होणार आहे. अंटवर्प येथील तटबंदीकरतां ५,५०,००,००० नाणें खर्च करण्याचें ठरलें. ठा० अ०

---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचाराची किंमत
वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास ........................ ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

SUBSCRIPTION
Rs.
annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..................................4as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per lin3as

VOLXXVI AKOLA MONDAY II JANUARY 1892 NO 2

वर्ष २६ अकोळा सोमवार तारीख ११ माहे जानेवारी सन १८९२ इ० अंक २

नोटीस.

दुलबी मर्दे बेटणोया माहार राहणार निंबा तालुके बाळापूर यांसः—

नोटीस देणार कस्तूरचंद गुलाबचंद मारवाडी दुकान निंबे नोटीसीनें असें कळवितो कीं, तुझेवर आमचा हुकूमनामा झालेला तयार आहे. त्याजबद्दलचे रुपये नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत देऊन निकाल करावा. असें केलें नाहीं तर रीती प्रमाणें पुढें तजवीज करून निकाल होई पर्यंत जें नुकसान वगैरे होईल तें भरून घेतलें जाईल. कळावें.

तारीख ४ माहे ज्यानेवारी सन १८९२

(सही)

कस्तुरचंद गुलाबचंद

मारवाडी द. खु.

---

नोटीस.

रा. रा. विठुबा वल्लद नंदाजी कारभारी पाटील कान्हेरी तालुके बाळापूर यांसः—

नोटीस देणार असराजी वल्लद जानजी माळी नावकार रहाणार कान्हेरी तालुके बाळापूर नोटीशीनें असें कळवितो कीं, तुमचे आमचे समाईक केळीचा मळा तुह्मी आह्मांस तुमचा हिस्सा रुपये २१२०८ व आमचा हिस्सा २१२०८ मिळून रुपये४२५ सवदा करून त्यांत आह्मी तुमच्या वाटणीचे रुपये २१२०८ दिलें त्याचा तपशील रुपये रोख १२०८ देऊन खात्यावर तिकीट लावून रुपये २०० शेंकडा १०४ व्याज देण्याचें कबूल करून खात्यावर सही करून दिली. नंतर सदरहू केळी बागेंतील तोडण्यास लागणार इतक्यांत तुह्मी आमच्या पाशीं थापा मारून व आमचे सर्वपरीनें नुकसान करण्याच्या इराद्यानें तुह्मी आमच्याशीं बऱ्याच थापा मारून त्या वेळीं केळीं तोडूं दिल्या नाहींत आणि आह्मास रोख रुपये द्या म्हणजे केळी तोण्यास देतो असें सांगितलें. त्यानंतर आम्ही तुमचे सांगण्या प्रमाणें रुपये २१५०४ रोख दिले. व हें रु. तुमचे वहीखात्यावर मांडून घेतले आहेत. असें असतां आम्हास नकळत परभारें तुम्ही आमच्या संमती शिवाय फाजल बागवान यांस केळीचा बाग विकला. याज करितां तुम्हांस असें कळविलें जातें कीं, सदरहू बाग तुम्ही विकला त्यांत आमचे रु. ३०० नफ्याचे व तुह्मास नगद दिले ते एकंदर रु. २१५०४ व एकदां १२०८ आणे मिळून रु. ५२७०१२ आणे नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत आणून देऊन पावती घ्यावी. असें नाहीं केलें तर रीती प्रमाणें तुमचेवर काम चालवून अखेर निकाल होईपर्यंत व या नोटीशीच्या खर्चा सुद्धां सर्व नुकसान भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटीस. ता० ६ माहे ज्यानेवारी सन १८९२ इ०

[ सही ]

आसराजी वल्लद जानजी

माळी नावकर वस्ती

कान्हेरा द० खु०

---

## गोरक्षणी सभा

नागपूर गोरक्षणी सभेच्या सेक्रेटरी कडून खालील विनंती भारतनिवासी मंडळीस करण्यांत आली आहेः—

सांप्रत शेती आपल्या लोकांस मुख्य जीवनाधार झाली आहे. देशांतील इतर सर्व उद्योग धंदे सफाई बुडाल्या कारणानें आपल्या देशांतील शेंकडा ८६ लोकांस नांगर हातीं धरावा लागला आहे व प्रतिवर्षी हजारों लोक उपजीविकेसाठीं शेतीकडे धांव घेत आहेत. असें असून शेतीची अवस्था पाहिली तर दिवसें दिवस तिची किफायत कमी होत चालली आहे. शेतीची अशी दुर्दशा होण्याला जीं अनेक कारणें झालीं आहेत त्यांपैकीं रोग, उपासमार, व कत्तल यांच्या योगानें होणारा गुरांचा अतोनात संहार हें एक मुख्य कारण आहे. हें अरिष्ट सध्यां इतकें बळावत चाललें आहे कीं त्याच्या भयंकर बाढीला प्रतिबंध करण्यास वेळेवर उपाय केले नाहींत तर आपली शेती रसातळास जाऊन प्रजेला अन्नान्न दशा योण्याची भीति आहे. वरील गोष्ट लक्षांत आणून गुरांचें रक्षण व सुधारणा करून शेतीच्या उन्नति करितां होईल तेवढी मदत करावी या उद्देशानें या शहरीं १८८८ सालीं एका गोरक्षणी सभेची स्थापना झाली आहे. ही सभा स्थापन झाल्या पासून गोरक्षणाच्या कामीं तिचा उद्योग अव्याहत चालला आहे. या सभेनें आजपर्यंत काय काय कामें केलीं याची काहींशी कल्पना पुढील गोष्टींवरून दिसून येईलः—

(१) मध्यप्रांतांतील निरनिराळ्या ठिकाणीं व वऱ्हाडप्रांतांत मिळून या सभेनें एकंदर ६५ शाखा सभा स्थापन केल्या आहेत. या शाखा सभा नागपूर सभेच्या अनुरोधानें गोरक्षणाच्या कामीं प्रयत्न करीत असतात.

(२) सभेच्या उपदेशानें आजवर ३०,००० वर महार, मांग, गोंड वगैरे गोमांस भक्षक लोक त्या निंद्य कर्मा पासून परावृत्त झाले आहेत.

(३) सभा स्थापन होण्यापूर्वीं नागपूर येथील गोवध शाळेंत १६२७ गाय बैल मारले जात होते ते कमी कमी होत जाऊन गेल्या जुलई महिन्यांत त्यांची संख्या अवघी ४८७ होती.

(४) जागो जाग भरणाऱ्या बाजारात कसाई लोकांस आतां पूर्वीं सारखीं गुरें विकत मिळत नाहींत खेड्या पाड्यांतील गोमांस भक्षक लोकांनीं गोमांस खाणें वर्ज केल्यामुळें बाहेरगांवीं कसायांचीं जीं दुकानें पूर्वीं चांगलीं चालत असत तीं दुरोवस्त बंद पडलीं आहेत.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती पौष शुद्ध १२ शके १८१३

सर्वांस माहीत आहे कीं, हिंदुस्थान देश अगदीं भिकार आहे. १८७३ सालीं फायनान्स कमिटींत लार्ड लारेन्स बोलले कीं, इंडियांतील बहुत लोक इतके दरिद्री आहेत कीं, त्यांचा चरितार्थच पराकाष्टेनें कसा तरी चालतो. मनुष्यानें आपल्या बायका पोरासाठीं पुरेसें किंवा अर्धमुर्धे अन्नवस्त्र मिळविलें ह्मणजे त्यानें बहादुरी केली समजावयाची. चैनीचे अगर खुशालीचे खर्चा विषयीं तर गोष्टच नको. इंडिया बजेटावर बोलतांना मि. एस. स्मिथ ह्मणाले कीं सर्व जगामध्यें हिंदुस्थानची प्रजा फार भिकारी आहे आणि ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. सरकारी कागदपत्रावरून असें अनुमान निघतें कीं हिंदुस्थानांतील लोक संख्येच्या तीन चतुर्थांश इतक्या लोकां जवळ तुरुंगांतले कैदी खाऊन खुशाल असतात तितक्या सुद्धां खुशालीनें राहण्या पुरतीं साधनें नसतात. खरोखरच, दारिद्र्याचा घोर आपल्या मागें लागला आहे आणि त्यांत वाईट गोष्ट ही कीं हा घोर वाढतो आहे. आमचे उद्योग सफै व सर्वैव बुडाले आणि त्यामुळें आमचे कारागीर लोक रसातळास पोंचले. चालूं शतकाच्या आरंभापर्यंत कपडालत्ता आपल्याला पुरेसा देशांतच तयार होई आणि शिवाय कांहीं बाह्य प्रदेशीं रवाना होत असे. कापुसा पासून तयार केलेला माल फक्त तेव्हां देशांतरीं जात असे परंतु सध्यां सर्व कापूस जसाचा तसाच बाहेर जातो. सन १७९८-९९ त इंडियांतून दीड कोटी किंमतीचें कापड चोपड विलायतेस गेलें आणि सन १८८८-८९ त इंग्लंडाहून २९ कोट किंमतीचा विलायती कपडा इंडियांत आला आहे. एका शतकापूर्वीं कारागिरांचा फायदा देशांतल्या देशांतच राहत असे व देश सधन असे; आणि आतां त्या फायद्याचा प्रवाह वाढता आहे व तो युरोपांत जोरानें वाहत आहे. कारागिरीच्या कामधंद्यावर कारागिरांची बहुतेक संख्या पोशिली जात असे परंतु सध्यां तिला पोटासाठीं शेतकरी किंवा काबाडकष्टवाले व्हावें लागत आहे. बंगाल सरकारचे सेक्रेटरी मि. एच. एस काटन साहेब लिहितात कीं, एक वर्ष असें जात नाहीं कीं ज्या वर्षीं कमिशनर व डिस्ट्रिक्ट अधिकारी देशाच्या सर्व भागांतील कारागीर लोक दिवसेंदिवस दरिद्री होत चालल्या विषयीं कांहीं कळवीत नाहींत. कारागिरीचे धंदे बुडत जाऊन शेतीचा फैलाव अधिकाधिक होत आहे. मोठमोठ्या कारखान्यांचीं शहरें वसलीं होतीं तेथें सध्यां ल्हान ल्हान खेडीं बनलीं आहेत. असें गणीत झालें आहे कीं, आपल्या लोक संख्येपैकीं शेंकडा नव्वद लोकांची उपजीविका शेतीवर चालली आहे. परंतु आमचे लोक जसे निव्वळ शेतीकडे लागले त्या मानानें शेती पुरता जमिनीचा विस्तार नसून तो फार थोडा आहे. सर जेम्सकर्ड दुष्काळ-कमिशनर ह्मणून सन १८७८ त आले तेव्हां ही स्थिती पाहून त थक्क झाले. ते ह्मणाले— इंग्लंडांत एका औरस चौरस मैल शेती चांगली लागवडीची असली तर त्यावर पन्नास माणसांचें काम चालतें ह्मणजे पंचवीस तरुण व वृद्ध पुरुष आणि पंचवीस बायका व मुलें. जर याचा चौपट संख्या ह्मणजे दोनेंशें माणसें लागवडीच्या प्रत्येक औरस चौरस मैलास इंडियांत धरिली तरी सुद्धां अवघ्या एक तृतियांश लोक संख्येचा समावेश होईल. जमिनीवरील सरकार देणें हळूं हळू वाढत्या प्रमाणावर आहे. फार काळ लोटला नाहीं तोंच जमिनीच्या उत्पन्नांतून हीं देणीं फिटणार नाहींशीं होतील कांकीं धान्याचें पीकपाणी वाढल्या खेरीज उपाय नाहीं आणि तें तर वाढण्याचा संभव अगदीं यथातथाच आहे. सरकारनें स्वतां शेती वहितीस घेऊन सुधारण्याचे प्रयत्न केले त्यांच्या पासून तादृश फायदा कांहींच झाला नाहीं शेती प्रकरणांत निष्णांत डाक्टर व्हाअलकर यांस हिंदुस्थान सरकारनें आपल्या देशांतील शेती सुधारण्याचे उपाय शोधण्याविषयीं मुद्दाम नेमलें होतें आणि इंडियाचा प्रत्येक भाग पाहिल्या नंतर ते ह्मणतात कीं— शेतकीची पद्धत जुनाट व अडाणी आहे अशा कल्पना लोक करितात त्या विषयीं निःसंशय कांहींच आधार दिसत नाहीं. मी असें ह्मणतो कीं शेतकऱ्यांना सुधारणा शिकविण्याचे प्रयत्न निष्फळ झाले कां कीं त्यांना त्यांच्या शेतीची माहिती परिपूर्ण होती आणि त्यांना शिकविण्यासाठीं जे आले त्यांच्या पेक्षां ते अधिक वाकबगार होते.

---

## 'वेळेचा मितव्यय'

भाषांतर रूपानें

[ लिहून आलेला मजकूर ]

एक प्रख्यात इतालियन गृहस्थ नेहमीं म्हणत असें कीं माझी वेळ हीच माझी दौलत होय; आणि या दौलती विषयीं इतर जिनगी प्रमाणेंच ही गोष्ट खरी आहे कीं तरूण मनुष्याच्या हातीं ती लागली म्हणजे बहुतेक उधळेपणानें फडशा होई पर्यंत तिची किंमत त्यास कळून येते असें विरळा. एकदां

आरंभीं ज्या मनुष्यानें तरुणपणीं पेरणीचे मौल्यवान दिवस फुकट घालविले त्यास वार्धक्यांत पोसमाच्या वेळीं फळ म्हणून कांहीं एक मिळणार नाहीं. धन नष्ट झालें तर उद्यागानें पुन्हा मिळतें, विद्येचा विसर पडला तर अभ्यासानें पुन्हा साध्य होते, प्रकृती बिघडली तर नेमस्त पणानें किंवा औषधोपचारानें पुन्हा ताळ्यावर येते परंतु वेळ गमावली म्हणजे ती अक्षयीं गमावली. काम मर्दपे हयगय झाली ह्मणजे लोक सबबी सांगतात त्यांच्या लांबलचक यादी मधील फुरसत नाहीं याहून कोणतीही निराळी सबब वारंवार लोकांच्या तोंडून ऐकूं येत नाहीं किंवा याहून कोणत्याही अन्य सबबीनें आपण आपली अधीक फसवणूक होऊं देत नाहीं. वेळ फावला तर आह्मी ह्या त्या पाहिजे तितक्या गोष्टी करूया असत्या अशा कल्पनेनें लोक आपल्या स्वतांस ठकवितात. विवेकानें हजारो गोष्टी करणें भाग वाटले तरी त्या पासून असल्या सबबीवर सुस्त व अपमतलबी लोक आपल्यास सोडवून घेतात आतां खरोखर असें आहे कीं रिकामपणीं एखादें चांगलें काम करण्याचा संभव कमी असतो तसा कमी कोणत्याही अन्य स्थितींत नसतो.

आपलें व लोकांचें कल्याण पुष्काळ कोणी कोणी केलें आहे हें शोधून पहा ह्मणजे तुह्माला कळेल कीं—ते कोण होते? श्रीमान, रिकामटेकडे लोक ज्यांना मुबलक वेळ आहे आणि कांहीं काम नाहीं असे लोक कीं काय? नव्हे. जानेवारी पासून तों तहत दिसेंबर पर्यंत सदासर्वकाळ कामधंद्यांत निमग्न असतात ते लोक हे होत. अशा मनुष्यांच्या पाठी मागें किती ही कामाचा रगडा असला तरी त्यांच्या हातून आणखी थोडें काम होईल असें कळून यईल; आणि आळशी मनुष्यापेक्षां त्याच्या भरंवशावर दुसपट विश्वासानें त्यांच्या ऐन कामाच्या गडबडींत ही तुह्मी स्वस्थ रहा.

स्वाभाविकपणें आपलें मन असें आपणांस सांगतें कीं, जो कोणी पुष्कळ काम करितो त्याला फार करून अधीक करितां येईल. आणि तेंही उत्तम सुयंत्र होईल. याला कारण कीं काम करितां करितां तें करण्याची शक्ती वाढते ( गाता गळा आणि शिंपता मळा ) आणि जो कांहीं करीत नसतो त्यानें उठून कांहीं करण्यापेक्षां जो नेहमीं उद्योगांत गढला असतो त्याला थोडें जास्त काम करितांना अधीक सोपें जातें

उद्योगी पुरुषाला पत्र लिहिण्यास सांगून दहा मिनिटांचा अवकाश द्या म्हणजे तो लागलीच तें पत्र लिहून टाकील; एखाद्या आळशाला एक दिवसाची मुदत द्या तरी तें लिहिणें तो उद्यावर किंवा पुढील आठवड्यावर लोटील. उद्योगी लोकांच्या अंगीं एक प्रकारची शक्ति असते तिच्या प्रभावानें बहुतेक त्याला आपलें काम तडीस नेतां येतें तें ज्या प्रमाणें एखाद्या चक्रास जोरानें चलन मिळालें म्हणजे तें अगदी हळूं गती देत गेल्यानें ही एक सारखें फिरत राहतें त्या प्रमाणें होय.

जे महान् महान् कामें करितात ते तीं बिम्मेपणानें व अव्याहतपणें क्षणाक्षण हिशोबीं धरून करीत असतात. तितकें लहर येईल तेव्हां मेहनत केल्यानें जुळत नाहीं. त्यांचा नैसर्गिक कल मेहनतीच्या उद्योगाकडे असतो आणि हा गुण फार चांगला होय. थोडथोडा विरत गेल्यानें दगड ही विरून जातो या घटकेला थोडें दुसऱ्या घटकेला थोडें असें मिळून दिवसा दिवसानें व वर्षा वर्षानें पुष्कळच काम होतें. मोठमोठाली घरें सुद्धा एका दगडावर दुसरा दगड या प्रमाणें रचल्यानें तयार होतात.

तर मग कोणतें ही काम करण्याला फुरसत नाहीं अशी रड गाऊं नका. उलटें ईश्वराचे आभार माना कीं रिकामपणाच्या शापांतून तुम्ही मुक्त आहां का कीं रिकामपण म्हणजे दहा पैकीं नउजणांस शापाप्रमाणें वाटत असतें. एखादी चांगली गोष्ट सिद्धीस नेण्याचें तुमच्या मनांतून फार फार असलें आणि त्या साठीं तुम्हास संबंद महिनाभर आठवडाभर किंवा एक दिवसभर सुद्धा वेळ नाहीं त्यास काय उपाय म्हणून तुम्ही स्वस्थ रहाल व हात जोडून निराश बसाल कीं काय? नाहीं. याच विचारानें तुमच्या मनांत प्रेरणा होऊन या आपल्या चंचल व भंगुर आयुष्यांत साध्य होईल तितकें करण्या विषयीं तुम्हास हरूप चढला पाहिजे.

आपल्या वेळे पैकीं रिकामा फुटकळ वेळ उपयोगांत आणून उभारतां येईल असें काम करण्या विषयीं प्रयत्न करा का कीं हे विसकळित भाग लहान लहान दुर्लभ असल्या मुळें अधीक किंमतीचे आहेत. असें सांगतात कीं टाकशाळेंत सोन्याच्या कामाच्या खोलींतली जमीन कांबींच्या योगानें जाळीदार केलेली असते ह्मणजे त्या त्या जाळींतील खळग्यांत त्या त्या मौल्यवान धातूचे गळणारे कण सांचले जावे आणि दिवसाचें काम आटोपतें तेव्हां त्या कांबीचा सांचा उचलतात आणि सोन्याचे रज झाडून गोळा करितात ह्मणजे पुढे त्याचा रस ओतून नाणीं पाडतां यावीं.

ह्या वरून वेळेचा अत्युत्तम व्यय करण्यास शिका तेचें मौल्यवान कण वेचून घ्या; मोठ्या दक्षतेनें आयुष्यांतील पाविलग व विसकळित भागाचा ह्मणजे दिवसातील अवशेषाचा आणि घटकाच्या विभागांचा नीट उपयोग करा कांकीं पुष्कळ लोक यांचा आयुष्यातील निरर्थक भाग मामध्य भरणा करीत असतात. आणि तेणें करून तुह्मास विपूल फुरसत सांपडेल. हें पक्कें लक्षांत वागवा कीं तुह्मी आपल्या क्षणा क्षणा विषयीं कृपण रहाल, निरानराळ्या मिनिटांचा व अर्ध घटकांचा संचय कराल तर तुह्मी निदान ज्ञान संपन्न व्हाल, चांगल्या कृत्यांचें बीजारोपण समृद्धीनें कराल आणि सहस्रावधि लोक ज्यांचा सर्व वेळ रिकामा पडतो त्यांच्या पेक्षां तुमची मातबरी अधीक होईल.

---

राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सालाबाद प्रमाणें सामाजिक सभेचा सहावा समारंभ चांगल्या प्रकारें शेवटास गेला. संमती बिलानें देशामध्यें दुही व फाटाफूट झाली होती तेव्हां त्या बिलास प्रतिकूळ असे एक जंगी गृहस्थ ( रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे बी. ए. एल्. एल्. बी. ) वरील सभेच्या अध्यक्ष स्थानीं होते ही गोष्ट उत्तम झाली. सामाजिक सभेचे अग्रणी राव बहादूर रानडे, रा. रघुनाथ राव प्रभृति लोक आहेत तव्हां त्यांनीं वरील कलृप्ति मोठ्या धोरणानें लढविली हे सहजीं कळेल. सामाजिक सुधारणा सर्वांस पाहिजे आहे परतु कायद्यांच्या मार्गानीं नको एवढाच त्या बिलाच्या समयीं मतभेद होता आणि तो नेहमीं कायम राहील.

राजकीय गोष्टींत आपण पुढे पाऊल टाकीत आहों त्या बरोबर सामाजिक प्रकरणांत आपलें पाऊल पुढें पडत जाईल तरच राजकीय व सामाजिक उन्नतींची सांगड व्यवस्थेशीर बसेल हें उघड आहे. आणि ही सांगड चांगली जुळली आहे हे प्रांताप्रांतांतून सामाजिक सभेच्या पोट सभा निघाल्या आहेत त्यांच्या इतिहासावरून व मुख्य सभेच्या वार्षिक बैठकी वरून स्पष्टपणें कळून येत आहे. गेल्या सामाजिक सभेंत जीं प्रकरणें निघालीं होतीं त्यांचा गोषवारा येणें प्रमाणें—

१ मुली बद्दल हुंडा घेतात तो तिचें धन ह्मणून स्वतंत्र ठेवावा. पैसे घेऊन मुलीचा विक्रय करण्याची चाल शास्त्रानें निषिद्ध आहे. बंगाल व कलकत्ता हाय कोर्टाचे त्या शास्त्राला धरून निकाल होते परंतु मद्रास हाय कोर्टानें हा हुंडा कायदेशीर आहे असा निकाल केला ही गोष्ट वाईट झाली. मुली प्रमाणें मुलाबद्दल ही हुंडा घेऊं नये किंवा घेतल्यास तो मुलीच्या नांवानें अमानत ठेवावा अशी ही उपसूचना झाली परंतु ती बहुमतानें नापसंत ठरली.

२ एक बायको जीवंत असतां दुसरी करूं नये. मनूनें सांगितलेल्या अडचणीच्या प्रसंगीं मात्र दुसरी बायको करण्यास अपवाद नसावा.

३ समुद्र पर्यटणास पर्यटणाच्याच कारणास्तव बहिष्काराची शिक्षा असू नये.

४ पुनर्विवाह झालेल्या दंपत्यांशीं परोटीव्यवहार करण्याचा प्रघात घालावा.

५ बायको नांदण्यास येत नसेल तर तिला कैदेत टाकणें नवऱ्याच्या खुषीवर असतें तर ही कैदेची शिक्षा रद्द करण्यांत यावी.

६ हिंदु मुसलमाना मधील तंटे मिटविण्या साठीं सरकार मार्फत उभय लोकांच्या पंचायती निवडण्यांत याव्या आणि त्यांच्या मार्फत आपसांतील सर्व वादांचा निकाल व्हावा.

७ विधवा स्त्रियांच्या केशवपनाची चाल बंद करावी.

आणि ( ८ ) ज्या जाती मधून रोटी व्यवहार चालतात त्यांच्या मध्यें बेटी व्यवहार चालू करावेत.

---

समुद्र पर्यटणा संबंधानें पुष्कळ उहापोह झाला तितका आमच्या मत नको होता. देशकार्या साठीं विलायतेस परत जाऊन आलेले असे दोन गृहस्थ आमच्या वऱ्हाडांत आहेत. त्यांस बहिष्कृत केल्याचें आम्हास ठाऊक नाहीं त्यांस अद्याप ब्राह्मणांत लेखितात तेव्हां लोक धर्माच्या अडचणी समुद्र पर्यटणाला लागूं करीत नाहींत. कालदेशमाना प्रमाणें धर्माची बंधनें शिथील आहेत ही आनंदाची गोष्ट होय. विलायतेस जातात त्या लोकांनीं सोवळ्याची धावळी नेसून गळ्यांत रुद्राक्षाच्या माळा घालून तिकडे स्नान संध्या करावी व मद्यमांसाचें सेवन न करितां ताकभातावर राहावें आणि येणें प्रमाणें देशरिवाज पाळावे असें म्हणणारे दुधखुळे लोक विरळा आढळतील. देशरिवाज सोडूं नये असा लोकांचा आग्रह असतो तो यथार्थ आहे. विलायतेस जाणारी मंडळी केन साहेबांच्या ताल्मींत राहिली म्हणजे देशरिवाज काडीमात्र बिघडणार नाहींत अशी आमची खात्री आहे. दुसरी खेदाची गोष्ट अशी दिसुन येते कीं प्रवास करून परत आलेले लोक आपल्या जुन्या चालीरीतीस गुंडाळून ठेवितात आणि स्वैर व अद्वातद्वा वर्तनास आरंभ करितात म्हणून त्यांच्या आप्तमित्र मंडळीस त्यांचा तिटकारा ही येतो. आणि आचार विचार सोडण्याची पद्धत बंद व्हावी म्हणून देशरिवाज जे कोणी पाळताल त्यांसच बहिष्कृत करूं नये म्हणून उपसूचना आली होती परंतु बखेडा होऊन सर्व गोष्ट बाजूस पडली.

---

सामाजिक सभा लोकांच्या तिरस्काराला पात्र होते याचें दिग्दर्शन केशवपनाच्या सूचने वरून होईल. त्या सभेच्या ठरावांच्या सूचीपत्रांत कायद्यानें केशवपनाची चाल बंद करावी असा उल्लेख होता. सौ. काशीबाई कानिटकरीण आणि सौ. रखमाबाई मोडकीण यांनीं किती ही चांगलीं भाषणें केली तरी सरकारचा कायदा पाहिजे आणि अठरावें वर्ष लागल्या नंतर विधवा स्त्रीनें पंचा समक्ष किंवा माजिस्ट्रेटा समक्ष आपल्या केशवपनाला परवानगी दिली पाहिजे असें ह्मणण्या इतक्या आमच्या आर्यमहिला निर्भीड, स्वतंत्र, सुशिक्षित, व मनानें संस्कृत झाल्या नाहींत तों पर्यंत आमचें नष्टचर्य शिल्लक आहे असें आह्मी ह्मणतो. कसें ही असो, कायद्याची बाब रद्द झाली ह्मणून ठीक झालें.

---

वऱ्हाड प्रांतांतील वतनदारांची सभा निद्रिस्त झाली कीं काय असा पुष्कळजण प्रश्न करितात परंतु त्याचा जबाब होय ह्मणून द्यावा अगर नाहीं ह्मणून द्यावा हें आम्हांस समजत नाहीं. त्या सभेच्या अस्तित्वावर आमच्या अनेक गोष्टी अवलंबून आहेत. सध्यां ही संस्था ज्या स्थितींत आहे त्या स्थितींत ती असून ही नसल्यांत जमा आहे. वऱ्हाड प्रांतांत वतनदार पुष्कळ आहेत. तेच म्हणण्या सारखे जुने घरंदाज आहेत त्यांच्या गर्भश्रीमंती पलिकडे त्यांच्या पाशीं निराळा ऐवज कांहीं दिसत नाहीं. सांप्रतच्या इंग्रजी न्याय कोर्टांतून जमिनी संबंधाच्या भांडणतंट्यामध्यें ते लोक सफै ठार बुडत चालले आहेत. ही शोचनीय स्थिती दूर व्हावी आणि त्यांचे वडिलोपार्जित हक्क व अधिकार हिरावून घेतले गेलेले त्यास परत मिळावे. एतदर्थ ही सभा स्थापिली आहे परंतु तिची हालचाल अगदीं बंद पडली आहे असें वाटतें. बंगाल्यांत 'जमिनदारी पंचायत' नांवाची सभा आहे आणि मद्रासेकडे ही जमीनदारांची निराळी सभा आहे त्या सभांचीं कामें ऐकूं येतात तो चांगली वाखाणण्या सारखीं आहेत. मद्रासच्या सभेचें निराळें न्यायकों

डत आहे त्या समोर एका दाव्याचा निकाल होऊन त्याची अमलबारी झाली. पुढें त्याच दाव्यांत एका साक्षीदारानें खोटी साक्ष दिली म्हणून त्यांजवर खोट्या प्रतिज्ञेच्या कलमा प्रमाणें फौजदारींत खटला व्हावा म्हणून त्या सभेपुढें अर्ज आला होता परंतु फौजदारी खटले चालविण्याचा अधिकार नाहीं म्हणून सभेनें तो अर्ज नामंजुर केला. इतर इलाख्यांत एवढी उन्नावस्था झाली आहे आणि आमच्या ईकडे वतनदार सभेचा मागमूस ही कोणाला लागत नाहीं. वतनदार सभा हें कांहीं एका दोघांचें काम नाहीं. सर्व वतनदार लोकांनीं एकदिलानें त्या सभेची उठावणी केली पाहिजे आणि तसें करण्यांत त्यांचेच कल्याण आहे हें वारंवार सांगण्या हून आम्हांस कांहीं अधीक करितां येत नाहीं.

# The Berar Samachar

MONDAY, JANUARY 11, 1892

In spite of the forebodings and the uncompromising hostility of its pronounced enemies, the seventh session of the Indian National Congress proved, we may say without fear of contradiction, to be an unqualified success. Anxious fears were entertained by those who sympathized with the grand national movement that the Nagpur Session would, for various reasons, fall short of that degree of success which its predecessors had achieved, and there was a regular, to use the words of the brilliant orator Mr. Banerjea, jubilation in the camp of the enemy who contended that the Congress was at the beginning of its end. All, however, passed off splendidly well and once more and at a critical stage in its youthful career, the leaders of the Congress have emphatically proclaimed to the world that it shall live, and live for ever.

The preparations for the Nagpur Congress were as satisfactory as could be desired and the arrangements for the accommodation of the delegates that had come there from the remotest parts of the country were, thanks to the members of the Reception Committee and to their indefatigable chairman, Mr. Narayan Swamy Naidu, admirable and completely satisfactory. A spacious pandal highly ornamental in appearance and sufficient to seat about 7000 persons was erected at great cost and trouble in the centre of the Lal Bag premises which for the purpose of the Congress were lent gratis by their generous lessee Mr. Narayan Swamy. The delegates to the number of between 800 and 900 and a vast concourse of visitors having taken their seats, the proceedings were opened with a speech from the chairman of the Reception Committee, who in befitting terms welcomed the delegates and the visitors to the Congress. It was gratifying to learn from the chairman that not only he had not to overcome any difficulties arising from an unsympathetic official interference such as the Congress had to baffle with at its previous sessions, but that he was in a position to pay a high compliment to the magnanimity of Mr. Mc Donnel, the Chief Commissioner Central Provinces, who, the chairman said, had done everything to assist the Congress-men in bringing about the gathering. It was indeed peculiarly happy to see the chairman making a reference to the high-mindedness and the generous views in regard to the Congress, of our own popular Commissioner Colonel Mackenzie. Well might the chairman say that if all the officials were like Mr. Mc Donnel and Colonel Mackenzie, we never would have a need of a National Congress.

The inaugural address of the President elect Rai Bahadur Ananda Charlu, was a sample of a learned, thoughtful and comprehensive speech. We have no space at our disposal to reproduce it in extenso, but we would strongly recommend our readers to read it and re-read it. In a modest and dispassionate manner the President recapitulated the achievements of the congress during its 6 years' career and drew a hopeful forecast of its future work. After an extremely well-merited tribute of praise to Mr. Hume who, he said, 'through good report and evil report, and at the sacrifice of health, money, well-earned ease and peace of mind had steadily and earnestly adhered to his labour of love in the progressive interests of the people of this country' the President demonstrated the propriety of designating the movement as the Indian *National* Congress. The fusion of sectional and sectarian jealousies was, he said, the magnificent result of the congress as a mighty *nationaliser*. This is the subjective benefit the congress has secured for us. Amongst the objective results summarised by the President the most significant was the fact of the gradual recognition at the hands of the Govt. of the claims of the congress to be looked upon as an established constitutional party.

The President alluded to many other important points, but it is unnecessary to refer to them here. The question of highest moment for the deliberation of the delegates this year was whether the Congress was to suspend its annual sessions in India until after the contemplated Indian Congress in England which might, so far as the probabilities stand at present, not be before 1894 or whether it was to hold its yearly sessions as hitherto. We are extremely glad that the Congress with one voice adopted the latter view.

---

The Bombay Commander in Chief at Rajkote.— It was a source of immense gratification to read the address which the Chief of the Bombay Army delivered for the benefit of the young princes at the Rajkumar College. He advises the princes to do exactly what they must do and will have to do in future in their several states. Princes must as a matter of course be excellent soldiers if they wish to live in the world as princes. This the good old general admonishes them to do as the first and foremost thing. Manly exercises are not practised in India to as great an extent as they are practised elsewhere. The result of this has been utter degeneration of the Indian race. Instead of having education of the present character spread far and wide in this country, it would have been immensely better to have physical education in its place. The interests of both England and India are bound together to the end of times; and if the Indian race must exist it must become as strong as their English fellow subjects. Then England alone will be able to do some good to the people of the country.

The Indian people again have an idea that every person is equally good like any other and is capable to discharge the duties of any office he is put in. For example an ordinary clerk in some office thinks that he can as well perform the duties of the head clerk as the Head clerk does, a junior pleader thinks that he is as clever as the most senior in the profession; an assistant teacher thinks that he is as good as the head teacher; and the same rule is held good all over the different stations in life. This peculiarly Indian idea is not encouraged by the Chief. He says—"it is given to few men to command well until they have been themselves commanded" The Indians as a rule, of course there are many noble exceptions, know not how to command. Their children are not taught to render implicit obedience to their parents and elders. This lesson of obedience is not given them either in their homes or in their schools. School teachers do not exercise that method of descipline which is so essential to the acquisition of the art of commanding others. This lesson in obedience is engrafted on the minds of the English people to the utmost limit. We know of an occasion when an officer quite high in the service was asked by a gentleman to introduce a personage of great celebrity to the gathering assembled on that occasion. There was another officer present, who was not quite the superior to the former but was the principal officer in the District. The gentleman first requested to introduce the guest declined to do it on the sole ground that he was not the principal officer in the District & therefore this complimentary work of introducing the guest to the assembly should be entrusted to him rather than to himself. In the case of an Indians such high sense of obedience would not have been found.

In connection with this stirring address of the Commander in Chief it may be asked why the several of the important states in India should not open military schools for the instruction of military tactics to the sons of their nobility. These young noble men would be of immense service to the state in its military service and equally serviceable would they be to themselves. Surely schools could be opened for military instruction at Gwalior, Hyderabad, Baroda, Indore, Mysore, Travancore and one or two other states. But as fates would have it, both the Native Press and the Native public desire the Government of India to open such schools for the instruction of the young noblemen that attend Rajkumar Colleges.

It would be a very great thing indeed if Sir George Greaves could advise the states of Kohlapoor, Baroda and Hyderabad to open schools for military instruction We think the Government of India should not incur any such extra expenditure out of their treasury for scarcity is looming before them and they will have to meet it well. One of these states can easily undertake to spend about a 25 thousand Rs. yearly towards the maintenance of a school for military instruction

In a school like the above all classes of people could be admitted and we shall be able to have more efficient soldiers than we have them at present From this school may be selected men for the post of commissioned officers both for the Native Indian troops as well as for British Indian troops composed of Natives.

That there have been no such schools though there have been numerous armies raised in Indian is another sign and an important one it is that Natives of India have utterly degenerated. They have become incapable of doing anything that will bring about good results Statesmanship and qualifications requisite for administrators of kingdoms small or great have disappeared from the land.

The Chief does not ask the Princes to be mere soldiers but he also tells them to apply themselves to their studies which will befit them to occupy responsible positions in the civil administration of the country at large, or of their own estates. These are the days of hard competition and no one can hope to succeed unless he applies to the task set before him with zeal and unswerving devotion.

## वऱ्हाड.

येत्या तेविसावे तारखेस उमरावतीस त्या जिल्ह्याच्या वतनदार पोटसभेची सभा भरणार आहे. या सभे नंतर यवतमाळास निराळी पोटसभा स्थापण्या बद्दल विचार चालला आहे.

---

रा. रा. वामन नारायण बापट एक्स्ट्रा असि. कमि. यांस उमरावतीस स्माल कॉज ताचे न्यायाधीश नेमणार आहेत असें प्रमोद सिंधु कर्ते लिहितात.

---

गेल्या सोमवारीं मि. चिचेल प्लौडन आफिशिएटींग रेसिडेंट यांस हैद्राबादेस सर खुरशेदजहा यांच्या बंगल्यावर टोलेजंग मेजवानी देण्यांत आली. तीनशे पाहुणे निमंत्रित होते. नाच व दारूकाम हीं उत्तम झालीं.

---

प्यूपिल टीचरच्या परीक्षेंत पसार झालेल्या तिन्ही गृहस्थांच्या नेमणुका येणें प्रमाणें झाल्या आहेत:—

गणपत राजाराम—कारंजा ( पगार २१ ); गोपाळ नारायण चौघडे—देऊळगांवराजा ( पगार २० ); आणि जयराम गोपाळ शृंगारपुरे—जळगांव ( पगार २० )

---

मे. मॅकंझी आफि. कमिशनर यांचा गेल्या बुधवार पर्यंत अकोल्यास सहा दिवस मुक्काम होता. शाळा, आफिसें वगैरे सर्व तपासण्यांत आलीं. साहेबांची मुनसिपल आफिसाकडे विशेष आस्था दिसली. मुनसिपल बजेटांत उत्पन्नाचा एक षष्टांश दरसाल हिंदुस्थान सरकारच्या हुकूमाप्रमाणें शिलेंकत घातला, सिव्हिल स्टेशन मुनसिपालिटीचा ताब्यांत ठेऊन शिलकेपैकीं तीनचार हजार रुपये कमिटीकडे दिले. जिल्हा बोर्डाची सभा भरवून लेडी डफरीन फंडाकडे लोकांचें लक्ष लावलें. इत्यादि गोष्टी मोठ्या उल्हासानें व सुप्रसन्न मनानें करून साहेब वाशिमा कडे रवाना झाले.

---

मुंबईच्या 'प्रार्थनासमाजा'चे मिशनरी राजश्री सदाशिवराव केळकर यांचें गेल्या शुक्रवारी अकोल्यास नेटीव जनरल लायब्ररींत सामाजिक सुधारणे संबंधानें व्याख्यान चांगलें झालें.

## वर्तमानसार.

निजाम सरकार व अबदुल हक्क यांच्या दरम्यान मुंबईच्या हाय कोर्टांत जो एक बडा दावा चालूं आहे त्या कामांत त्या उभयतांची आपसांत आपसांत समजुत झाली व निजाम साहेब आतां तो दावा काढून घेणार असें सांगतात. खरें असेल तर फार चांगलें होईल यांत कांहीं शंका नाहींच. पण बिचाऱ्या कायदे पंडितांचें मात्र हजारों किंवा लाखों रुपयांचे नुकसान होईल. सरकारचा फायदा झालाच असून कायदे पंडितांची भीवोनीही झालीच, पण पावडे मात्र बंद होईल. समजूत काय झाली हें बाहेर आलें नाहीं, पण समजूत होण्यांत कोणत्याही पक्षकाराचें जरी कितीही नुकसान होत असलें तरी तें बरें. निजाम हे तर मायपोटच आहेत तेव्हां त्यांस तें भारी नव्हेच, आणि सरदार अबदुल हक्कही फार मोठ्या योग्यतेस चढलेले असून निझामानीं त्यांस त्या बड्या योग्यतेस चढवलेले असल्यामुळें त्यांच्याशीं सामना करण्याच्या भानगडीपेक्षां आणि त्या भानगडींत, हिशोबाच्या खटल्या प्रमाणें कांहीं अद्वा तद्वा बाहेर येण्याचा संभव कायम ठेवण्यापेक्षां, अशा रीतीनें मांडवाळ करणें हेंच निझामा सारख्यांस हल्लींच्या काळांत जास्त चांगलें आहे. सरदार हक्क आपल्या पदरचा आहे, ह्मणून त्यांच्याकडे गेलेले दोन पैसे हट्टानें वसूल करण्यांत कायदे पंडितांचा धन करण्यापेक्षां त्यासच त्यांतील एक पैसा खाऊं देणें विशेष भूषण आहे. मिळून एकंदरीनें हा दावा काढून घण्यांत निझामास चांगली सल्ला मिळाली असें ह्मणावें लागतें.

प्रायःश्चिताचा एक नवा मासला:—फैजाबाद येथील एक हिंदु गृहस्थ आगगाडींतून चालला असतां दुसऱ्या जातीच्या लोकांजवळ बसून शिजलेले अन्न खालें याबद्दल त्या गृहस्थाच्या जातीनें त्यास जाती बाहेर टाकलें व पुढील प्रमाणें विधी करून त्यास पुन्हा जातींत घेण्यांत आलें. हा गृहस्थ बराच सुखी होता. प्रथम तागडीच्या एका पारड्यांत त्यांस घालून त्यांस दुसऱ्या पारड्यांत त्याच्या भारंभार पैसे ( तांब्याचे नाणे ) घातलें तें १८० रुपयांचे झालें नंतर, गव्हा बरोबर त्याची तुला केली; नंतर त्यांस एक चौरस दगडावर बसवून त्याच्या भोंवतीं गोंवऱ्या रचल्या, फक्त चेहरा मात्र खुला ठेविला होता, नंतर त्यांस दोघांनीं उचलून एका नदींत टाकलें, मग त्यास बाहेर काढून तो शुद्ध झाला असें ठरविलें. खरोखरीं रुपयाबरोबर तुझी तुला करावयास हवी होती पण पैशा बरोबर केली ही तुझ्यावर मेहेरबानी केली असें प्रायश्चित्त देणारांचें ह्मणणें आहे. असें सांगतात. रुपयांच्या बदला सोन्या बरोबर केली असती तर त्याच्या पेक्षां चांगलें झालें असतें. आणि रचलेल्या गोंवऱ्यांस आग लावून दिली असती तर नदींत टाकण्याचें श्रमही वांचले असते. तेव्हां या दोन गोष्टी प्रायश्चित्त देणारांनीं केल्या नाहींत हे त्यांचे महदुपकार समजले पाहिजेत. आपण हिंदुस्थानचे हिंदु आहोंत व ख्रिस्ती किंवा मुसलमान होण्याची इच्छा नसून हिंदूच राहाण्याची आपली इच्छा आहे व तसें करून आपल्या जन्मभूमीची योग्यता कायम ठेवण्याची आपली इच्छा आहे हें सिद्ध करण्या करितां व त्या गोष्टीचा ठसा इतरांच्या मनावर वठविण्या करितां अमल्या कांहीं वर्तनांस कांहीं चेक पाहिजे हें खरें. पण त्याचा परिणाम या वरील गोष्टी इतका करणें हें प्रायश्चित्त देणारांस हल्लींच्या काळांत कमीपणा आणणारा आहे हें सर्वांनीं अशा वेळीं नेहमीं ध्यानात ठेविलें पाहिजे.

१६ फेब्रुवारीच्या सुमारास गव्हनरपत्नी मुंबईस फॅन्सीबाल करणार आहेत.

मुंबईचें कायदेकौंसल १९ मिनहु रोजीं मुंबईस भरणार आहे.

निझामरेल्वेस गेल्या डिसेंबर अखेर पांच टक्यांचें व्याज पडलें. ग्रेट इंडियन पेनिनसुला रेल्वेस १८ टक्के पडलें. बडोदा रेल्वेस १५ टक्के पडलें असें समजतें.

मानसन्मानाच्या संबंधानें यंदा मद्रासचा पहिला नंबर आहे असें दिसतें. हायकोर्टांत एक जज्ज नेटिवच आहे; शेरीफ नेटिवच; कानग्रेसचा अध्यक्ष मद्रासी नेटिवच; आणि गव्हरनरजनरलच्या कायदे कौंसलचा मेंबरही मद्रासी नेटिवच.

सेन्ट विन्सेंट बेटांत दंगावा चालूं आहे असें सांगतात.

जबलपुरास टाउनहालची इमारत झाली.

काटकसर व दुसरी व्यवस्था यांचा विचार करण्याकरितां तुरुंगांकडील सर्व ठिकाणच्या आफीसरांची या महिन्यांत कलकत्यास एक सभा भरणार आहे.

बंगाल कौंसलदार राश बेहारी घोस यांस गव्हरनरजनरलच्या कायदे कौंसलचे मेम्बर नेमले.

रशियाची तयारी:— शिबास्टोपल येथें लढाऊ गलबतें तयार करण्याचा जो रशियाचा कारखाना आहे. त्यांत जार्ज व्हिक्टोरियस या नांवाचें नुकतेंच एक लढाऊ गलबत तयार झालें आहे. हें १०२८० टन वजन वाहून नेणारें आहे; व याची लांबी ३४० फुट आहे. रुंदी ६९ फूट आहे आणि खोली २६ आहे. याचें एंजिन १६००० घोड्यांच्या शक्तीचें आहे व याची गती दर तासास १४ पासून १७ कोस पर्यंत आहे. याच्यावर १२ इंची ६ तोफा, जल्दी आवाज करणाऱ्या ८ तोफा व तशाच पण लहान अशा ६ तोफा आणि ७ टर्पेडो अशीं हत्यारें ठेवण्याची व्यवस्था केली आहे. आमच्या इकडे जशी महाकाळी तोफ तसेंच हें गलबत समजावयाचें— रशियाचें लढाऊ आरमार पुढील प्रमाणें आहे:—पहिल्या प्रतीची लढाऊ गलबतें ३६ असून, त्यापैकीं २८ बालटिक समुद्रांत व ८ काळ्या समुद्रांत आहेत. दुसऱ्या प्रतीचीं ४८ असून त्यातील ३८ बालटीक समुद्रांत व १० काळ्या समुद्रांत आहेत. तिसऱ्या प्रतीचीं ८८ असून त्यांतील ४९ बालटिक समुद्रांत, २७ काळ्या समुद्रांत ७ कास्पियन समुद्रांत व ५ व्लाडिओस्टक येथें आहेत. चवथ्या प्रतीचीं वीस असून १७ बालटिक समुद्रांत व तीन काळ्या समुद्रांत आहेत. या सर्व आरमारावर मुख्य असे ड्युक पदवीचे दोन कामदार आहेत, ११ अडमिरल आहेत, ३४ व्हाईस अडमिरल, २९ रियल अडमिरल, २८५ सुपिरियर आफिसर्स आणि ९३७ खालच्या प्रतीचे आफिसर्स आहेत. या शिवाय इंजिनीयर व २७ आफिसर्स असून त्यांच्या हाताखालीं ३२९ सुपिरियर आफिसर्स व ६७२ खालच्या प्रतीचे आफिसर्स आहेत. आणि खलाशी ३०५०० आहेत.

मोझांबीक येथील तारेवरून समजतें कीं, पोर्तुगालसरकारच्या फौजेची एक टोळी न्यासा येथें हल्ला करण्याकरतां जात असतां वाटेंत दारूखाना एकदम पेटला व त्यामुळें जागच्या जागीं ६० माणसें दोघां युरोपियनांसह ठार झालीं आणि १७० माणसें चांगलीं मजबूत भाजलीं. स्वारी कशाकरतां चालली होती? ज्यांच्यावर चालली होती त्यांणी बलावणे पाठविलें होतें काय? नसेल तर ईश्वरानेंच हें शासन केलें ह्मणावयाचें!

फ्रान्सांतील नव्या तऱ्हेच्या बंदुकांचा नमुना मिळविण्याच्या खटपटीबद्दल दोघां इंग्रजांस फ्रेंच कोडतांत कैदेच्या शिक्षा झाल्या.

तुमच्याकडून आह्मास जो वार्षिक रक्कम किंवा खंडणी यावयाची त्यापैकीं कांहीं रोकड द्या व बाकीच्या रकमेबद्दल कारखान्याच्या उपयोगाचे जिन्नस ह्मणजे कातडें, पितळ, लोखंड, कितान, तबू, द्या असें काबूलच्या अमिरानें हिंदुस्थान सरकाराकडे मागणें केलें आहे हें जावयाचें मागणें आहे!

तुह्मी एकदा हिंदुस्थानांत येऊन जा असें हिंदुस्थानसरकाराकडून अमिरास एक पत्र गेल्यावरून अमिरानें या गोष्टीचा विचार करण्याकरतां बड्या लोकांचा एक दरबार भरविला. या दरबारास बडे बडे संस्थानिक व कामदार मिळून सुमारें ३०० लोक हजर होते. या दरबारांत वरील आमंत्रण पत्राचा विचार होऊन अमिरानें हें आमंत्रण नाकबूल करावें असें ठरलें; कारण हिंदुस्थानांत बलावून नेऊन जुन्या अमिरांप्रमाणें हल्लींच्या अमिरासही कैद करून हिंदुस्थानांत अटकवून ठेवण्यांत येईल असें सभेचें मत झालें. हिंदुस्थान सरकाराशीं अमिराचें वर्तन दांडगाईचें असून त्याचा राज्यकारभारही त्याच्याच कांहीं लोकांस नावडता असा असल्यामुळें हें जाणें सुरक्षित नाहीं असें त्या जमलेल्या सभेत ठरलें. हा सभेचा विचार अमिरासही पसंत झाला व तसें करून याकुबखान यांपैकीं कोणास गादीवर बसविण्यांत येईल असें अमिराच्या मनांत येऊन नुसता नकारवाचक जबाब देणेंही मोखमाचें वाटून अमिरानें रानटी व लढाऊ लोकांच्या मुरूपांस बलावून आणलें व अडचणीच्या प्रसंगीं ते आपल्यास मदत करतील अशाबद्दल त्यांच्यापासून प्राणाशपथा करून घेतल्या.

रशिया आपली रेल्वे पर्शियाच्या सरहद्दीपर्यंत आणीत आहे.

पार्शियांतला तंबाकूचा मक्ता युरोपियन लोकांच्या हातांत जात असल्यामुळें पर्शियांतले लोक चवताळले असून युरोपियन लोकांस आपल्या हद्दींतून घालवून देण्याकरतां बमेयुद्ध सुरू करण्याच्या खटपटी सुरू झाल्या आहेत. आमच्या सरकारास या भीतीचें आतां कारणच राहिलें नाहीं, कारण हिंदुस्थानच्या लोकास आतां धर्मच नाहींसा झाला आहे.

अफगाणिस्थानांतून निघून आलेल्या महत्वाच्या लोकांपैकीं सरदार हशोनखान हा एक असून तो रावळपिंडी येथें होता व प्रसिद्ध आयूबखान याच्याशीं भांडून आपली सर्व मिळकत विकून टाकून बायकांमुलांसह कराची येथें रहाण्यास निघून गेला.

इंग्रज व जर्मन हे दोघेही हल्लीं आफ्रिकेंत शिरले आहेत आणि प्रत्येकजण आपापल्या शक्तीप्रमाणें त्यांतील एकेक टापू बळकावीत आहे. हा असा प्रकार चालत असतां भांड्याला भांडं लागयाचा प्रसंग येणें साहजीकच आहे. त्याप्रमाणें तें लागून तंटा होऊं नये ह्मणून ते दोघेही त्या देशाची आतां आपसांत वाटणी करून घेत आहेत व त्याकारतां तें आपापल्या विश्वासू कारभाऱ्यांस तिकडे पाठवीत आहेत. देश कोणाचा आणि वाटण्या करतात कोण! ईश्वराच्या घरीं मोठा चमत्कार आहे. ठा० अ०

सन १८९१ च्या येथील म्याट्रीक्युलेशनच्या परिक्षेंत परलोकवासी रा. रा. श्रीपत बाबाजी ठाकूर यांची पत्नी बायाबाई गणेश पंडित ही पसार झाली.

साताऱ्याचे सुप्रसिद्ध स्वदेशकल्याणचिंतक रा. रा. कृष्णाजी आबाजी गुरुजी व रामचंद्र सखाराम पानसरे ह्या उभय गृहस्थांनीं जाहिरात देऊन असें प्रसिद्ध केलें आहे कीं, ज्या कोणास हल्लींच्या विलक्षण महर्गतेमुळें गाई संभाळवत नसतील त्यांनीं त्या आपल्याकडे आणून पोंचविल्या असतां त्यांचा सांभाळ केला जाईल. फारच स्तुत्य! सुबोधपत्रिका

शेतकऱ्यांस ऋणमुक्त करणाऱ्या कायद्याचें कमिशन. – गेल्या ता. २१ रोजीं असें ठरविण्यात आलें कीं, पुणें जिल्ह्यांत चौकशीस सुरुवात येत्या ता० ५ जानेवारीस होईल. चौकशीस्तव निवडलेल्या गांवांचे दोन भाग करून, तेथें कमिशनच्या सर्व मेंबरांची बैठक होईल. ह्या ठिकाणीं मुख्यत्वें सावकार व शेतकरी लोकांच्या स्थिति संबंधानें पूर्ण चौकशी होईल. पुणें जिल्ह्यांतील चौकशीचें काम आटोपल्याबर नंतर कमिशनचे तीन भाग करून, प्रत्येक भाग अनुक्रमें अहमदनगर, सोलापूर आणि सातार ह्यां जिल्ह्यांत पुणें जिल्ह्यां प्रमाणेंच चौकशी करील. ह्या रीतीनें शेतकरी लोकांच्या कर्जीचे मान आणि कर्ज काढण्यांस कारणें कोणतीं झालीं हें कमिशनच्या पूर्ण लक्षांत येईल असा भरंवसा आहे ठिकठिकाणच्या चौकशीचें काम आटोपल्यावर सर्व कमिशन पुनः पुण्यास जमेल आणि मग तेथें कामागार व इतर महत्वाच्या साक्षी घेण्यांस येतील.

कलकत्यास थिएटरांत एका युरोपियनानें एक खेळ केला. दुसरे दिवशीं नाटक ग्रहाचा मालक भाडें मागण्यास साहेबांच्या बंगल्यावर गेला असतां मडमेनें त्याच्या तोंडावर एका बाटलीतील आसीड फेकून त्यांस घायाळ केलें! तो मनुष्य हल्लीं इस्पितळांत असून त्याच्या तोंडावर वेडेवाकडे डाग पडले आहेत व त्याचे डोळे गेल्याचें समजतें! किती दुष्टपणा हा ! ! या बाईवर खटला झाला आहे. दी० बं०

---

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांणीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१३
सहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " १।०८
किरकोळ अंकास ......... ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।१०६
दुसरे खेपेस ........०।१

SUBSCRIPTION
Rs.
annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 6 as
Single copy.................................1as

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per lin3a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXVI AKOLA MONDAY 18 JANUARY 1892 NO 3

वर्षं २६ अकोला सोमवार तारीख १८ माहे जानेवारी सन १८९२ इ० अंक ३

बऱ्हाड रुरल बोर्डस लॉ १८८५ पैकीं कलम १३ व ३३ (क) अन्वयें प्राथमिक शिक्षणाच्या शाळांची व्यवस्था जिल्हा बोर्डानीं करण्याच्या संबंधानें रेसिडेंट साहेबांनीं केलेले पुढील नियम सदरहू कायद्याच्या कलम ३४ अन्वयें सर्वत्र माहिती करितां व वहिवाटी करितां प्रसिद्ध करण्यात आले आहेत तें खालीं लिहिलें प्रमाणें:—

१. तारीख १ जानेवारी सन १८९२ पासून त्यांचे स्थानिक हद्दींत प्राथमिक शिक्षणाच्या सर्व शाळा स्थापन करणें, त्यांची व्यवस्था ठेवणें, खर्च चालविणें, व पाहण्याचें काम ह्या नियमांत सांगितलेल्या शर्तीस व अपवादास अनुसरून प्रत्येक जिल्हा बोर्डाकडे राहील. शाळेंतील शिक्षकांच्या संख्येंत फेरफार करण्याचे ते डेप्युटी एजुकेशनल इन्स्पेक्टर यांच्या अर्जावरून डायरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रकशन मंजूर करतील. सदरहू अर्ज आजपर्यंत डेप्युटी कमिशनर यांच्या मार्फत जात असे तो न जातां जिल्हा बोर्डाच्या मार्फत पाठवावा.

२. एखाद्या जिल्हा बोर्डाच्या स्थानिक हद्दींत स्थापन झालेल्या प्राथमिक शिक्षणाच्या शाळेस जिल्हा बोर्डाची प्राथमिक शिक्षणाची शाळा ह्मणून ह्मटलें जावें. तिचा खर्च जिल्ह्याचे फंडांतून द्यावा व त्या शाळेंत वसूल झालेली सर्व फी सदरहू फंडाच्या जमेकडे दाखल करावी.

३. कमिशनरच्या साधारण देखरेखीस अनुसरून जिल्हा बोर्डानें डे० क० व डायरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रकशन यांच्या सल्लेनें सालांत जिल्हा फंडांतून एकंदर किती खर्च करण्याचा तें ठरवावें आणि त्या प्रमाणें वार्षिक बजेटांत तरतूद करावी.

४. जिल्हा बोर्डाच्या साधारण देखरेखीस व हुकमतीस अनुसरून, हल्लीं असलेल्या स्कूल कमिट्यांनीं त्यांना दिलेला अधिकार चालवावा व त्यांनीं त्यांच्या टिका किंवा शाळांच्या सुधारणुका संबंधाच्या सुचना जिल्हा बोर्डाकडे पाठवाव्या.

५. जिल्हा बोर्डाच्या किंवा तालुक बोर्डाच्या कोणत्याहि मेंबरानें किंवा मेंबरांनीं जिल्हा बोर्डाची प्राथमिक शिक्षणाची कोणतीही शाळा, शाळेच्या दिवशीं, व शाळेच्या वेळीं जाऊन पहावी व सुधारणुकांच्या संबंधाच्या सूचना जिल्हा बोर्ड अगर तालुक बोर्ड, जसें असेल तसें त्यास योग्य वाटल्यास डे० क० कडे पाठविण्या करितां कळवाव्या. परंतु कोणत्याहि मेंबरानें किंवा जिल्हा अगर तालुक बोर्डानें कोणत्याही मास्तरास परभारें हुकूम देऊं नये.

६. जिल्ह्याचा किंवा तालुक बोर्डाचा प्रत्येक मेंबर जो एखादी शाळा जाऊन पहातो त्यानें कमिशनर मु० अ० है० यांनीं आपलें पत्र नंबर ४२१४ तारीख ११ आक्टोबर सन १८७८ यांत स्कूल कमिटीच्या वहिवाटी करितां ज्या गोष्टी सुचविलेल्या आहेत त्याकडे विशेष लक्ष द्यावें.

७. (अ) जिल्हा बोर्डाच्या प्राथमिक शिक्षणाच्या शाळेंत दरमहा १० रुपया पक्षां अधिक नाहीं इतक्या पगारावर मास्तरांची नेमणूक, व अशा मास्तरांच्या बदल्या व बरतर्फ्या, व त्यांना रजा देणें तूर्त डायरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रकशन यांच्या साधारण हुकमतीस अनुसरून, जिल्हा बोर्डाच्या हातीं राहील.

(ब) दरमहा १० रुपयांपेक्षां अधिक पगाराच्या जागे वरील नेमणुका व बदल्या तसेंच ती वरून बरतरफ्या व त्या जागेवरील इसमास रजा देणें, यांस आज पर्यंत प्रमाणें डायरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रकशन यांची प्रथम मंजुरी पाहिजे.

८. प्रत्येक जिल्हा बोर्डाच्या प्राथमिक शिक्षणाच्या वेळेचें माहितवारी पत्रक जिल्हा बोर्डाकडे येईल व जिल्हा बोर्डानें तें डे० ए० इं० यांजकडे पाठवावें. मुलांची संख्या पुष्कळ कमी झाली असल्यास त्या बद्दलचा खुलासा कळवावा, व मुलांची कांहीं हजरी रहाण्या करितां जी तजवीज केली असेल किंवा करण्याची असेल तीही कळवावी.

९. डे० ए० इं० यांनीं जिल्ह्याच्या शिक्षण संबंधाच्या ज्या जरुरयाती असतील त्या जिल्हा बोर्डास कळवाव्या व जिल्हा बोर्डानें त्यांच्या अर्जाचा विचार करावा व त्याबद्दलची तजवीज करावी. परतु ह्या नियमावरून जिल्हा बोर्डास, बजेटांत तरतूद केलेली असल्यास आपण होऊन आपले हद्दींत प्राथमिक शिक्षणाच्या नवीन शाळा स्थापन करण्यास हरकत येत नाहीं.

१०. सरकारच्या साधारण राजनीति विरुद्ध किंवा विद्याखात्याच्या नियमाच्या विरुद्ध जर जिल्हा किंवा तालुक बोर्डानें तजवीज केलेली असेल किंवा हुकूम दिला असेल तर तो डे० क० च्या नजरेस आणण्याचें काम डे० ए० इ० चें आहे.

११. जिल्हा बोर्डास आपआपल्या हद्दींतील शाळांच्या संबंधानें आपले अधिकार तालुक बोर्डास किंवा स्कूल कमिट्यांना देता येतात परंतु असा अधिकार देण्याच्या हेतूची जिल्ह्याचे डे० कमिशनरास प्रथम खबर दिली पाहिजे व त्यांनीं मंजुरी दिली पाहिजे.

---

### नोटीस

रामजी वल्लद लक्षुमण पांडव राहणार राजंदे तालुके अकोलें यांस.—

नोटीस देणार शिवराम वल्लद लक्षुमन पाटील व जैराम वल्लद शिवराम पाटील राहणार राजंदे तालुके अकोलें. नोटीशीनें असें कळविलें जातें कीं, तुह्मा पासून आम्ही ९० रुपये नव्वद शेत तारण गहाण देऊन घेतलें त्यास आज सुमारें दीड वर्ष झालें. ह्या वरील नव्वद रुपया पैकीं आम्ही तुम्हांस रुपये (५०) पन्नास देऊन सुमारें एक महिना होत आला. रुपया बद्दल पावती मागितली असतां आज देतों उद्यां देतों असें सांगतां आहां परंतु पावती देत नाहीं. याजबद्दल चार भले लोक साक्षीदार आहेत. परंतु तुम्हास असें ह्या नोटीशीनें कळविलें जातें कीं नोटीस पावल्या पासून चार दिवसांत रीती प्रमाणें पावती द्यावी व तुमच्या नव्वद ९० रुपयांच्या भरतीचे रुपये ४० च्याळीस घेऊन जावे आणि आमचा ह्या बद्दलचा कागद आह्मांस द्यावा. तुमचे कडून सदरील लिहिले प्रामणें झालें नाहीं तर पुढें मागें तुम्ही फिर्याद कराल तर आम्ही कोणच्याही प्रकारच्या बाबी बद्दल जबाबदार नाहीं. हें तुम्हांस कळावें. असें अगोदर कळविण्याचें कारण मुख्य हें कीं रुपये ५० घेऊन पावती वगैरे देत नाहीं. व या शिवाय तुमचे आमचे देवघेवीचा व्यापार होता त्यांत तुम्ही रुपये घेऊन बऱ्याच वेळां पावत्या दिल्या नाहींत. म्हणून दिली नोटीस तारीख १४ माहे जानेवारी सन १८९२ इ०

(सह्या)

१ सहीची नि० शिवराम व० लक्षुमनजी यांच्या हातची असे
सहीची नि० जैराम व० शिवराम याच्या हातची असे.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती पौष वद्य ४ शके १८१३

मुक्तिफौजेचा सिंहनाद हिंदुस्थानांत अलिकडे फार गर्जत आहे. त्या फौजेचे खुद्द सेनापती बुथ साहेब या देशांत पर्यटण करीत आहेत. मुक्तिफौज ही एक पाद्र्यांची धर्मसंस्था आहे. तिचा हेतु जगभर एक धर्म करण्याचा आहे. इतर ख्रिश्चियन मिशनर लोका प्रमाणें यांचीं मतें जुलुमाचीं व अग्रहाचीं दिसतात. कांहीं वर्षांपूर्वीं या मुक्तिफौजेची मोठी मोठी तुतारी वाजत होती तेव्हां या धर्मसंस्थेचें फार तुफान माजलें होतें. परंतु थोडा काळ लोटल्यावर ती धामधूम अगदीं विलयास गेली. या मुक्ति फौजेचें धर्मवेड पुष्कळ कमी आहे तेव्हां त्या बद्दल आल्हाद किंवा खेद वाटणें नको. लोक दिवसानुदिवस शहाणे होत चालले आहेत तेव्हां ते धर्मप्रकरणीं कोणाला हार जातील किंवा कोणाच्या नादीं लागून बाटतील अशी शंकाच घेण्याचा काळ राहिला नाहीं.

सध्यां मुक्तिफौजेचा मोर्चा चांगल्या उद्योगाकडे वळला आहे. सेनापति बुथ साहेब हा कोणी लोकोत्तर मनुष्य आहे. याची कर्तृत्वशक्ति फार विलक्षण आहे. भूतदया खरोखर यांच्या हृदयांत निवास करीत आहे. दारिद्र्यविमोचन हा त्यांचा बाणा आहे. इंग्लंडच्या गरीब व अनाथ प्रजेसाठीं त्यांनीं कोट्यावधि रुपयांचा फंड गोळा केला आहे आणि नवीन वसाहती अशा लोकांकडून हे वसवितात. मोठ्या आनंदाची गोष्ट कीं या थोर महात्म्याचें लक्ष या हतभाग्य देशाकडे लागलें आहे. पुरे अठरा विश्वे दारिद्र्य हिंदुस्थानांत घोर राज्य करीत आहे ह्या गोष्टीची शहानिशा करून नंतर ते आपल्या प्रचंड उद्योगाला आरंभ करणार आहेत. थोड्या स्वल्प काळाच्या पर्यटणानें त्यांस कितपत अनुभव येईल व त्यांचे विचार कसकसे ठाम होतील ही गोष्ट अलाहिदा आहे. तरी सध्यां त्यांचे अभिप्राय बाहेर पडले आहेत ते आह्मांस चांगले मान्य नाहींत. लोक निस्त्राण, निर्धन व कंगाल बनले आहेत तेव्हां त्यास मुक्ति देण्यासाठीं शेती सुधारावी असा सेनापतीचा मानस आहे. पुष्कळ साहेब या प्रमाणें भुकतात कीं त्यांच्यामतें हिंदुस्थानची शेती फार भिकार दशेंत आहे. बाकीचा हत्ती इंडियाच्या शेतांमधून फिरूं लागला नाहीं तरी मुळची हातानें चालविण्याचीं नांगर आदिकरून साधनें आहेत तीं इतकीं विपुल आहेत व शेतीची निगा राखणार लोक इतके पुष्कळ झाले आहेत कीं शेती मध्यें कांहीं सुधारणा होण्या सारखी राहिली नाहीं आणि उलट शेतीवर खपणाऱ्या लोकांचा उदारनिर्वाह ही धड चालत नाहीं. आतां हें खरें कीं अद्यापि या देशांत नवीन जमिनी लागवडीस आणण्या सारख्या कांहीं मुलूखांत आढळतात तरी हिंदुस्थानच्या भिकार प्रजेच्या संख्येच्या प्रमाणानें अशी जमिनी अगदींच स्वल्प विस्ताराच्या आहेत. ज्या अर्थी इंडियाचा उद्धार करण्याचा बुथ साहेबाचा संकल्प आहे त्याअर्थी त्यांनीं बाह्य द्विपान्तरीं हिंदुस्थानच्या लोका करवीं नवीन वसाहती उठवाव्या. आणि ही युक्ति फलद्रुप झाली तर थोडें बहुत आमच्या लोकांचें स्वास्थ्य होण्या सारखें आहे. पृथ्वीच्या पाठीवर कोठें ही आमचे लोक भटकले तरी अन्नपाण्याच्या विवंचनेतून सुटतील आणि ओसाड खंडांत नवीन राज्यें, नव धर्म वगैरे आपल्या पूर्वजांच्या थोर किर्ती प्रमाणें स्थापीत करतील. परंतु हा उत्तम व्यवसाय सांप्रत साहेब लोकांनीं उचलेला आहे आणि आमच्या लोकांना अशी घोरनिद्रा लागली आहे कीं तिजपासून जागृती येणें दुरापारत झालें आहे. इंग्रजी राज्याची लक्ष्मी हिंदुस्थानाला छामली असो किंवा त्या राज्याची आकाबाई भोंवली असो सध्यां गोष्टी प्रचितीस येत आहेत त्या मात्र आकाबाईच्या फेऱ्यांतल्या आ-

हेत. आह्मी सर्व त्याग करून निराळ्या खंड यात्रेस गेल्या शिवाय आतां अन्य निभाव दिसत नाहीं. ही यात्रा मात्र कशी घडेल हा प्रश्न ही मोठा कठीण आहे. बुथ साहेब कांहीं कोटी लढवितील तर बरें.

---

महाराष्ट्रांत विद्येचा प्रसार करण्या करितां 'डेकन एज्युकेशन सोसायटी' नांवाची नेटीव मंडळी आहे ती पुण्यास असून तिच्या ताब्यांत 'न्यू इंग्लिश स्कूल' व 'फर्ग्युसन कालेज' अशीं दोन नामांकित विद्यालयें आहेत. तिच्या शाखा अद्याप पुण्या बाहेर स्थापल्या नाहींत तरी वरील दोनच विद्यालयांनीं शिक्षणाचें प्रचंड काम चालविलें आहे. हिंदुस्थानांत सरकारी शाळाखात्या शिवाय मिशनरी विद्याखातीं ही मोठमोठी आहेत तथापि वरील दोन्ही संस्थेची भरभराटी व लौकिक या वरून नेटिवांच्या आंगचें पाणी व कर्तृत्वशक्ति हीं चांगलीं व्यक्त होतील. कै॰ विष्णु शास्त्री व विद्यमान राजश्री टिळक, आपटे, आगरकर, नामजोशी, गोखले, गोळे प्रभृति गृहस्थ सर्वांस मशहूर आहेत. त्यांनीं स्वार्थबुद्धी बाजूस ठेविली आणि 'न्यू इंग्लिश स्कूल' द्वारें देशसेवा उत्कृष्ट आरंभली तिचा विकास बी. ए. च्या परिक्षे पर्यंत अभ्यास शिकविणारी 'फर्ग्युसन कालेज' नामक पाठशाळा होय. वरील पाठशाळा आज सहा वर्षे कायमच्या इमारती शिवाय होती आणि या मुदतींत तिला कालेजांतील एम. ए. च्या परीक्षे शिवाय सर्व अभ्यास शिकविण्याची परवानगी युनिव्हरसिटीनें देत देत दिली. चतुरसिंगीच्या मैदानांत १,२०,००० रुपये खर्चा पर्यंत एक भव्य व इमारत फर्ग्युसन कालेजा साठीं बांधण्याचा विचार ठरला आहे. वरील रक्कम खाजगी देणग्यांनीं गोळा झाली आहे. त्यांत मुंबई सरकारचे फक्त ६०००० रुपये आहेत. त्या इमारतीच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ गेल्या सोमवारीं गव्हरनर लार्ड हारिस यांच्या हातून झाला. ही बहुमानाची गोष्ट गव्हरनरांनीं आनंदानें केली परंतु त्यांनीं आपल्या गोडगोड भाषणांत सांगितलें कीं सरकार आपल्या कर्तव्याला जागृत आहे आणि नेटिवांनीं स्वावलंबनाचा धडा शिकावा. इत्यर्थ एवढाच कीं सरकारानें केलें तें पुष्कळ आहे आणि या उपर लोकांना सरकार कडून कांहीं मदत होण्या सारखी नाहीं. ही नेटिवांची कान उघाडणी स्पष्टपणें झाली आहे. नेटिवांनीं विद्यालयें स्थापून विद्यादानाचें काम आरंभलें ह्मणजे सरकारनें आपली थैली गच्च बांधावी. या राजपद्धतीनें नेटिवांनीं आपल्या पायावर धोंडा टाकून घेण्या सारखें होत आहे. सरकारी खजिना खर्चवेंच कमी करून विपुल वाढवावा कर व सरकार देणें हीं वाढती ठेवावीं अशा धर्तीवर राज्यकारभार सांपत चालला आहे. डाक्टर भाण्डारकर ह्मणाले त्या प्रमाणें अव्वल इंग्रजींत शाळा होत्या पण शिकणारे थोडे परंतु हल्लीं खंडोगणती विद्यार्थी आहेत आणि शाळा पुरेशा नाहींत. अशी वास्तवीक स्थिती असून सरकार आपल्या कर्तव्याला विसरून विद्यादाना कडील खर्च कमी करीत आहे आणि ह्मणूनच राष्टीय सभा सरकारास दूषणें देत आहे. असो फर्ग्युसन कालेजाचें चालकानीं सरकारची परवा केली नव्हती व नाहीं तेव्हां त्या संस्थेची उत्तरोत्तर भरभराटी होऊन तिच्या पुढारी मंडळीची किर्ती अजरामर होवो असें आह्मी मनापासून इच्छितों.

---

आम्हांस कळविण्यास पराकाष्ठेचें दुःख वाटतें कीं राष्ट्रीय सभेचे जाइंट सेक्रेटरी पंण्डित अयोध्यानाथ हे गेल्या सोमवारीं अल्हाबादेस निवर्तले. यांच्या मरणानें राष्ट्र सभेचा एक जंगी पाठिंबा नाहींसा झाला. राष्ट्रीय सभेच्या मंडपांत दाहा बारा दिवसांपूर्वी ज्यांच्या आगमना बरोबर लोकांनीं आनंद प्रदर्शक टाळ्यांचे गजर केले त्यांच्याच मरणाची वार्ता कळविण्याचा आज आम्हावर प्रसंग आला आहे. थंडीच्या विकृतीनें फुफूसचा आजार होऊन फार थोड्या अवकाशांत त्यांचा अंत झाला. पण्डितजीवर हवाला सोंपवून ह्यूम साहेब हिंदुस्थानची अखेर सलामी घेणार होते. पुढील सालची बैठक अल्हाबादेस पण्डितजींच्याच बळावर भरणार होती. इत्यादि सर्व मनोदयाचा किल्ला अकस्मात् जमीनदोस्त झाला आणि राष्ट्रीय सभेचा एक पाय लंगडा झाला. पण्डित अयोध्यानाथ हे काश्मीराकडील सारस्वत पंथाचे ब्राह्मण असून आग्र्यास त्यांचा जन्म झाला. त्यांनीं विद्याभ्यास चांगला करून वडिलांचा व्यापार न चालवितां वकिली आरंभिली. पुढें वायव्य प्रांताची राजधानी अल्हाबादेस बदलली तेव्हां ते तेथें येऊन राहिले. इंडियन हेरल्ड ह्मणून वर्तमानपत्र काढून त्यांनीं तें मोठ्या हिम्मतीनें व इभ्रतीनें गाजवून सोडलें होतें. सन १८८१ मध्यें त्या प्रांताच्या हायकोर्टांत न्यायाधीश नेमण्याविषयीं यांची शिफारस झाली होती परंतु हिंदुस्थान सरकारनें नामदार महमद साहेब यांस नेमलें. कायदे कौंसिलांत हे एक सभासद होतेच. युनिव्हरसिटीचे हे पहिले फेलो होते. अल्हाबादच्या मूर कालेजमध्यें पंचवीस वर्षे कायद्याचे अध्यापक होते. गेल्या चार वर्षांत पण्डितजींनीं राष्ट्रीय सभेविषयीं आस्था, कळकळ, दृढनिश्चय, देशसेवेचा बाणा, अव्याहत परिश्रम, वक्तृत्व इत्यादि गुण जगास दाखविले त्या मुळें वायव्य प्रांत नव्हे तर सर्व हिंदुस्थान देश त्यांना फार फार चहात होता. सत्यप्रिती, सौजन्य, विद्वत्ता, धनसंपन्नता, देशकार्यांत तत्परता इत्यादि गुणसमुच्चयांचा त्यांच्या स्थळीं संगम झाला होता ह्मणून यशश्रीनें नेहमीं त्यांच्या गळ्यांत माळ घातली होती. असा मोहरा राष्ट्रीय सभेचा नष्ट झाला हें नुकसान भरून येणारें नाहीं. मरण समयीं त्यांची पन्नाशी उलटून सारीं तीन वर्षे झालीं होतीं. राष्ट्रीय सभेच्या कामाला व्यक्तिमात्राचें आयुष्य पुरें नाहीं तरी ज्यांच्या प्रसादें आपण इतकें सरसावलो त्यांचे गुण आठवून दुःख प्रदर्शक पत्रें ठिकठिकाणीं सभा भरवून लोक धाडीत आहेत. ह्यूम साहेबांनीं तर प्रत्यक्ष अश्रु ढाळले. ईश्वर करो आणि पण्डितजीच्या महात्म्यास सुखशांती देवो!

---

राजपुत्र व्हिक्टर मरण पावले ही दुसरी दुःख कारक वार्ता कळवितांना आह्मांस फार खेद वाटतो. गेल्या सोमवारीं इंफ्लुएन्झाच्या तापानें ते अस्वस्थ असल्याविषयीं प्रथम तार पोंहोंचली. चार दिवसाचे अवधींत तो ताप १०७ डिग्री पर्यंत वाढून क्लोमपाकाच्या विकृतीनें त्यांची प्रकृति अत्यावस्थ झाली. आणि त्यांतच त्यांचा गेल्या गुरुवारी प्रातःकाळीं अंत झाला. आपल्या म्हाताऱ्या महाराणी सरकारवर नातवाच्या मरणानें हा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ह्या दुःखांत त्यांचें व त्यांच्या आप्तमित्रांचें शांतवन करण्यास ईश्वरा वेगळा कोणी समर्थ नाहीं. प्रिन्स आलबर्ट व्हिक्टर ह्यांच्या आकस्मिक मरणानें सर्वच राष्ट्रें हळहळतील युवराज प्रिन्स आफ् वेल्स यांचे हे जेष्ट चिरंजिव १८६४ जानेवारी १४ रोजीं जन्मले म्हणजे नुकतेच त्यांना २७ सावे वर्ष लागलें होतें. अशा ऐन भरज्वानीच्या पंचवीशीच्या वयांत हिंदुस्थानचे भावी बादशहा मरण पावले हें इंग्रजी राष्ट्राचें दुर्भाग्य होय. सन १८८९-९० सालीं हे हिंदुस्थानांत आले होते त्या वेळीं यांच्या सद्गुणी स्वभावाचा अनुभव येऊन चुकला होता. आपल्या आजीस हिंदुस्थानचा निरोप कळवून हिंदुस्थानची दाद लावण्याचें अभिवचन दिलें होतें तें आमचे मनांत पूर्ण खेळत आहे. मनुष्य मनांत बेत करतो एक पण ईश्वरी नेमानेम असतो दुसरा! राजपुत्र व्हिक्टर यांना ड्युक आफ क्लॅरेन्स व आव्हन्डेल असा पूर्वजांचा वैभवद्योतक किताब एक वर्षा भरा पूर्वीं देण्यांत आला होता. राजपुत्राच्या कर्तबगारी वरून त्यांस ऐर्लंडचे गव्हरनर नेमलें व पुढें हिंदुस्थानचे व्हाइसराय नेमणार अशा आनंदाच्या गोष्टी नुकत्या ऐकत होतों. पुढील महिन्यात यांच्या लग्नाचा सुखसोहळा मोठ्या थाटानें होणार होता आणि तो पहाण्यासाठीं महाराणी सरकारचे डोळें लागले होते पण ईश्वरी सत्ते पुढें इलाज नाहीं! मनुष्य देहाची क्षणभंगुरता ओळखून असा क्षणभंगुर देह लोककामीं झिजवावा हीच आयुष्याची गुरुकिल्ली होय. आणि ती महाराणी व्हिक्टोरिआ यांस साधली आहे तेव्हां त्या दीर्घायु होउन आपल्या प्रजेचें संरक्षण करोत आणि त्यांच्या हयातींत त्यांची सर्व मुलें माणसें चिरकाल सुखी राहोत. प्रिन्स आलबर्ट व्हिक्टर यांस जार्ज ह्मणून धाकटे बंधु आहेत व तेच प्रिन्स आफ वेल्स यांच्या मागून इंग्रजी तख्ताचे अधिकारी आहेत.

---

# The Berar Samachar

**MONDAY, JANUARY 18, 1892**

A great man and a princely man has fallen from our midst. These are the words which rise of themselves to our lips. The Honorable Pandit Ajodhyanath died on Monday last in his residence at Allahabad of an imperceptible and fatal attack of cold and consequent pneumonia. We have hardly realized the loss of a man who was the moving spirit of the National Congress. For the last four years he was the joint Secretary with Mr. A. O. Hume of that august national institution. He rose to eminence and popular honors through his able and upright championship of the people's cause. He had a good heart and a powerful head with which he paved his way to make the sittings of the Congress at Allahabad in 1888 an unqualified success. At his thundering call for duty people flocked round him to listen to his word and set at naught the official despotic opposition to the National Congress under the then Lieutenant Governor. His work as the Joint Secretary was a relief to Mr. A. O. Hume. It was thoroughly, honestly and perfectly done. People working under him in the different provincial committees of the Congress dreaded him lest they should fall short of his high ordeal of national business. Here is a noble example for imitation in his life and let people spare no pains to show themselves worthy of his following. In his death the whole of India has suffered an irreparable loss. It was upon his personal influence and ardent energies that we built up our hopes of holding the next sittings of the Congress at Allahabad. India must long mourn the loss of the Honorable Panditji before she can ever succeed to find his like.

---

We are extremely grieved to record another death and that too of a young prince who seemed destined in the probable course of things to become the Sovereign of the English dominions H. R. H. the Duke of Clarence popularly known in India as Prince Albert Victor died on Thursday morning from a sudden and sharp attack of influenza and pneumonia. The news came to India like a shock and all sorts of public business came to a starling standstill. The Prince was cut away in the spring-tide of life at twenty-seven within six weeks of the day that was fixed for his marriage. The sorrows of the Royal family lie beyond participation. The Bombay Gazette remarks that there is not a province or a Native state in India over which the death of the Duke of Clarence will not cast a shadow deeper than any that has fallen over it for many years.

The following Notification issued by the Government of India is published for general information:—

*For william, dated the 14th Jan:* 1892.

Intelligence having been received of the death of His Royal Highness Prince Albert Victor Christian Edward, eldest Son of His Royal Highness the Prince of Wales, Duke of Clarence and Avondale, Earl of Athlone, K. G., K. P., LL. D., Cantab and Dublin, the Governor-General in Council hereby directs that the Officers of Her Majesty's Civil, Military, and Marine Services do put themselves into mourning until further orders. The Governor-General in Council requests that a similar mark of respect may on this melancholy occasion be observed by all other classes of British subjects in India.

---

A few reflections on Mr. Acworth's address on Marathi Poetry:—

In this lecture Mr. Acworth of Bombay advises the present Marathi poets to write on subjects more original rather than occupy their brains with imitations from English writers both prose and poetical. Original composition is rarely possible amongst people who are subject to a foreign rule. This rule is clearly exhibited in the whole range of Marathi literature commencing as it did with the 11th century of this era. When the Maratha kingdom was under the power of the Yadav Kings of Maharastra, poetical literature in the Marathi language commenced with imitations from sanskrit. But this Yadav Rule was not complete in its power and extent as the second rise of Maratha Dominion was. The Marathi poetry of this period was more original in its character than the first. The reason is not

far to seek. The independence of the people, however short-lived, was more tangible than what existed under the first Maratha rule. But even in this period original compositions only glistened here and there and the general character of the poetical literature of the period was not so original as is found in the writings of the English poets. Cowper, Milton, Shakespear and a host of other English Poets exhibit a marvellous originality in their immortal compositions. Our poets whether of the ancient or modern times are found wanting in this truly poetical gift solely because their minds on account of the political condition about them are under restraint. When the Government over them is their own the people are free and their minds then can rise to the highest of intellectual flights.

Under the present Government, education is encouraged, and there is great hope in the future of Marathi Poetry becoming more original in its tone than it is at present. The beneficent effects of the establishment of Local Governments are not one sided. Not only that they will reconcile the people to the foreign rule but that the people will feel that somehow or other they are governed by themselves if not, while treating with foreign Nations at least, in the nearer home. Originality is the child of independence; as feelings of independence at best in matters of Local Government begin to take root in the minds of the people, they will foster in their hearts noble sentiments of patriotism and love of the land they are born and live in. When people will see around them that the Magistracy is formed out of their own people, that the judges are their own, that the Government of the locality they live in is composed of their own people, that their comrades in other paths of life are credited with having brought out one reform or another and that the soldiers composed of purely native element have achieved this exploit or that, then it is that the poet will rise to the occasion and show forth his God-given gifts of easiness of expression & originality in composition. Then, and not till then the true poet will rise. Therefore for the advancement of culture and arts as well for removing heavy burden of responsibility of governing from the shoulders of Government-Local Governments should be established and encouraged all over the country.

NOTICE

It is hereby published for the general information that election will be held to fill up the places of the six members of the Municipal Committee of this town, who in accordance with secl tion 32 of the Berar Municipal Law retire at the end of the current officia, year ending 31st March 1892. One member will be elected for Ward No. III, three for Ward No. II & two for Ward No I.

The election for all the three wards will take place on the following dates at the Town Hall.

For Ward No. I (town) and for Ward No. III (civil station) ... ... ... 5th February 1892.

For Ward No. II ... ... ... 6th February 1882.

Votes will be received on each day between 7 A. M. to 5 P. M.

Nomination papers will be received by the Treasury Officer.

Akola 15-1-92 } Md. Husain Secretary M. C. Akola.

## वऱ्हाड.

अकोळा मुनासिपाळ कमिटींतीळ मेसर्स र. स्तुमजी फर्दुनजी, गणेश बापुजी, व हरी वामन भट यांनीं सभासदांच्या जागा सोडल्यामुळें त्यांच्या ऐवजीं डाक्टर रेली, व रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर व रा. रा. बाळकृष्ण मोरेश्वर साठे असे तीनजण अनुक्रमें नवे सभासद आले आहेत.

मंगरूळपीर व मलकापूर येथील तहशीलदार मि. अनवर अली व रा. रा. विष्णुहरी या उभयतांस दुसरे वर्ग माजिस्टटचे अधिकार देण्यांत आले आहेत.

आफिशिएटींग रेसिडेंट मि. क्रौडन साहेब यांस गेल्या सोमवारीं निजाम सरकारचे दिवाण सर असमान जहा यांनीं एक बडी मेजवानी दिली. साहेब तिकडे लोकप्रिय होत आहेत आणि लोकांच्या मतें त्यांचीच कायमची नेमणुक व्हावी. ही आनंदाची गोष्ट होय.

वऱ्हाड रूरल बोर्डाच्या ८वे नियमा प्रमाणें जे सभासद साल अखेरीस आकोळा व इलिचपूर या दोन जिल्ह्याच्या तालुका बोर्डांतून निघाले होते त्यांचीच पुन्हा बहूमतानें निवड झाल्याचें कळतें.

वाशीमचे सिव्हील सर्जन ओ. डब्यू जोन्स यांच्या तीन महिन्याच्या रजेंत हायद्राबाद कांटिनंट कडील अपाथेकरी डब्यू. इ. हेनड्रीक यांस नेमण्यांत आलें आहे.

## जाहिरात

म्युनिसिपल कायद्याचे कलम ३२ अन्वयें प्रत्येक वर्षी मार्च अखेर ६ म्युनिसिपल मेंबरांच्या जागा खालीं व्हावयाच्या त्या प्रमाणें यंदा मार्च अखेर मेसर्स गणोबा राघोबा, मिरजी अबासबेग, सोराबजी मंचरजी, अहमद साहेब जुमानी, जयकृष्ण बगाजी व विष्णु मोरेश्वर महाजनी यांच्या जागा खालीं होतील. त्या ६ जागा ( गांवा करितां १, पेठेकरितां ३ व सिव्हिल स्टेशन करितां १ ) भरण्यासाठीं निवडणूक खालीं लिहिलेले तारखेस टाउनहालांत होईल.

वार्ड नंबर १( गांव) आणि वार्ड नंबर ३ (सिव्हिल स्टेशन) } ता०५-२-१८९२

वार्ड नंबर२........ " ६—२—१८९२

नेमलेल्या तारखेस मतें सकाळचे ७ वाजे पासून सायंकाळचे ५ वाजे पर्यंत घेतले जातील.

उमेदवाराचे नांवाचे कागद मे. ट्रेझरी आफिसर घेतील.

ता० १५।१।९२ } Md Hussvin. सेक्रेटरी. मु० क० अ०

नोटीस

रा. रा. भोलाराम रामदयाल मारवाडी दुकान दोग्रस प्रगणें चिचोली ता० दारव्हा यांसः—

नोटीस देणार राजाप्पा बापु पपीकार दुकान दोग्रस प्रगणें चिंचोली ता० दारव्हा यांजकडून नोटिशीनें असें कळविलें जातें कीं संवत १९४७ सालचें हंगामज वेळीं तुह्मी आमचे दुकानावर रुई ओझें ३० याचें मण १८४, घडा ८३, व ८१। शेर धरवर ठेवली आहे. या धरवरी बद्दल आम्ही तुम्हास रुई खडून रकम घेऊन जाण्या करितां बहुतेक वेळां ह्मटलें असतां आपण याचा निकाल करीत नाहीं. यास्तव ह्या नोटिशीचे द्वारें असे कळविलें जातें कीं, ही नोटीस पावल्या दिवसां पासून ८ दिवसांत आपण आमचे दुकानावर येऊन निकाल करून घ्यावा नाहीं पेक्षां सदरील ओझ्या बद्दलची रकम हल्लीं मुंबई येथें जुने रुईचा भाव आहे त्यांत खर्च वजा जातांना दोग्रस तकाची रुई जे पडीत पडेल त्या भावा प्रमाणें दाम होतील तितके आम्ही देण्यास सिद्ध आहों. या प्रमाणें न केल्यास तिऱ्हाइती रकम जमा ठेविली जाईल नंतर पुढें तुमची कोणते ही प्रकारची तकरार ऐकली जाणार नाहीं. रुई धरवर आहे या संबधानें आपण नगदी रोख रुपये आह्मा पासून उचलले आहे. त्या रकमेस दरमहा दर शेंकडा बारा ॥।. आणे प्रमाणें व्याजाचा जो करार केला आहे त्या प्रमाणें व्याजा सुद्धां रकम रुपये ५२३८– रुईचे रकमेंतून वजा करून बाकी राहिलेली रकम आह्मी तिऱ्हाइती तुमचे नांवची जमा करून देऊं या रकमेच्या फैसल झाला असतां त्याचे जबाबदार नाहीं कळावें. मिति पौष्य वद्य १ रोज गुरुवार संवत १९४८ मु॥ ता. १४ माहे ज्यानेवारी सन १८९२ इ० दस्तुर रंगराव खंडेराव मुखत्यार.

( सही. )

राजाप्पा बापु पपीकार द. ख.

जाहिरात.

तमाम लोकास खाली सह्या करणार यांज कडुन ज्याहिर केलें जातें कीं जयराम वलद बसवाजी देशमुख राहणार कसबे नांदुरा तालुके मलकापूर हा मयत होऊन आज सुमारे अडीच वर्षे जाहाली. यांचा मुलगा नामे नेऊ होय. आम्ही जाहिर करणार परयाण मर्द नेऊ व मुलगा रामराव वलद नेऊ यांच्या नांवानें जयराम वलद बसवाजी यांणीं मयत होतेवेळी मृत्यु पत्र करून ठेविलें आहे. याचें कारण नेऊ हा चांगल्या रितीनें राहून स्थावर जंगम ईस्टेट नीट ठेऊन आमचा सांभाळ नीट रितीनें करील अशी खात्री नव्हती व त्या प्रमाणे नेऊ हा चांगल्या रितीनें वागत नाहीं. घरदार वगैरे सोडुन रांडबाजी करित आहे म्हणून आम्हा मायलेकांच्या नांवचें मृत्युपत्र करून ठेविलें आहे त्या आधारानें व अम्ही स्थावर जंगम ईस्टेटीचे मालक आहो म्हणुन रिती प्रमाणें सर्वांस ज्याहिर केले जाते कीं. नेऊ हा मृत्यु पत्रांतील स्थावर जंगम इस्टेट कोणास गहाण किंवा खरेदी वगैरे कर्ज घेऊन देईल तर ती कोणी घेऊनये घेतल्यास त्याजबदल जबाबदारी कोणचे ही प्रकारानें स्थावर जंगम ईस्टेट व आम्ही नाहीं. जो कोणी देईल त्याबदलचे जबाबदार त्याचा तो आहे. हें सर्वांस जाहिर व्हावें. कळावें तारीख १६ माहे जानेवारी सन १८९२ इसवी.

( सही )

सहीची निशाणी बांगडी परयाण मर्द नेऊ इच्या हातची असे.

सहीची निशाणी रामराव वलद नेऊ याच्या हातची असे.

नोटीस.

मे० गंगाबिसन अमीनद्राम, नथमल शेट, बोदरू वलद परशराम कोलते, अनंदा व चांगो इंगळे, राहणार कसबे नांदोरा या सर्वांस नोटिशीनें कळविलें जाते कीं नेऊ वलद जयराम देशमुख राहाणार नांदोरा. हा कोणास गाहाण, खरेदी किंव्हां कर्ज रोख वगैरे स्थावर जंगम ईस्टेट लिहून देऊन काढील तर त्यांस कोणी कर्ज वगैरे काहीं देऊनये कारण नेऊ हा चांगल्या रितीनें नाहीं. व आम्ही ऐकतो कीं सदरील सावकारा पासून तो कर्ज, गाहाण, खरेदी वगैरे देणार आहे. तर कोणी घेऊनये हें सर्वांस अगोदर कळविले आहे घेतल्यास त्या बदलचे जबाबदार आम्ही व स्थावर जंगम ईस्टेट वगैरे कोणी नाहीं हे कळावें म्हणुन दिली नोटीस सही ता० १६ माहे ज्यानेवारी सन १८९२ इसवी

( सही )

सहीची निशाणी बांगडी परयाण मर्द नेऊ ईच्या हातची असे.

सहीची निशाणी रामराव वलद नेऊ यांच्या हातची असे.

नोटीस.

पोती सिपीण राहणार नांदोरा इजला खाली सह्या करणार यांज कडून कळविलें जाते की नेऊ वलद जयराम ह्याचा व तुझा सर्व परीचा निकट संबंध आहे. व तु नेऊ यांज पासून नादांत किंवा अमलपाणी देऊन कर्ज रोख अगर स्थावर जंगम ईस्टेट वगैरे काहीं लिहून घेशील तर व घेतली असल्यास तुजला काहीं येक मिळणार नाहीं. हे तुजला अगोंदर कळविलें आहे व आम्ही व स्थावर जंगम ईस्टेट ही कोणच्याही प्रकारचे जबाबदार नाहीं हे तुजला कळावें. ता० १६ माहे जानेवारी सन १८९२ इ०

( सही )

सहीची निशाणी बांगडी. परयाण मर्द नेऊ इच्या हातची असे.

सहीची निशाणी रामराव वलद नेऊ याच्या हातची असे.

नोटीस

रा. माधव वलद केसोबा खडशा राहणार कसबे नांदुरा ता० मलकापूर यांस. नोटीसीनें असें कळविलें जातें कीं, तुह्मी माझा नवरा नेऊ याजपासून खात्याचें शेत गहाण घेऊन रुपये [ २०० ) दोनशें दिले वगैरे बातमी समजतें तर तुम्हास असें कळविलें जातें कीं, आमच्या व माझ्या मुलाच्या संमती शिवाय हे तुम्ही घेतलें. विचारून घेण्याचे होते. परंतु तसें झालें नाहीं कारण नेऊ हा चांगल्या मार्गानें नाहीं म्हणुन त्याजपासून घेण्याचे नव्हते असें जरी आहे तरी तुम्हांस कळविलें जातें कीं, याजवीं याजची जितके रुपये देऊन शेत घेतल असेल तें रु. नोटिस पावल्या पासून चार दिवसांत घेऊन जावें. आणि शेताचा कागद आणुन द्यावा व या पुढें नेऊ पास कर्ज वगैरे कांहीं देऊं नये. दिल्यास त्याजबद्दलचे जबाबदार स्थावर जंगम इस्टेट व आम्ही कोणी नाहीं म्हणून दिली नोटीस तारीख १६ माहे जानेवारी सन १८९२ इ०

( सही )

निशाणी बांगडी परयाण मर्द नेऊ इच्या हातची असे.

निशाणी रामराव वा॥ नेऊं याच्या हातची असें

## वर्तमानसार.

वडोद्याचे महाराज श्री सयाजीराव गायकवाड यांणीं सुमारें ५०,००० हजार रुपयांची रकम इंग्रजी ग्रंथांचे आधारानें एत्तद्देशीय भाषांत नवीन ग्रंथ तयार करण्याकरितां काढली आहे असें समजतें पूर्वीं याच महाराजांनीं हिंदुधर्मशास्त्रावरील अनेक स्मृतींचीं भाषांतरें करण्यास रा सा अठले इत्यादि विद्वान मंडळीस सांगितलें आहे. इंग्रजसरकारच्या राज्याच्या मानानें बडोद्याचें राज्य ह्मणजे अगदींच लहान असें ह्मणण्यास हरकत नाहीं परंतु विद्यावृद्धीला आणि देशी भाषांना उत्तेजन देण्याला बडोदेंकर कशी भक्कम मदत देत आहेत हें पाहून स्वराज्य आणि परराज्य यांतील भेद कोणाच्याही लक्षांत येईल. परमेश्वरानें हिंदुस्थान देश आमच्या स्वाधीन करून आमच्या डोक्यावर मोठी पवित्र जबाबदारी ठेविली आहे. इत्यादि गुळमट भाषणें करणाऱ्या इंग्रजी राज्यकर्त्यांनीं वरील उदाहरणें पाहून माना खालीं घालण्यात आणि आपलें कर्तव्य आपण नीट बजावीत नाहीं ही गोष्ट त्यांनीं आपल्या मंडळींत तरी कबूल करावी या शिवाय तोड नाहीं.

सरकारची स्वभाषा निराळी असल्यामुळें त्यांनीं आमच्या देशी भाषांचें महत्व कमी आहे असें जरी मानलें तरी आमचे आह्मी या देशीभाषा सुधारण्याची योग्य कळकळ कितीशी बाळगितों? ८।१० वर्षांपूर्वीं डेक्कन कालेजच्या कित्येक विद्वानांनीं मराठी भाषेंत नैंटींथ सेंचरीसारखें माहितीनें भरलेलें मासिक पुस्तक काढण्याबद्दल आव घातला होता पण पुढें काय? शिळोप्याच्या गप्पा संपल्यावर जो तो आपआपल्या ठिकाणीं स्वस्थ. असाच प्रकार एक दोन वर्षांपूर्वीं मुंबईमध्येंही झाला. कित्येक विद्वानांनीं वरील धर्तीवर एक पुस्तक काढावें ह्मणून हालचाल केली, पण फळ कांहीं झालें नाहीं, मुख्य अडचण एवढी येते कीं, आपला वेळ खर्चून फुकट श्रम करण्याला जी देशभक्ति पाहिजे, ती थोड्याच विद्वानांचे अंगीं वास करते. जो तो आपल्या विद्वत्तेच्या पोकळ ऐटींत सरकारी वेतन चबळीत अगर पक्षकाराच्या आणे रोग्यांच्या नाड्या शोधीत धुंद झाला आहे. दरसाल युनिव्हर्सिटींतून विद्वानांचीं खांडच्या खांडे बाहेर पडत आहेत पण त्यांचा देशभाषेला फारच थोडा उपयोग होत आहे. या गोष्टीची त्यांना केव्हां लाज वाटेल ती वाटो! नक्तेच कलकत्यास "साधना" नांवाचें एक मासिकपुस्तक देशी भाषेंत टागोर घराण्यांतील लोकांनीं सुरूं केलें आहे. तें नैटींथ सेंचरीच्या धर्तीवर आहे. पृष्टसंख्या मात्र नैटींथ सेंचरीच्या मानानें कमी आहे. तथापि फक्त एका घरांतल्या माणसांनीं हा उद्योग सुरू केला आहे आहे ह्मणून त्याची तारीफच केली पाहिजे. आमच्या शेंकडो विद्वानांनीं मिळून जरी "साधने" सारखें एखादें छोटेखानी पुस्तक चालविलें तरी आह्मी त्यांची पाट थोपटूं. पण एवढें सुद्धां त्यांच्या हातून होत नाहीं याबद्दल आह्मांस दिलगिरी वाटते मुळीं कोणताही लेख लिहून देशसेवा करण्याची हौस थोड्याच विद्वानांना आहे; आणि त्यांना सुद्धां इंग्रजी भाषेंत लेख लिहिण्याची पोरकट हौस असल्यासारखी दिसते! नुक्तेच मुंबईचे कमिशनर आकर्थ साहेब यांणीं मराठी भाषेवर लिहिलेला निबंध पाहून तरी आमचे हे पोशे विद्वान जागे होतील काय? परकीयांनीं आमच्या भाषेची कळकळ दाखवावी आणि आह्मीं तिची हेळसांड करावी यापरती लाजीरवाणी गोष्ट ती कोणती?

मि० केन रशियांत जाऊन आपल्या कामाचा फैलाव करणार.

यंदां म्याट्रिक्युलेशन परीक्षेंत ४१ मुली बसल्या, पैकीं ११ पास झाल्या.

बागलकोट व विरग यांच्या दरम्यान रेलवे लाईन करण्याचा ठराव झाला

आणखी १ वर्ष द्याव.—मि. फेरोजशहा मेहेरबानजी मेथा आणि इतर फेलोन यांचे अर्जावरून १८९२ सालींही पहिली बी. ए. आणि दसरी बी. ए. या परीक्षा हल्लींच्या पद्धतीप्रमाणें घेण्यात याव्या.

करन्सी नोटा फाटल्या असल्या तर त्याबद्दल करन्सी आफिसांत दोन जामिनांच्या सहीचा कागद लिहून द्यावा लागत असे. यास्तव आतां असा नियम करण्यांत आला आहे कीं, शंभर रुपयांच्या आंतील नोटांसंबंधानें ही जामीनगिरी वगैरे घेऊं नये.

कन्याविक्रयप्रतिबंधाकरितां रत्नागिरीच्या लोकांनीं श्रीशंकराचार्यांस २००० सह्यांचा एक अर्ज केला आहे.

ईजिप्तचे खेदिवास इन्फ्लुएंझानें देवाज्ञा झाली. क० त०

सोलापूर जिल्ह्यांतील करमाळे तालुक्यांत अर्धे दरानें जनावरें चरण्यासाठीं सरकारी जंगल खुले केल्याचें समजतें.

चालूं महिन्यांत कलकत्ता येथें हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणच्या तुरुंगावरील अधिकाऱ्यांचा सभा, तुरुंगा संबंधीं छाटकसर व त्यांतील कैद्यानीं वागविण्याची रीत यांबद्दल विचार करण्यासाठीं भरलें आहे.

असें समजतें कीं उत्तर असामच्यावर जवळच राह्या गांवापासून थोड्या अंतराबर पंजाबांतील लोकांची एक भरभराटीस आलेली लहानशी वसाहत आहे; ती पंजाबांतील थोड्यांशा लोकानीं तेथें जाऊन व तेथल्या खिपांजवळ लग्ने लावून स्थापलेली आहे.

तेहरान येथें कांहीं युरोपियन लोकांना तंबाखूचे मक्ते दिल्यामुळें तेथील लोक फार संतापलें आहत व याचा परिणाम फार भयंकर होईल असें वाटल्यावरून या कंपनीनें आपला मक्ता सोडून दिला.

चालूं सालच्या जून महिन्यांत लंडनमध्यें सर्व ब्रिटिश राज्याच्या चेंबर्स आफ कामर्स यांच्या प्रतिनिधींची सभा भरणार आहे त्या वेळेस अमेरिकेंतील व्यापारी कायदे, बाह्यप्रदेशीं जाणें, वसाहत करणें, पेनी पोस्टेज वगैरे गोष्टीचा विचार होणार आहे. सुबोधपत्रिका.

चमत्कारिक हिरा— युरोपांतील एका गृहस्था जवळ एक हिरा आहे त्याचे एका दिवसांत चारवेळ रूप पालटतें. सकाळीं तो अस्मानी असतो, दुपारी पांढरा होतो संध्याकाळी काळसर होतो आणि रात्रीं अगदीं काळा दिसूं लागतो.

लाथेनें प्रसूती — अलीपूर ( कलकत्ता ) येथील डेप्युटी मानि० कोर्टांत एक खटलें चाललें होतें. त्यांत ऋणको धनको स्त्रिया होत्या. ऋणकोनें कोर्टांत सांगितलें कीं धनकोजवळून मी मुळींच पैसे घेतले नाहींत. हा खोटेपणा पाहून धनकोस राग आला तिनें तिला एक लाथ मारिली त्यासरशी ती बाई प्रसूत झाली. लथेचे योगानें तिचे मुलाचे तोंडाची हाडे वेडींवांकडी झालीं आहेत. आता उलट धनकोवर खटला चालला आहे. दी० ब०

हिंदुस्थानांतल्या लोकांस दक्षिण अस्त्रेलियांत मजुरास नेण्याच्या खटपटी करितां एक साहेब हिंदुस्थानांत येत आहे! हिंदुस्थानासारख्या सुपीक देशांतल्या लोकांस केवळ पोटाकरतां बाह्यदेशी जाण्याची पाळी यावी आणि हिंदुस्थानातल्या धंद्यारोजगारांवरील लोणी परदेशच्या लोकांनीं न्यावें हें मोठें चमत्कारीक झालें आहे व त्याच्या प्रतिबंधास हल्लीच्या काळीं उपाय दिसत नाहींसा झाला आहे. या देशांत पूर्वी एकदा मुसलमान लोकांनीं आपल्या लोकांचा भरणा करून टाकला व ते आमचे सखे भाऊबंद झाल्यावर या ख्रिस्तीलोकांच्या ज्या झुंडी आल्या त्यांणीं तर हिंदुस्थानांतल्या हिंदुमुसलमानांस अगदीं भंडावूनच सोडलें. मुसलमान आमचे भाऊ झाले, पण हे ख्रिस्ती आमचे धनी होऊन बसत आहे नुसते धनीच नव्हत तर ते आमचे धनी होऊन आह्मी बाह्यदेशी जावें ह्मणून खटपट करीत आहेत! परिणाम काय होईल कोण जाणे!

हिंदुस्थान व इंग्लंड यांच्या दरम्यान रेलवे करण्याचे विचार विलायतच्या व्यापारी लोकांत चालला आहे. आटोमन रेलवे हिंदुस्थानच्या रेलवेस मिळविली जाणार असें सांगतात हें असें झाल्यास हिंदुस्थान व युरोप यांच्या दरम्यान लवकरच दोन रेलवे होतील असें दिसतें. एक इंग्लंडची व दुसरी रशियाची. दोघांनीं मिळून एकच केली असते पण एकमेकांचा एकमेकांस विश्वास नसल्यामुळें तसें होत नाहीं.

निझाम व नेकब यांच्या दरम्यानचा बड्या हिऱ्याचा तन्टा आपसांत मिटविण्याचा उद्योग चालू आहे असें सांगतात फार चांगलें होईल.

पुण्याच्या फरग्युसन कालेजाकरतां चतुरसिंगीच्या मैदानात बांधावयाच्या इमारतीच्या पायाचा दगड गव्हरनरांच्या हातून गेल्या सोमवारीं बसविला गेला.

काश्मीरचे डेपुटी कंट्रोलर जनरल मि. डे हे बडोद्यास त्यांचे हुद्यावर २००० रुपये पगारावर येत आहेत असें समजतें. हे बंगाली आहेत.

इजिप्तचा राजा खेदीव मेला व त्यामुळें इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी यांतील लोकांत अनेक प्रकारचे विचार सुरू झाले आहेत. त्यांचा मुलगा गादीवर बसणार.

चुंबनाची किंमत दाहा रुपये असून हिंदुस्थानची हवा चुंबन घेण्यास भाग पाडल्ये असें विलायतच्या एका खटल्यावरून होतें. बारा वर्षाच्या वयाच्या एका मुलीचे जबरीनें चुंबन घेतल्याचा हरीस नावाच्या साहेबावर खटला असतां आरोपीनें आपल्या तकरारींत कोर्टास सांगितलें कीं, तिचे दोन मुके घेतले खरे त्यास कांहीं इलाज नाहीं, कारण सात वर्षे हिंदुस्थानांत राहण्यानें तिकडच्या सूर्याच्या उष्णतेचा माझ्यावर जो प्रयोग झाला त्यावरून तसे मुके घेण्याचे मला वेड लागल्या सारखेंच झालें आहे! ! माजिस्ट्रेटानें त्यास दाहा रुपये दंड करून सोडून दिला ! ! !

मद्रासच्या आणखीं दोन पलटणी बर्माकडे जात आहेत.

स्ट्रेट सेटलमेन्टमधील पाहांग येथील सर्व मोलें लोक बंडावा करण्यास प्रवर्तक झाले आहत व त्यांच्या बंदोबस्ताकरतां मुलताब व इंग्रज रेसिडेन्ट हे कांहीं फौजेसह दंग्याच्या जागीं गेले आहत. ठा० ज०

इंग्लंड मध्यें जें हिंदुस्थाना करितां एक इंडिया आफिस म्हणून आहे, त्याचा खर्च एक कोटि साठ लक्ष पौंड यंदा होणार, म्हणजे हल्लींच्या पौंडाच्या भावाकडे पाहिलें म्हणजे वीस कोटि रुपयांवर खर्च. त्यां पैकीं बहुतेक पैसा रवाना झाला. आतां तीन चार कोटि जाणें आहे हिंदुस्थानचें नशीब!

नगर शहरांत एक तक्क्याची गिरणी स्थापन करून यांत्रिक कलेच्या सहायानें व्यापारास उत्तेजन आणावें अशा इच्छेनें अनुभव पाहण्याचा प्रयत्न येथील कांहीं धनिक व्यापाऱ्यांनीं व कांहीं वकिलांनीं करण्याचें योजिलें. व तदनरूप परिमित संख्येचे भाग करून भागीदारांच्या सहाय्यानें भांडवल जमादिलें, एंजिनिअरची नेमणून करून व आवश्यक यंत्र आणवून लहान प्रमाणावर दोन तीन अनुभव ही पाहिलें, परंतु असें दिसतें कीं मंडळीच्या अनमासा प्रमाणें तिनें योजिलेल्या भांडवलांत थोड्या 'मिलस' या कवून फायदा होण्याची मुळींच आशा दिसत नाहीं! एकंदर स्थिति लक्षांत आणून डायरेक्टर्सनीं कंपनी मोडण्याचा ठराव केला आहे. कामावर नेमिलेल्या एंजिनिअरनें न विचारतां मुंबईस निघून जावें. कंपनीस असलेल्या कर्जाची फेड होण्या साठीं भागीदारांकडे पैशाची मागणी करण्यांची पाळी यावी; विकत घेतलेल्या यंत्राचे विक्री करण्याचा प्रसंग यावा, आमच्या लोकांनीं घातलेला व हुशारीनें चालविलेला असा नगर शहरांत एक लहान साच कां होईना—कारखाना आहे अशाविषयीं अभिमान बाळगण्याची जागा नाहींशी व्हावी व ह्या कामीं पूर्ण खटपट करणारांचे हेतु जागचे जागीं थिजून जाण्याचा अनिष्ट प्रकार घडावा ही खरोखरच मोठि दुःखाचे गोष्ट होय! न्या० सि०

जमिनीवर चालणारी आगबोट! स्वीडन देशांतील इंजनेरी कारखान्यांत एक विलक्षण आगबोट तयार करण्यांत आली आहे. तिचे इंजिनांत जमिनीवरून आगबोट चालवीत नेण्याची गति उत्पन्न केलेली आहे. त्या देशांत बोराव ह्मणून ठिकाण आहे, त्या जवळ दोन मोठालीं सरोवर असून त्यांच्या मध्यें थोडी जमीन आहे. ही आगबोट ई० उतारू घेऊन एका सरोवरांतून निघतें व मधल्या जमिनीवरून आगगाडी सारखी चालत जाऊन दुसऱ्या सरोवरांत शिरून तारास लागतें असें प्रसिद्ध झालें आहे. पाश्चिमात्य कुशल कारागीर एकेक कल्पना काढतील तेवढी आम थोडीच आहे! स. शो.

---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांणीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षांची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१३
सहामाही " ३ " ०।८
सालअखेर " ७ " १।०८
किरकोळ अंकास .......................... ०।४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .........०।१

Rs.
annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy.......................................4as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per 1 in3a

VOLXXVI AKOLA MONDAY 25 JANUARY 1892 NO 4

वर्ष २६ अकोला सोमवार तारीख २५ माहे जानेवारी सन १८९२ इ० अंक ४

### दुरुस्ती

तारीख १८ माहे जानेवारी सन १८९२ च्या 'वऱ्हाडसमाचार' पत्रांतील तिसरे पृष्टावरील दुसरे कालमांत रा. रा. भोलाराम रामदयाळ यांनवर नोटीस देणाऱ्यांचे उपनांव 'पपकार' असें पडलें आहे त्या ऐवजीं 'पदमावार' असें समजावें आणि त्याच नोटिशीच्या ३३ वे ओळींत 'रकमेचा फैसल' असें पडलें आहे तेथे 'रकमेचा फसाव' असें समजावें.

नोटीस देणाऱ्यांच्या
पत्रा वरून
एडिटर—वऱ्हाडसमाचार

### जाहिरात.

तमाम लोकास खाली सह्या करणार यान कडुन ज्याहिर केलें जातें कीं जयराम वल्लद बसवाजी देशमुख राहणार कसबे नांदुरा तालुके मलकापूर हा मयत होऊन आज सुमारे अडीच वर्षे जाहाली. यांचा मुलगा नामे नेऊ होय. आम्ही जाहिर करणार परयाण मर्द नेऊ व मुलगा रामरावबल्लद नेऊ यांच्या नांवानें जयराम बल्लद बसवाजी यार्णी मयत होतेवेळीं मृत्यु पत्र करून ठेविलें, आहे याचें कारण नेऊ हा चांगल्या रितीनें राहून स्थावर जंगम ईस्टेट नीट ठेऊन आमचा सांभाळ नीट रितीनें करील अशी खात्री नव्हती व त्या प्रमाणे नेऊ हा चांगल्या रितीनें वागत नाहीं. घरदार वगैरे सोडुन रांडबाजी करित आहे म्हणून आम्हा मायलेकांच्या नांवचें मृत्युपत्र करून ठेविलें आहे त्या आधारानें व आम्ही स्थावर जंगम ईस्टेटीचे मालक आहो म्हणुन रिती प्रमाणें सर्वांस ज्याहिर केले जाते कीं. नेऊ हा मृत्यु पत्रांतील स्थावर जंगम इस्टेट कोणास गहाण किंवां खरेदी वगैरे कर्ज घेऊन देईलतर ती कोणी घेऊनये घेतल्यास त्याजबद्दल जबाबदारी कोणचे ही प्रकारानें स्थावर जंगम ईस्टेट व आम्ही नाहीं. जो कोणी देईल त्याबद्दलचे जबाबदार त्याचा तो आहे. हें सर्वास जाहिर व्हावें. कळावें तारीख १६ माहे जानेवारि सन १८९२ इसवी.

( सही )
सहीची निशाणी बांगडी परयाण मर्द नेऊ इच्या हातची असे.
सहीची निशाणी रामराव वल्लद नेऊ याच्या हातची असे.

वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य ११ शके १८१३

सन १८८७ चा आक्ट ७ वा म्हणजे दाव्याची रक्कम ठरविण्याचा कायदा हा मुलुख अमानी हैद्राबाद या प्रांतास लागूं केला असून त्याच्या अंमलबारी साठीं रेसिडेंट साहेबांनीं जमिनी संबंधी दाव्याची रक्कम ठरविण्याचे नियम येणें प्रमाणें केलें आहेतः—

१ कोर्ट फी आक्टांतील ७ कलमांमध्यें पारीग्राफ ५ यांत समावेश होणाऱ्या जमीनीं वरील ताब्याच्या प्रकरणांत न्यायकोडतांच्या सोयीसाठीं जमिनीच्या किंमतीची आकारणी खालीं नमूद केल्या प्रमाणें:—

( १ ) तीस वर्षांहून कमी मुदतीच्या करारानें जमीन लावून घेतला असून त्याबद्दल पुरा सारा सरकारांत पोंचत असेल तर त्या सारा पट्टीच्या दसपट रक्कम आकारावी.

(२) तीस वर्षांहून अधिक मुदतीनें किंवा कायमच्या कबूलायतीनें जमीन पूर्ण साऱ्यावर रयताव्याला घेतली असेल तर सरकारी साऱ्याच्या वीसपट्टीनें रक्कम आकारावी.

( ३ ) सरकारि साऱ्याचा सगळा किंवा कांहीं भाग माफ केला असेल तर या नियमाच्या ( १ ) किंवा ( २ ) पोट सदरांत सांगितल्या प्रमाणानें आकारणी करून तींत आणखी माफ असलेल्या साऱ्याची वीसपट मिळविण्यांत यावी.

( ४ ) इतर बाबींस बाजारांत किंमत ठरेल ती टाप करावी

२ जेव्हां जमिनीचा कांहीं भाग पहिल्या कलमांतील एका पोट सदराखालीं व दुसरा भाग दुसऱ्या एखाद्या पोट सदराखालीं येत असेल तेव्हां प्रत्येकाची निरनिराळी किंमत आकारून त्यांची एकुणांत घ्यावी.

३ कोर्ट फी आक्ट ७ कलम ६ वे पारिग्राफांत नमूद असलेल्या जमिनीच्या विक्रीवरील पहिलपणाच्या हक्का वरील दाव्यांत वरील पहिले कलमा प्रमाणें किंमत ठरविली जाईल.

४ कोर्ट फी आक्ट ७ कलम १० वे पारिग्राफांत येणाऱ्या जमिनीवरील विशेष हक्काच्या प्रकरणांत पहिलेंच कलम लागूं केलें जाईल.

इंदूरच्या होळकर सरकारें पुत्रलाभ झाला ह्मणून मोठ्या संतोषानें आपल्या प्रजेस जमिनिच्या साऱ्याच्या उत्पन्ना पैकीं ७०,००० रुपये सूट देण्या विषयीं फर्मावलें आहे. श्रीमंत महाराजाचें प्रजेच्या कल्याणा कडे फार दक्षतेनें पाहणें असतें हें ऐकून सर्वांस आनंद वाटला व स्वराज्याची थोरवी मनांत येऊन मनाला परम आल्हाद झाला. मद्रास व मुंबई या इलाख्यांतील व अजमीरा कडील दुष्काळानें पिडलेले लोक होळकर शाईच्या आश्रया खाली आपली घरें दारें सोडून नेहमी येत आहेत त्यांच्या ठपवस्ये करितां ह्मणजे त्यांना अन्नपाणी मिळावें ह्मणून महाराजानीं २५००० रुपयांचा फंड संस्थानच्या खजिन्यांतून वेगळा काढून दिला आहे.

काश्मीरच्या पंडितांनीं एक मंडळी स्थापून फंड गोळा करण्याचें काम चालविलें आणि तें काम आटोपल्यावर त्याच्या खर्चानें कुलीन स्त्रियांच्या उपयोगार्थ हिंदी भाषेंत एक वर्तमानपत्र काढणार आहेत. काश्मीरा कडील बायका स्वभावतः विशेष स्वतंत्रतेच्छु, सुशिक्षित व कार्यदक्ष असतात असें आह्मी ऐकतों तेव्हा वरील सारखें नवे नवे प्रयत्न स्त्रीशिक्षणा संबधानें सफल झाले तर दुधांत साखर पडली ह्मणावयाची.

माजी व्हाइसराय लार्ड डफरीन यांचा मुत्सद्दीपणा विषयीं फार चांगला लौकिक आहे. आपल्या लाभाची चिकाटी बळकट धरितात तरी उपजत तैल्यबुद्धीचें, धूर्त व विद्यासंपन्न, व वाक्पटु असल्यामुळें ते आपलें वजन व मानमरातब यांत काहीमात्र कमी न होऊं देतां जेथें जेथें जातील तेथें तेथें लोकांमध्यें माफकपणें मिसळून राहतात आणि इथ्यालियन, कानड्यांतले, तुर्क, किंवा हिंदुस्थानांतले लोक भेटले तरी प्रत्येकासाठीं आपली कळकळ सारखी दाखविण्याची शैली त्यांस उत्तम साधली आहे सध्यां फ्रेंच लोकांस आपल्या गोड बोलानें ते मोहून टाकीत आहेत. दुनिया झुकती आहे पण तिला झुकविणाऱ्या पैकीं ते एक आहेत. हिंदुस्थानची लाट साहेबांस आठवण असेल तर शपथ!

## "सद्बोध मंदीर"

(आमच्या एका स्नेह्या कडून-पुस्तक परिक्षण)

आज काल स्त्रियांना शिक्षणाची अवश्यकता आहे या संबधानें मुळींच वाद नाहीं. फक्त हें शिक्षण कोठ पर्यंत द्यावें व हें कोणत्या प्रकारचें असावें या संबधानें वाद आहे सद्बोध मंदीर या नावाची पुस्तकमाला मुलांसाठीं 'सुविचारांचा संग्रह करण्याच्या उद्देशानें ' लिहिण्याचा उद्देश आहे. या मालेच्या पहिल्या भागाचे संबधानें आह्मी आज लिहिण्याचें योजिलें. आहे या पहिल्या भागांत 'स्त्रियांचीं कर्तव्यें ' हा विषय घेतलेला आहे. व त्यां संबधानें स्त्रियांना सुशिक्षण असल्या पासून कसा फायदा होतो हें दाखविण्याचा ग्रंथकारांचा उद्देश दिसून येतो. 'नीतिशिक्षणास अथवा इतर शिक्षणास गृह शिक्षणाचें पाठबळ असलें ह्मणजे विशेष उपयोग होतो हें तत्व या पुस्तकांत स्पष्ट करून दाखविण्याचा ग्रंथकारानीं प्रयत्न केला आहे व तो बऱ्याच रीतीनें सिद्धिसही पण गेला आहे. पुस्तकाची किंमत १ रुपया आहे. छापाई व बांधणी सुबक आहे. प्रस्तावनेंत ग्रंथकर्त्यांनीं इंग्रजींत मारलटेल्स ( नीतिकथा ) या नावाचें एक गोष्टीचें पुस्तक आहे त्याचा बराच उपयोग झाला ह्मणून लिहिलें आहे व तें बऱ्याच गोष्टी वरून उघडही पण होतें. यशोदाबाईची राहण्याची रीत, व मुलांचीं बागेत काम करण्याची रीत वगैरे गोष्टि इंग्रजी धर्तीवर गेल्या आहेत. पृ. १३० यांत इंग्रजीतील कांहीं वायूचे नांवाचें भाषांतर करण्याचा प्रयत्न केला आहे उ. कारबान याचे भाषांतर 'अंगारवायू' व कारबानिक असिड ग्येस याचें 'अंगाराम्ल' असें भाषांतर आढळतें. आमचे मतें हें इष्ट नाहीं. भाषा साधारण बरी आहे व आपण नेहमी घरांत बोलतो तशीच आहे. परंतु कांहीं कांहीं ठिकाणीं इंग्रजी रीती प्रमाणें प्रकार आढळतो. उदाहरणार्थ आनंदीबाईचे बोलणें पुष्कळ वेळां व्याख्यानाचे धर्तीवर जातें व कंटाळवाणें वाटतें पृ. १९८व१९९ यांत लिहिलेला मजकूर वाचून इंग्रजी कादंबऱ्यांतून एकदम पुष्कळ गोष्टी ज्या ठिकाणीं दिलेल्या असतात अशा स्थलांचें स्मरण होतें या शिवाय मधून मधून भाषे संबधानें इंग्रजी झाक दिसून येते.

'सद्बोध मंदीर' मालेचे ग्रंथ कर्ते रा. रा. शंकर रामचद्र हातवळणे यांनीं सुविचार ' गोष्टीचे रूपानें कळले असतां ते वाचण्यास.... कंटाळा येण्याचा संभव कमी ' ह्मणून गोष्टीचे रूपानें विद्वज्जनापुढें हे सुविचार ठेविले आहेत. या संबधानें पहिला प्रश्न असा उत्पन्न होतो कीं ही गोष्ट कोणच्या वेळेची असावी. पुस्तकांत पृ. ४१ यांत धंदेशिक्षणाचे विद्यालया संबधानें उल्लेख आहे व मि. यूल यांचे भाषणा संबधानें ही एके ठिकाणीं उल्लेख आहे. पृ. ९४ यांतील स्त्री शिक्षणाचे संबधाचे विचार व इतर गोष्टीवरून गोष्ट अगदी अलीकडचे काळाची ह्मणजे ९।४ वर्षांतली असावी अशी वाटतें. अतां कंटाळा येऊ नये ह्मणून जी गोष्ट घालण्याचा ग्रंथकर्त्याचा उद्देश तो मुळींच सिद्धिस गेला नाहीं. गोष्ट फक्त पहिल्या २।३ पानांत व शेवटीं २।४ पानांत आहे व तीही पण चांगल्या रीतीनें साधली नाहीं शेवटी एकदा कशीतरी आटोपून घेतल्या सारखी दिसते गोष्ट ह्मटली ह्मणजे त्यांतील मुख्य पात्रा संबधानें दिग्दर्शन अवश्य पाहिजे होतें. आमचे ग्रंथकारांनीं असा कांहींच प्रकार दाखविला नाहीं. मुख्य पात्र ह्मणजे आनंदी बाई दिसते तिचा नवरा बाचून अमेरिकेस कसा गेला या संबधानें कोठेंच उल्लेख नाहीं. दुसरें आनंदी बाईनें यशोदा बाईचें येथें २।३ वर्षें राहून व तिचे मुलांस शिकविण्या संबधानें इतकी खटपट करून अमेरिकेहून हिंदुस्थानांत परत येऊन यशोदाबाईस मुळींच न भेटणें हें फारच विलग दिसतें. पृ. १९९ यांत दुसऱ्या पुष्कळ गोष्टी एकदम सांगून गोष्टीचा कार्यभाग कसा तरी उरकून घेतला आहे त्यांत ही हा एक गोष्ट गोवून टाकिली असती

तर बरें झालें असतें. गोष्टीमुळें पुस्तकास कोणत्याही रीतीची शोभा न येतां उलट त्याची कांहीं शोभा नाहींशीं मात्र झाली आहे. याच संबंधानें यशोदाबाईची वागण्याची रीत ज्या वेळीं ही गोष्ट घडली ह्मणून दाखविली त्या काळाला अनुसरून नाहीं. आमचे मतें अशा बायका आज काल सांपडणें कठीण व सांपडलीच तर हजारांत एखादी. दुसरी गोष्ट आनंदीबाई इतकी हुशार व शाहणी बायको ही आज काल सांपडणें कठीण. त्याच प्रमाणें आमचे मतें बागशाईची आवड ही नवीनच आहे. फक्त वेणुबाईचे संबंधानें पृ. ७८ पासून पुढें १०।२० पानें जें लिहिलें आहे तेवढा भाग चांगला साधला आहे. व त्यावरून आनंदीबाई, यशोदाबाई व वेणुबाई यांचे स्वभाव व त्यातील अंतर हीं चांगल्या रीतीनें दिसून येतात. असो हें गोष्टी संबंधानें झालें.

ग्रंथकर्त्यांचा मुख्य उद्देश या पुस्तकांत बऱ्याच रीतीनें सिद्धिस गेला आहे. या पुस्तकात 'स्त्रियांची कर्तव्यें कोणती, त्यांनीं मुलांचें संगोपन कसें करावें, त्यांस शिक्षण कसें द्यावें व त्यांचे विचार कसे असावें' या संबंधाचा विचार ग्रंथकर्त्यांनीं केला आहे व तो बऱ्याच अंशानें सिद्धीसही पण गेला आहे. मुलांचें शिक्षण स्त्रियांचे हातीं असणें इष्ट आहे व तसें होण्याला त्या विद्वान असणें जरूर आहे. गृहशिक्षण हें इतर शिक्षणाचे वर आहे. स्त्रियांना ह्या शिक्षणाची मातब्बरी समजून त्यांनीं सर्व प्रकारचें शिक्षण मुलांस देण्यास तयार असणें जरूर आहे. या प्रमाणें स्त्रियांनां स्वयंपाक करणें, टीपटाप राखणें, हिशेबटिशेब ठेवणें, व सर्व गृहकृत्यांत आपल्या नवऱ्यास साह्य करणें हीं स्त्रियांचीं कर्तव्यें होत व हीं त्यांचे मनावर चांगल्या शब्दांनीं ठसविण्यांत ग्रंथकर्त्यांनीं प्रयत्न केला आहे. व तो बराच साध्यही होईल.

या पुस्तकाचे साधारण रीतीनें दोन भाग करितां येतील. पहिल्या भागांत आनंदीबाईनें यशोदाबाईचे मुलांस शिक्षण दिलें. व दुसरे भागांत आनंदीबाईनें रमाबाईस आपलें घर, त्यांतील व्यवस्था वगैरे दाखवून आपलीं मतें कांहीं गोष्टींत प्रदर्शित केलीं. दुसरा भाग जरा कंटाळवाणा झाला आहे. यांत आनंदीबाईची व्याख्याना सारखीं भाषणें वाचण्याचा कंटाळा येतो. घर कसें असावें व कापूस कां पेरला आहे या संबंधाची आनंदीबाईची भाषणें फारच लांबलचक आहेत. व त्यांत ग्राह्यांश भाग जरी आहे तरी तीं फार लांब असल्यामुळें कंटाळवाणी होतात. पु. ११३–१४ यांत दररोजचा वर्तनक्रम दिला आहे. हा खरोखर प्रत्येकानें होईल तितका घेण्या सारखा आहे. ग्रंथकर्त्यांनीं आनंदीबाईचे तोंडून आपल्या ज्या वेड्या समजुती व चाली अगदीं खिळून बसल्या आहेत त्या संबंधानें चांगला उपदेश सांगितला आहे. उदाहरणार्थ पृ. १७–२२ यांत शिमग्याचे संबंधानें लिहिलें आहे. पृ. ७८ यांत कीर्तना संबंधानें चांगला उपदेश आहे. शिक्षण कसें द्यावें हें या पुस्तकांत स्पष्ट रीतीनें व चांगलें सांगितलें आहे. या बरोबरच दुसऱ्या पुष्कळ बारीक सारीक गोष्टी सांगितल्या आहेत. या गोष्टी जरी बारीक सारीक वाटतात तरी शिक्षणाचे संबंधानें फार महत्वाच्या आहेत. आनंदीबाईचा शिक्षण क्रम, १७१–१७४ या पानांवील निवडक वेचे, याचे पुढील पानांतील उदाहरणें, आनंदीबाईची तसबिरी वगैरे गोष्टी ठेवण्याची व त्या पासून मुलीचे मनावर चांगल्या घेण्या सारख्या गोष्टी ठसविण्याची रीत, आनंदीबाईची मुलांचे मतानें त्यांचे खुशीनें काम व अभ्यास करून घेण्याची रीत या गोष्टी खरोखर प्रत्येक स्त्रीनें नव्हे पण पुरुषानें घेण्या सारख्या आहेत. मुलांचा अभ्यास ह्मणजे आमच्या खिजगणतींत नसतो. मुलांचे खाण्यापिण्याचे संबंधानें व त्याच्या पुढील आयुष्या संबंधानें जबाबदारी प्रत्येक बापाचे किंवा वडील मनुष्याचे वर असते त्या प्रमाणें त्यांचे मनाला चांगलें वळण लावून देणें आहे. पहिली जबाबदारी आह्मी ओळखतो व दुसरी आह्मी ओळखत नाहीं. जर ओळखतो ह्मणावें तरी आमचे करणें आमच्या समजाच्या विरुद्ध असतें असें ह्मणावें लागेल. मुलाला एकदां शाळेंत घातलें ह्मणजे आपलें कर्तव्य कर्म झालें असें प्रत्येक बाप आपले मनांत समजत असतो पण तसें नाहीं. त्यांच्या मनाला चांगला कल लावून देणें हें प्रत्येक बापाचें काम आहे व हें काम प्रत्येक बापानें आपल्या हातीं घेतल्या शिवाय होणार नाहीं. आई ही मुलाचा उत्तम शिक्षक आहे. परंतु आमच्या सद्यःस्थितीकडे लक्ष दिलें तर एक तरी आई आपलें कर्तव्य कर्म बजावितांना दिसून येईल काय? याचें कारण उघडच आहे. त्यांना मुळीं कांहीं समजत नसतें. मुलाचे प्राथमिक शिक्षण घरा प्रमाणें इतर कोठें ही होणार नाहीं. व हें काम आयांनीं आपले हातीं घेतलें पाहिजे व तें घेण्याला पुरुषांनीं त्यांना तयार केलें पाहिजे व असें झालें ह्मणजे रा. रा. हतवळणें याचे पुस्तकाचा बराच उपयोग होईल असें आम्हास वाटतें. अशा रीतीनें आमच्या मुलाची शिकण्याची व्यवस्था लागली ह्मणजे खरोखर हींच मुलें पुढें चांगले पुरुष निपजतील. यासाठीं आपल्या मुलांचे सुखासाठीं व देशाचे कल्याणा साठीं प्रत्येक मनुष्यानें या गोष्टीचा विचार करून होता होईल तितकें स्त्रियांना शहाणें करण्याचा प्रयत्न करावा. व जो बारकाईनें वस्तुस्थिति पाहील त्याच्या लक्षांत हें येईल कीं, या प्रकारचा थोडा बहुत श्रम प्रत्येक करीत आहे. आमचे ह्मणणें असें नाहीं कीं प्रत्येक मनुष्यानें स्त्रियांस शाळेंत पाठवाव्यात; पण आह्मी ह्मणतो कीं अशा रीतीनें मुलीच क्रम नसो हतां किंवा शाळेंत घालून मोठा बाऊ न करितां प्रत्येकाला करता येण्या सारख्या पुष्कळ गोष्टी आहेत, व त्या तो करील तर बस्स आहे.

आतां सध्यां या पुस्तकाचा कोतो कसा उपयोग होईल तें पाहूं. या पुस्तकांत बायकांकडे फारशी कामें नसतात अशा प्रतीच्या बायका घेतल्या आहेत. या संबंधानें पुष्कळांनां या पुस्तकां प्रमाणें न वागतां येण्या सारखें आहे. कारण पुष्कळ बायकांना सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत घरचीं कामें पुरतात आतां खरोखरी श्रीमंताचे बायकानां या पुस्तकांतून घेण्या सारखा भाग पुष्कळ आहे; व त्यांनीं या प्रमाणें वागण्याचा प्रयत्न ठेवावा. ज्याना नेहमीं वेळ मिळत नाहीं त्यांनीं फावल्या वेळेचा उपयोग याप्रमाणें आपला वर्तनक्रम सुधारण्याचा प्रयत्न करण्याकडे लावावा. मुलाचे शिक्षणा सारखा दुसरा उद्योग नाहीं. व चांगल्या रीतीनें व आपल्या लहानग्यास सुख होईल या रीतीनें पार पाडण्यास प्रत्येक लेकुरवाळ्या स्त्रीनें झटलें पाहिजे; व अशा प्रत्येक स्त्रीस या पुस्तकांत पुष्कळ घेण्या सारख्या गोष्टी आहेत. या पुस्तकांत पुष्कळ गोष्टी साधारण लोकांचे ताकती बहिरच्या आहेत परंतु ह्या संबंधानें प्रत्येकानें हें लक्षांत ठेवावें कीं, हें पुस्तक ह्मणजे एका मोठ्या सत्पुरुषाचें चरित्र होय. साधारण मनुष्य सत्पुरुषाच्या प्रमाणें होणें दुरापास्त आहे पण होतां होईल तितकें त्या प्रमाणें वागण्याचा प्रयत्न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

---

प्रिन्स व्हिक्टर मरण पावले ह्मणून राजघराण्यावर व सर्व इंग्रजी राष्ट्रावर जें मोठें अरिष्ट ओढवलें त्या मुळें सर्व प्रजाजनांची चित्तवृत्ती दुःखानें विव्हळ व उदासीन झाली आहे. प्रतापशाली चक्रवर्तिनी महाराणी सरकारास व प्रिन्स आफ वेल्स व त्यांच्या पत्नी याच्या कडे हिंदुस्थानच्या राजनिष्ठ प्रजेकडून दुःखवट्याच्या तारा पाठविण्याची गेल्या आठवड्यांत सर्वत्र चळवळ झाली. प्रिन्स व्हिक्टर यांस गेल्या बुधवारीं मूठमाती देण्याचा शोकप्रद समारंभ विलायतेस झाला त्या दिवशीं राजपुत्राच्या सन्मानार्थ व स्मरणार्थ सर्व हिंदुस्थान भर सरकारी कचेऱ्या, सार्वजनिक कार्यें, राजेरजवाड्यांची लग्नादि मंगलकार्यें, शाळा, दुकानें हीं सर्व बंद ठेवण्यांत आलीं होतीं.

---

दस्तूर बहिमनजी जामास्पजी माजी असि. कमिशनर सी. आय. इ. आणि रावसाहेब देवराव विनायक यांच्या निमंत्रणा वरून गेल्या बुधवारीं येथील टाऊन हालांत वऱ्हाडांतील राजनिष्ठ प्रजा महाराणी सरकारच्या पौत्रशोकानें दुःखित झाल्यामुळें एकत्र गोळा झाली आणि अशा हृदयक्षोभाच्या व दुःखाच्या उमाळ्यांच्या भरांत सर्वांनीं एक दिलानें वैभवशाली बादशाहिणी व्हिक्टोरिया, युवराज व त्यांची पत्नी यांस शांतवना दाखल दुःखवट्याच्या तारा पाठविल्या. दुःखाग्नीच्या तीव्रसंवेगानें इतर नेटिव वर्तमान पत्रकर्त्यांस ही तारा पाठविण्यांत आल्या. महाराणी सरकारांस हिंदुस्थानच्या राजनिष्ठ प्रजेकडून आपलें शांतवन होईल अशी पूर्ण आशा होती आणि त्या आशे प्रमाणेंच प्रांता प्रांतातून दुःखवट्याचीं पत्रें रवाना होत आहेत इतकेंच नव्हे तर तारायंत्रद्वारा निरोप खेळूं लागले आहेत. महाराणी सरकारास परमशोकप्रदर्शक तारा धाडल्या आहेत त्यांच्या जबाबांत तारेनें आभार मानण्याची ही धूम उडाली आहे. अकोल्याच्या सभेस ही एक उत्तरादाखल तार मिळाली.

---

# The Berar Samachar

**MONDAY, JANUARY 25, 1892**

We give below the telegraphic reply that the meeting of Akola has received for its message of condolence to Her Majesty the Queen Empress:—

"Queen Empress thanks British Subjects Akola for their kind condolence."

The following official announcement published by the Bombay Gazette is reproduced for general information:—

"Their Royal Highnesses the Prince and Princess of Wales are anxious to express to Her Majesty's subjects at home, in the Colonies, and India, their deep gratitude for the universal sympathy shown for them in their terrible calamity. The remembrance that their grief has been shared by all classes will be a lasting solace to their sorrowing hearts, and, if possible, will attach them more than ever to their dear country."

---

None should grudge the English nation the honour of being the grand educator of the Indian peninsula. After a full swing of anarchy and despotism in the country the British rule was a welcome relief to the drooping energies of the people at large. The nation was struggling for existence in the whirling falls and rises of a series of the ruling dynasties. There was no thought allowable for the regeneration of arts and sciences. The advent of the new Govt. established peace and safety of purse & person. The eyes of the people were opened to new exigencies. Those who were able to move with the times kept pace with the movement of thought and action in the path of civilization. Education was the organ which assimilated the people of different nationalities and creeds of religion into a compact nation of loyal subjects to the British throne. Whatever, either well or ill, may be said of the anglicising influences which are modelling our aspirations in political and social subjects the nation as a whole is progressing towards an upheaval of great and high ideas. Great ideas have been domineering the whole world. To such a proud history of the Western civilization the Mahomedan community, unlike their Hindu natives, do not contribute an enlightened chapter of its career of progress and advancement. Though not at the top of the ladder of national aspirations the Mahomedans do not indicate a signal failure in their on-ward march towards reformation. They are moving slowly but surely. It took a long time before they could be brought to realize their new situation. They were repenting at leisure over their past greatness. The dignitary occupations and wealthy pursuit of their ruling days were no more. They have lately learnt to stand on the same level with the other native community of India. Religious fanaticism and bigotry gave way at least before the southening influences of education and right policy. The Nizam has of late years acknowledged the highly developed systems of education and has established on the English model schools and colleges to spread education to his thousands of subjects. His Highness has liberally contributed to make the Mahomedan Educational Conference at Aligarh an institution of vast usefulness. The importance and dignity which is attached to it and the rapid progress which the 'Mahomedan Anglo-oriental College' has been making are due to the promoters of that Conference. These promoters constitute the nucleus of the enlightened Mahomedans with Sir Sayad Ahmed at the head. It is gratifying from the history of that College that the Mahomedans, though backward as a race, are making a good and successful stand. We would inaugerate that day to be the proudest day in the Indian history when our Mahomedan-brethren will get rid of the disturbing elements of 'favouritism and special claims' which their voluntary and patriotic efforts are rendering unnecessary and gratuitous.

Our thanks are due to the Honorable Mr. Justice Straight who as an interested but impartial observer of the Mahomedan community congratulated them at their last Educational Conference at Alligarh on the success they have achieved and made known to the world that the Mahomedan people will in no distant future fight manfully with their other friends in the front of the battle-field. His speech is full of truths and facts pregnant with a warranted forecast in the future. His advice to the students is worth careful study. Here we give below his view about the process of real education:—

"By the term education I do not mean the mere accumulation of a mass of undigested information, but that combination of mental, moral, and physical materials that in my opinion must walk hand in hand to produce individual intelligence and usefulness as a member of society (cheers). I confess I have no great sympathy for the mere pedant or bookworm who in a solitude burns the midnight oil and seeks not the society of his fellow-men; nor the lessons the experience could afford him to enlarge his mind. Nor do I think that grown men or youths can be made good and moral by Act of Parliament or by codes prepared for their guidance by the most conscientious professors of ethics; they must rub shoulders with folks of their own age and either in the broader walks of mature life or in the narrower sphere of the class-room and the play ground learn what is right and true and honourable. To my mind it is a marked feature of this institution that, while you have a wholesome, you have at the same time a liberal, system of discipline, that, by encouraging full and friendly intercourse among the resident students naturally tends in that little world of which they are members to create a healthy public opinion which very plainly supports what is right and repudiates what is wrong (cheers). If you care for the good name of your College remember that its maintenance rests as much in the keeping of each individual student as of the whole of you put together, and that the disgrace of any one of you is a reflection upon it. I am glad to know that here the practice of physical exercise is largely encouraged and I know that in the cricket and football fields you have shown your prowess and earned distinction. I do not believe *mens sana* without the *corpus sanum*, at any rate in youth or early manhood, and whatever small success I may have had in life or any energy or determination of character I possess, I owe to the cricket and football fields of Harrow and to the influence of the life there, short even though my experience of it was. And to you students I would add this: Do not think when you have finished your College career and have taken your M. A. or B. A. or B. L. degrees that your education has finished. You may have read wisely or unwisely, you may have accumulated a mass of useful or unuseful knowledge, you may have well or ill satisfied the tests of examiners, but believe me it is not until you are face to face with the world and standing on your own feet that the real education of life begins (cheers). Do not be disheartened if many of the pictures your fancy has drawn fade into nothingness, if the ideals you have built up vanish at the prosaic and unsympathetic touch of busy life. You will find that the mental, moral, and physical training you have gone through here are invaluable to the foundation of your minds and character but that they must of necessity undergo much mellowing and ripening in the school of experience (cheers)."

His forecast, though a collateral remark altogether, pictures the probabilities of no distant future. There he confesses he is groping in the dark. What is to become of the formidable number of graduates? This question he attempts to solve in a pessimistic spirit. The Government service affords opportunities for educated men but they are few and far between. It is yet problematical what the thousands of the educated people of India should pursue as their life's calling when some will have over-crowded the fields of service, private schools, and newspapers —the only at present allowable.

## वऱ्हाड.

अकोल्यास प्रिन्स व्हिक्टरच्या मरणा निमित्त सभा भरली होती त्या वेळीं येथील सिव्हिल सर्जन डाक्टर रेली यांनीं मि. सोराबजी मंचरजी व्हाईस प्रेसिडेंट यांच्याशीं असभ्यपणानें तोंडसुख घेतलें ह्मणून मुद्दाम शनिवारीं मुनसिपाल सभा भरवून कमिटीनें डेपुटी कमिशनर मार्फत डाक्टरांस माफी मागण्या विषयीं कळविलें आहे.

लिहिण्यास दुःख वाटतें कीं रा. रा. रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांच्या प्रिय पत्नी सौभाग्यवती राधाबाई यांस नऊ दिवसांपूर्वी देवाज्ञा झाली. अलीकडे तीन चार वर्षें यांची प्रकृती निकोप व सुदृढ नव्हती तरी ह्मणण्या सारखी अगदीं घसरली ही नव्हती. नागपुरास राष्ट्रीय सभेच्या मंडपांत कांहीं सभ्य, सुशिक्षित व सुधारलेल्या स्त्रीरत्नांची मालिका बसली होती त्या पैकीं या एक होत्या. नागपुरासच विषमज्वरानें आजारी होऊन घरीं आल्यावर ज्वराची भरती ओहटी होत होत त्यांचा अंतकाळ झाला. पितृगृहीं व श्वशुर गृहीं श्रीमान असून या आप्तमित्रांचा परामर्ष दक्षतेनें घेत असत. राजश्री तात्या साहेब विलायतेस गेले होते तेव्हां त्या साध्वीनें विरहानें तपस्वीनी प्रमाणें वर्तन ठेवलें होतें. पतीच्या शिक्षे खालीं या थोरपणीं लिहिणें वाचणें, कशीदा, वीणकाम वगैरे शिकल्या होत्या. पतीच्या आज्ञे वरून गृह मर्यादेच्या शृंखला झुगारून या उन्नत मार्गानें राजकीय चळवळीस आपल्या जाण्या येण्यानें मंडपशोभा आणीत असत. तात्या साहेबांस मर्दुमकीच्या वयांत स्त्रीवियोग झाला आणि ती 'गृहिणी सचिवः प्रियः सखी प्रियशिष्या ललिते कलाविधौ' अशा पत्नी पासून झाला हें पाहून सर्वजणांस वाईट वाटेल. तात्या साहेबांनीं आपलें व आपल्या स्वकीयांचें शांतवन मोठ्या हिंमतीनें व चातुर्यानें केलें पाहिजे.

दुसरी एक अशीच दुःखाची वार्ता आह्मास कळवावी लागते कीं रा. रा. एकनाथ मोरेश्वर काण्हेरे एक्स्ट्रा असि० कमिशनर यांच्या तरुण पत्नी गेल्या सोमवारीं मरण पावल्या. राजश्री एकनाथपंत वृद्धापकाळीं एकटे पडले आणि मागें अल्पवयी मुलें मातृछत्र नसल्यामुळें उघडी पडलीं.

कै० सौ० राधाबाई मुधोळकर यांस त्यांच्या वडिलांनीं दीड हजार रुपयांची देणगी दिली होती तिचा विनियोग स्त्रीशिक्षणाकडे करण्यासाठीं त्यांनीं आपल्या पतीस मरतांना कळविलें आहे. सत्कार्यी पैसा लागतो हें पाहून समाधान वाटतें.

मि. अजीजुद्दीन अक्स्ट्रा असि० कमिशनर हे रजेवरून परत आपल्या कामावर गेल्या मंगळवारीं रुजूं झाले- आणि त्यांच्या रजेंतले अक्टींग ए० अ० कमिशनर रा. रा. एकनाथ मोरेश्वर हे आपल्या तहशीलदारीच्या कामावर रुजूं झाले. त्यांचा मानस पेनशन घेण्याचा आहे असें हो लोक बोलतात.

वाशिमच्या तालुका बोर्डांतील रा. रा. नागोराव माधवराव यांनीं राजिनामा दिल्यावरून त्या सभासदाच्या जागीं रा. रा. पाण्डुरंग बाळकृष्ण लिमये, इंग्रजी मराठी शाळा वाशीम यांस नेमलें आहे.

यवतमाळ सिव्हिल आस्पीटल मधील हास्पिटल असिस्टंट मि. अमीन उल्लाखान यांस दोन महिने २३दिवसांची रजा मिळाल्या वरून इलिचपूर जिल्ह्यांतील मि. अबदूल अझिज यांस त्या जागीं नेमण्यांत आलें आहे.

उमरावती क्यांप मुनिसिपालटीचे सभासद मि. जे. मरी यांनीं राजिनामा दिला होता तो रेसिडेंट साहेबांनीं मंजूर केला आहे.

लेफटेनंट ए. जी. डेव्हिडसन असि० कमिशनर वर्ग ३ यांस बुलढाणा जिल्ह्यांतून इलिचपूर जिल्ह्यांत बदललें आहे.

रेसिडेंट साहेबांचे अस्थायी मीर हशमत अली यांस सिकंदराबादेहून उमरावतीस काम पाहण्या साठीं धाडलें आहे.

मि. शापूरजी वीरजी आफि० एक्स्ट्रा असि० कमिशनर, यांजकडे वाशिम जिल्ह्याचे तुरुंगाचे सुपरिंटेंडेंटचे काम सन १८९१ च्या नोवेंबरच्या ८वे तारखेस सोपविलें असल्या विषयीं गेल्या रेसिडेन्सी आरडरमध्यें उल्लेख केला आहे.

मि. जे. आग्रेडी एक्स्ट्रा असि० कमिशनर यांचे तांब्यांतील कोडत असि० कमिशनर वर्ग १ चें दुर्ज्याचे समजलें आहे.

मि. एफ. सी क्राफर्ड यांस शिकंदराबाद छावणीच्या मर्यादेंत पहिलें वर्ग माजिस्ट्रेटचे अधिकार देण्यात आले.

आकोल्या प्रमाणें उमरावतीसही प्रिन्स व्हिक्टरच्या मरणा निमित्त उमरावतीस सभा गेल्या बुधवारीं भरली होती. सभापतीचें आसन रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांनीं ग्रहण केलें होतें.

पौंच — 'कामगार' नांवाचें एक सप्ताहिक वर्तमानपत्र समाजांतील खालच्या प्रतीच्या मजूरदार, कामकरी वगैरे लोकां साठीं मुंबईस निघूं लागलें आहे. त्याचा पहिला अंक आह्माकडे आला आहे त्याचा आह्मीं आभार पूर्वक स्वीकार करितों. वर्षाची वर्गणी स्वल्प ह्मणजे बारा आणे ठेविली आहे. कर्तृत्व प्राधान्यत्वेंन रा. रा. सदाशिवराव केळकर यांजकडे आहे.

कलकत्याचे 'भारतमित्र' पत्र कर्त्याकडून सन १८९२ सालचें पचांग पत्रक आलें आहे. एक आणा किंमतींत माहिती तिथी, वार, तारखा वगैरें बद्दल मुबलक दिली आहे.

### नोटीस.

लक्ष्मण वा। रायभानजी दळवी रहाणार मौजे दादुलगव्हाण प्रगणें व ता० मेहेकर जिल्हे बुलढाणे यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुमच्यापाशीं माझें लग्न हिंदुधर्माप्रमाणें होऊन आज चौदा वर्षें झालीं असून सज्ञानही होण्यास ४।५ वर्षें झालीं असून आज पावेतों तुम्ही होऊन मजला आपलें घरीं नेऊन नांदविलें नाहीं. सज्ञान झाल्यावर मीच होऊन तुमचें घरीं आले परंतु तुह्मी मजला जनरीतीप्रमाणें नांदविलें नसून जो व्यवहार स्त्रीपुरुषाचा आहे तोंही केला नाहीं. मी सरासरी लग्न झाल्या दिवसापासून तुमचे घरीं १॥ महिना राहून पाहिलें. परंतु कांहींच संसाराची सोय दिसून आली नाहीं आणि तुम्ही मजला साफ सांगितलें कीं, मी पुरुषत्वांत नसल्यामुळें मजला तुझी गरज नाहीं. ह्मणून माझें आईबापाचे घरीं मी तुमचे सांगण्यावरून आलीं त्याजला २–३ वर्षें झालीं आहेत. तरी मी तुमची वाट पाहिली परंतु तुह्मी मजला नेण्यास आलें नाहींत. व मजला नेऊन नांदवीत नाहीं. मी तुमचें घरीं नांदण्यास कबूल आहे. जरी तुह्मी मजला पुरुषत्वांत नाहीं अशी गोष्ट सांगितली तरी मी त्याजवर भरंवसा ठेविला नाहीं आणि तुमची मी आज पावेतों वाट पाहिली.

ता० १९ माहे डिसेंबर १८९१ इ० रोजीं मी आणि चार पंच मिळून तुमचें घरीं आले आणि तुह्मास वर लिहिले प्रमाणें ह्मटलें असतां तुह्मी नांदविण्यास नाकबूल असें चार पंचाचे समक्ष सांगितलें ते पंच येणें प्रमाणें:—

१ कचरू व० मनाजी तागडे २ पुंजाजी वल्लद येकूजी तागडे, ३ मारुती वल्लद मल्हारजी कावळे, ४ विठोबा व० हरकुजी सेकळ, ५ कडतुजी व० महादाजी दळवी आणि ६ एकनाथ सदाशिव मास्तर. यांचे समक्ष तुह्मी मजला सांगितलें कीं, माझे कडून तुजला दुसरा नवरा करण्यास परवानगी आहे. असें असून मी तुह्मास रीती प्रमाणें फारकती मागितली असतां तुह्मी वरील तारखेस ष्टाप कागज वगैरे आणिला असून पुढें ती फारकती देण्याचे नाकारलें याचें कारण तुह्मी कळविलें नाहीं.

आतां या नोटीशीनें तुम्हास असें कळविलें जातें कीं, लग्न झाल्या दिवसांपासून मी आपलें आईबापाचेच घरीं राहिले. त्याजबद्दलचा दरमहा ५ रुपये प्रमाणें खाण्याचे संबंधानें खर्च झाला आहे तो एकंदर १४ वर्षांचा दर सालास ६० रु. प्रमाणें आकार रु. ८४० हे रु. तुह्मी आणून देऊन मजला नांदविण्यास घेऊन जावें. मी नांदण्यास कबूल आहे. जर तुम्ही वर लिहिलें प्रमाणें करणार नाहीं तर तुम्ही मजला वरील पंच व शिवाय आणखी दुसरे चार लोकांचे समक्ष जी तोंडी मोकळीक दिली आहे ती व ही नोटीस हीच फारकती समजून दुसरा नवरा करून संसार करीन. तुमचे लग्नाचे संबधानें मजवर कोणतेही प्रकारचा हक्क राहणार नाहीं. व दावा कबूल करणार नाहीं व राहणार नाहीं करितां या नोटिशीनें तुह्मांस कळविले जाते कीं तुम्हास नोटीस पावल्या दिवसा पासून १५ दिवसाचे आंत जबाबानें कळवावें. नाहीं तर मी नोटीसिची मुदत संपल्यावर मी दुसरा नवरा करीन आणि हीच फारकती समजली जाऊन मग तुमचा माझेवर कोणताही हक्क राहणार नाहीं. कळावें ता० १७।१।९२ इ.

(सही)

राजाई मर्द लक्ष्मण दळवीन

ईचे हातची निशाणी

बांगडी

## वर्तमानसार.

नेपाळचा गंभीरसिंग नांवाचा एक सरदार तिऱ्हुट रेलवेवर पहिल्या क्लासांतून आपल्या लहान पुत्रासह प्रवास करीत असतां एका स्टेशनावर एक युरोपियन नीळ पिकविणारा व दोघा गोऱ्या बाया पहिल्याच वर्गांत आल्या. त्यांस अगदीं रिकामा डबा पाहिजे होता. दुसरे पहिल्या वर्गांचे दोन डबे होते, पण त्यांत युरोपियन गृहस्थ बसलेले होते. ह्मणून ते गंभीरसिंगाचे डब्यांत आले व त्यांनीं त्यांस डबा खालीं करण्यास सांगितलें. त्यानें तें न ऐकिल्यावरून त्या तिघा निळवाल्यांनीं त्यास त्याच्या सामानासुद्धां बाहेर ओढून काढलें व इतका मार दिला कीं गंभीरसिंग बेशुद्ध होऊन पडला व हे तिघेही गोरे गार्डींत बसून गाडी चालती झाली. गंभीर सिंगाचे सुमारें ७६ चाकर चौकशी करीत आहेत तोंच गाडी चालती झाल्यामुळें अपराधी पसार झाले. रेलवेवरील अधिकाऱ्यांनीं त्यांस मुळींच हरकत केली नाहीं. गंभीरसिंगानें या बद्दल फिर्याद केल्यावरून अपराधी लोकांचा शोध काढल्या त्यांत असें आढळून आलें कीं ती तिन्ही माणसें विलायतेस चालती झालीं! त्यांचा न्याय तीं परत आल्यावर होण्याचें ठरलें आहे ! ! नेपाळ सारख्या संस्थानच्या सरदाराची ही स्थिति व्हावी हें आमच्या सरकारांस देखील वाईटच आहे. हा सरदार नेपाळास पोंचून त्याणें इंग्रजी राज्यांतील या जुलमाची हकीगत नेपाळ सरकारांस कळविल्यास तिकडील सर्व लोकांस इंग्रज लोकांच्या राज्याची खंती वाटणार आहे याचेंच आह्मास वाईट वाटतें!

सयामचा राजपुत्र प्रिन्स दामरंग हे निझाम सरकारच्या भेटीस जाणार आहेत.

देव तारी त्यांस कोण मारी—गेल्या आठवड्यांत इंदूरकडून येणाऱ्या प्यासिंजर गार्डीतून ती भर वेगानें चालली असतां खिडकीच्या वाटे एक लहान मूल बाहेर पडलें, ते रूळापासून थोड्या अंतरावर पडलें. व ह्मणूनच त्याला फारसी इजा झाली नाहीं या मुलांस पडतांना गार्डानें पाहिलें व लागलीच गाडी थांबवून त्याला वर घेतलें.

प्रजेची कळकळ करणारे राजे जर असतील तर त्यांस विष्णू अवतार ह्मणण्यास लोक कां मागें घेतील बरें? पण " तुमडी भर देना " हें ज्या राजांचे ब्रीद ठरलें असेल व प्रजा मरो की तरो वसुलांत एक पैही सूट द्यावयाची नाहीं. असा ज्यांचा आग्रह असेल त्या राजांस लोकांनीं राजांतील पोटभरू " मांकड " म्हटल्यास त्यांत दोष कोणता! दुष्काळ पडला ही परिक्षेची वेळ आहे. या वेळीं पोटांत आग पडलेल्या रयतेनें सरकार तिजोरीवर शस्त्र न धरलें तर ती राजभक्त आहे असें ठरेल व सरकारानें त्यांची सोय पाहून रक्षण केल्यांस सरकार मायबाप आहे असेंही लोकांच्या दृष्टीस पडणार आहे आमचें सरकार मोठें दयाळु आहे पीडित प्रांतांत कोस दोन कोसावर रीलीफ कामें काढण्यांत त्यांची सोय आहे. ठिकठिकाणी पाण्याच्या सोयी आज रिलिफच्या निमित्यानें करून ठेविल्यास पुढें मोठा फायदाही होणार आहे. करितां सरकारानें या युक्तीचा विचार करून आपल्या रयतेचे पोटच्या पोराप्रमाणें रक्षण करावें एवढेंच आमचे त्यांस सविनय सांगणें आहे. पु० वै०

इंग्लंड व पोर्टुगाल यांच्या दरम्यान झालेल्या १८८० च्या तहावरून गोंव्याच्या हद्दींतलीं मिठागरें आज बारा वर्षें मुंबईसरकारच्या ताब्यांत होतीं व त्याबद्दल हिंदुस्थानसरकारानें दरसाल चार लाख रुपये गोंवेसरकारास द्यावे असें ठरलें होतें. त्या तहाप्रमाणें ता १२ वर्षांची मुदत गेल्या आठवड्यांत पुरी व्हावयाची असल्यामुळें नवा तह करण्याचें काम विलायतसरकार व पोर्टुगालसरकार यांच्या दरम्यान आज कित्येक दिवस चाललें होतें, पण तें फुकट जाऊन एकमेकांच्या शर्ती एकमेकांस नापसंत होऊन तह होत नाहीं असें ठरलें व त्याप्रमाणें गेल्या आठवड्यापासून गोंव्याच्या हद्दींतल्या मिठागरांवरचा इंग्रजसरकारानें आपला ताबा सोडून तीं त्या सरकारच्या स्वाधीन केलीं. हा तह करण्यांत सगळ्या हिंदुस्थानांतला व्यापार एक करावा आणि दरम्यानच्या नाकेबंद्या, जकाती, वगैरे सर्व काढून टाकाव्या असा हिंदुस्थानसरकारचा मुख्य हेतु होता व त्याकरितांच हा सर्व खटाटोप होता. आतां तो तह रद्द होण्याबरोबर तिकडचें मीठ चोरून आपल्या हद्दींत येऊं नये ह्मणून आपल्या हद्दीवर मुंबई सरकारानें नाकेबंदी करून पाहाऱ्याकरतां सातशे लोक ही कायम केले. मिठाच्या चोऱ्या वगैरेचें जे गुन्हे होतील त्यांचा इन्साफ गोंव्याच्या कोर्टांत व्हावा असा नियम असल्यामुळें ते इन्साफ वेळच्या वेळीं होत नाहींत, बरोबर होत नाहींत व एकंदरीनें लबाड्या न होण्याच्या बंदोबस्तास व्हावी तशी मदत होत नाहीं म्हणून या नव्या तहांत कांहीं वेगळी व्यवस्था करण्याचा इंग्रजसरकारचा इरादा होता, आणि त्यामुळेंच तो तह झाला नाहीं असें सांगतात.

चुंबनाच्या मनोरंजक व्याख्या ट्रिब्युनपत्रांत प्रसिद्ध झाल्या आहेत त्या फारच गमतीच्या वाटल्या वरून आमच्या वाचकांकरितां खालीं देतों:—

चुंबन हा एक ग्रास आहे, ज्या मानानें तो प्रीतिपरिप्लुत असेल त्या मानानें तो कमी किंवा जास्त रुचकर लागतो.

चुंबन हें प्रीतितरूचें अतिमधुर फल आहे तीं चुंबनफळें जितकीं वारंवार तोडावीं तितकीं तितकीं पुन्हा लवकर त्या तरूवर विपूल येतात.

प्रीतितरूला वाढविण्याचें हें एक उत्तम खत आहे

प्रीतिज्वालेला जास्त प्रदीप्त करणारें हें तेलच आहे.

बापाचें समाधान करण्याचें, प्रियपतीच्या विनोदास आडकाठी आणण्याचें आणि बालपणाचें दुःख विसरून जाण्याचें एक उत्तम साधन आहे.

प्रीतिसंयोग व लग्न ह्या दोन युद्धांचा शेवट करणारें हें तहाचें निशाण आहे.

जयीं मिळती परस्पराचे ओष्ठ॥तेंच चुंबन असे वरिष्ठ॥

परी लग्न झालीया वरी समच॥ निरर्थक मातितो ॥ १ ॥

प्रीतीचें उत्तम सुखदर्शन आणि दुःखाचें विर्जण आहे. आपल्या घरगुती दवाखान्यांतलें हें एक रामबाण औषध आहे. ज्या करितां पुरुष लग्नाचे अगोदर जीव टाकतात व बायका लग्नानंतर इच्छा करितात.

प्रसिद्ध सर लेथब्रीज हे मुंबईस आले असून या आठवड्यांत अलाहाबादेस जाणार व परत विलायतेस जाण्यापूर्वीं मद्रास, म्हैसूर हैदराबाद वगैरे ठिकाणींही जाणार आहेत असें सांगतात हेतु काय?

गायकवाड यांची प्रकृती आतां बरी झाली व ते लवकरच मुंबईहून बडोद्यास जाणार आहेत.

हांगकांगच्या तारेवरून समजतें कीं एक इंग्रजी आगबोट त्या बंदराशेजारीं बुडाली व त्यांतील ४०० माणसें बुडालीं.

कलकत्याहून मुंबईस येणारी एक आगबोट कलकत्याहून निघाल्यावर त्यांतील आग पेटून १९ माणसें भाजलीं व दोन लागलींच मेलीं.

चीन लुशाई प्रांताची व्यवस्था पुढें कशी करावयाची याबद्दल कलकत्यास मोठाल्या कामदारांचा विचार चालला आहे.

कापूस अमेरिकेंत हल्लीं इतका स्वस्त झाला आहे कीं तितकी स्वस्ताई गेल्या ५० वर्षांत कधींही झाली नव्हती

न्यूयार्कची तार सांगते कीं, एका खाणींत अपघात होऊन दोनशे माणसें खालीं दडपलीं आणि वरती खाणीचें तोंड बंद झालें असल्या मुळें तीं जीवंत निघण्याची आशा दिसत नाहीं.

राजपुत्र अब्बास हा इजिप्तचा खेदीवराजा झाला, व तो राजा झाल्यानें इजिप्तच्या राजकीय व्यवस्थेंत कांहीं फरक होण्याचा संभव दिसत नाहीं. अब्बासचा बाप मयत खेदीव याच्या मरणाचें कारण असें बाहेर आलें आहे कीं, तो आजारी असतां उपचार करणाऱ्या नेटिवडाक्टरांनीं अयोग्य औषध दिलें व त्यामुळें तो खेदिव मेला या कारणाबद्दल आतां चवकशी चालू असून त्यांत दोन इंग्रज डाक्टर आहेत असें सांगतात या नव्या खेदिवाच्या सन्मानार्थ इंग्लंड व फ्रान्स या दोघांनाही थोडथोडीं लढाऊ गलबतें त्यास सामोरीं पाठविलीं होतीं. या नव्या खेदिवास तुह्मी लवकर कबूल करूं नका व त्याच्या दरम्यान इजिप्त सोडण्याबद्दल इंग्रजांशी पुन्हा बोलणें सुरू करून त्याचा निकाल झाल्यावर या नव्या खेदिवास कबूल करा असें कित्येकांकडून टर्कीच्या सुलतानास सांगण्यांत आलें पण त्यास कबूल करण्यानें तुह्मी आपलें वर्चस्व प्रथम स्थापित करून घ्या असें जर्मनीकडून सांगण्यांत आलें होतें असें सांगतात. ठा० अ०

हिंदुस्थानचें जें एकंदर उत्पन्न होतें त्यां पैकीं ३/५ शिपाईप्यादे ठेवण्याकडे व अधिकाऱ्यांचे पगाराकडे खर्च होतो. व त्या सर्व उत्पन्नाचा १/५ च कायतो देशांत रहातो. बाकी राहिलेला सर्व पैसा पैगाकडे पैसा जातो ह्या ह्मणी प्रमाणें श्रीमानदेशांत जाऊन पडतो!!! दुष्काळ कमिशनच्या रिपोर्टाच्या दुसऱ्या भागाच्या १०२ पानावर खालीं दिलेली राज्यव्यवस्थेच्या खर्चा संबंधीं माहिती सांपडते ती अशी.

| प्रांत | राज्यव्यवस्थेस लागणारा खर्च—पगार वगैरे. | दरशेकडा उत्पन्न पैकीं लाग. ख. |
|---|---|---|
| | रु० | रु० |
| पंजाब | ६९,४०,००० | २९० |
| अयोध्या आणि वायव्यकडालप्रांत | १,१०,००,००० | १९० |
| बंगालप्रांत | १,६१,९०,०० | २९० |
| मध्यप्रांत | २७,३०,००० | ३१० |
| वऱ्हाडप्रांत | — | — |
| मुंबई व सिंधप्रांत | १,१९,७०,००० | ३०० |
| मद्रास | १,१४,२०,००० | २५० |
| आसामप्रांत | १७,२०,००० | २९० |

निजाम सरकारच्या राज्यांत जो खर्च येतो त्याचें कसकसें प्रमाण आहे हें खालीं लिहिल्या वरून दिसून येईल. स्वतः निजामसरकारास जी रक्कम मिळते त्या सुद्धां शेकडा पंचविसापेक्षां देखील खर्चाचें मान कमी असते. व ते सरासरी ७२ लक्षांचें आहे व ती रक्कम सर्व हैद्राबादेंतल्या हैद्राबादेंत राहते म्हणजे देशांत जरी पैसा खर्च होतो तरी तो परकीय देशांत न जातां देशांतल्या देशांतच रहातो. ब्रिटीश इंडियांतली रक्कम जशी थेट विलायतेला जाऊन पोंचते तशी ही स्थिति बिलकुल नाहीं, हा विशेष महत्वाचा भाग अवश्य लक्षांत घेतला पाहिजे. नेटिव संस्थानांत जो खर्च होतो त्या खर्चाचें मान जरी दुप्पट वाढेल अशी कल्पना केली तथापि नेटिव प्रांताची ब्रिटिशशाहींतल्या मुलखाशीं खर्चाच्या बाबतींत तुलना करून पाहिली असतां नेटिव संस्थानाचाच खर्च कमी आहे असें अतीं दिसून येईल! अर्थातच आहे घरचा पैसा घरीं रहातो त्यांचें हें फळ फार कशाला जर आपण नेटिवसंस्थानांतला दरबारी खर्च एकंदर खर्चांतून वजा दिला तर खर्चाचें मान उत्पन्नाच्या दशांशापेक्षां देखील कमी आहे असें आढळून येईल. कसा हा स्वराज्याचा महिमा.

वर दिलेली माहिती लक्षपूर्वक वाचणारास असें दिसून येईल कीं, मागें दिलेल्या कोष्टकांत वऱ्हाड प्रांताचें सदर अगदीं रिकामें ठेविलें आहे. वऱ्हाड संबंधानें आंकडे गाळले आहेत ह्याचें कारण हिंदुस्थानच्या अधिकाऱ्यांच्या मनाला ते लाजण्यासारखे, उत्पन्नापैकीं शेकडा ५९ टक्के खर्च असल्या मुळें आहेत; आणि ह्याच कारणामुळें ते, ते आकडे, प्रसिद्ध करूं शकत नाहींत, अशी प्रकारची सर्व हिंदुस्थानभर जी बोलवा आहे ती मध्यें कितपत तथ्य आहे तें कळवा अशा प्रकारचा कामन्स सभेपुढें प्रश्न येण्याचा संभव आहे. आणि ज्यांना वऱ्हाडच्या राज्यव्यवस्थे संबंधानें अगदीं बारीक सारीक सुद्धां माहिती आहे त्यांची ह्या रिकाम्या ठेवलेल्या सदराबद्दल वर सांगितलेल्या प्रकारचीच ठाम समजूत झालेली आहे.

ठा० अ०

## अकोलें बाजारभाव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | | | १०० |
| " १९ दिवसाच्या मुदताची | | | | | ९९॥= |
| सुवर्ण २३ | रुपे | १०८ | आळशी | | ९३ |
| गहू काठे | | ८० | बनशी | | ९९ |
| जवारी ४४ | चणे | ७७॥ | सर्की | | ५॥। |
| कापूस | | ३७ | रुई | | ५१ |
| मीठ ३॥। | तूप | ८। | तेल | | ५॥। |

सट्याचे भाव. ( मोगलाई )

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी | बसंत | १९४८ | ४४ |
| गहू | वैशाख शुद्ध | १९४८ | ६८॥= |
| आळशी | चैत्र शुद्ध | १९४८ | ८५ |
| रुई | फाल्गुन | १९४८ | ५२। |
| सर्की | वैशाख नवे साळची | १९४८ | ५॥= |

शु० व०

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार "छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांणीं छापून प्रसिद्ध केलें.